'STARS' प्रकल्पांतर्गत

# आनंदी बालशिक्षण

## • प्रशिक्षण वाचन साहित्य •









ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आनंदी बालशिक्षण – प्रशिक्षण वाचन साहित्य

- प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- प्रेरणा : **मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- मार्गदर्शन : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. आर. विमला (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- संपादक : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- सहसंपादक : **श्रीमती अनुराधा ओक**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी संपादक : **डॉ. माधुरी सावरकर**
  उपसंचालक, सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी सहसंपादक : **डॉ. गितांजली बोरुडे**
  उपविभाग प्रमुख, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीमती सुषमा कोंडूसकर**
  अधिव्याख्याता, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- संपादन साहाय्य : **श्रीमती सुप्रिया नवले**
  विषय सहाय्यक, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- द्वितीय आवृत्ती : डिसेंबर २०२४
- प्रती : ६४,५००
- अर्थसाहाय्य : स्टार्स प्रकल्पांतर्गत, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- मुद्रक : रुना ग्राफिक्स, पुणे.
- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# आनंदी बालशिक्षण

## प्रशिक्षण वाचन साहित्य







राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० नुसार राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर विकसित करण्यात आला. त्याच आधारावर खेळणीआधारित शिक्षणाचे महत्त्व विचारात घेऊन NCERT द्वारे जादुई पिटारा विकसित करण्यात आला.



शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये आनंदी बालशिक्षण प्रशिक्षणात सहभागी प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षणामध्ये व संबंधित वाचन साहित्यात याचा परिचय करून देण्यात आलेला आहे. आपणाकरिता सदर जादुई पिटाऱ्याचा परिचय करून देण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करावा.

NCERT निर्मित जादुई पिटारा

# मनोगत

स्वतंत्र भारताचे शिक्षणविषयक तिसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये जाहीर झाले. या धोरणातील नवीन दृष्टिकोन आणि शिफारशींमुळे सर्व राज्यांना शालेय शिक्षणाला नवसंजीवनी देण्याची संधी मिळाली आहे. महाराष्ट्र शासनानेही यावर व्यापक विचारमंथन घडवून आणले. या धोरणातील अपेक्षांची सांगड राज्याच्या गरजांशी घालून हे धोरण साकार करण्याचा कालबद्ध कार्यक्रम राज्यात सुरू आहे.

नवीन धोरणातील शैक्षणिक रचनेमध्ये तीन ते आठ या वयोगटाचा 'पायाभूत स्तर' या नावाने समावेश केला आहे. यात तीन ते सहा या बालशिक्षणाच्या वयोगटाचाही समावेश झाला आहे. हा बदल निश्चितपणे एक मैलाचा दगड ठरेल. श्री. गिजुभाई बधेका, पद्मभूषण श्रीमती ताराबाई मोडक आणि पद्मश्री श्रीमती अनुताई वाघ यांनी बालशिक्षणाचे रोप भारतभूमीत लावले. एकात्मिक बाल विकास योजनेमधील अंगणवाड्यांत अंगणवाडी सेविकांनी केलेल्या संगोपनामुळे इ. स. १९७५ पासून बालशिक्षणाचे हे रोप बहरत राहिले. या निर्णयामुळे ते अधिक उमेदीने बहरून त्याचा वृक्ष होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवीन धोरणातील या शैक्षणिक रचनेमध्ये तीन ते सहा वयोगटाचा समावेश झाल्यामुळे राज्यात बालशिक्षणाचे पद्धतशीर रीतीने सार्वत्रिकीकरण करण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी अभ्यासक्रम तयार करण्याची संधी महाराष्ट्र राज्याने देशात सर्वप्रथम घेतली. इ. स. २०१५ मध्ये ३ ते ५+ या वयोगटासाठी 'आकार' हा बालशिक्षणक्रम तयार केला होता. हा आकार बालशिक्षणक्रम वापरून राज्यातील एकात्मिक बालविकास योजनेखालील जवळपास एक लाख, दहा हजार अंगणवाड्यांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६ पासून शिक्षण दिले जात आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामुळे या 'आकार' बालशिक्षणक्रमाला अधिक समृद्ध रूप देण्याची संधी राज्याला मिळाली आहे. नवीन बालशिक्षणक्रम, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा–२०२२ यांच्याशी सुसंगत करण्यासाठी पायाभूत स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेने विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मदतीने तयार केला आहे.

पायाभूत स्तरावरील अभ्यासक्रम आराखड्यातील शिक्षण विचारांचा लाभ राज्यातील बालकांना लवकर मिळणे गरजेचे आहे. पायाभूत अभ्यासक्रम आराखड्यात राज्याने पाहिलेले बालविकासाचे एक भव्य स्वप्न आता बालशिक्षणमध्ये साकार करायचे आहे. हे काम बालशिक्षणच्या भविष्याची दोरी हाती असणाऱ्या अंगणवाडी सेविकाच यशस्वीपणे पूर्ण करणार आहेत; म्हणून परिषदेमार्फत अंगणवाडी सेविकांसाठी पायाभूत स्तरावरील शिक्षण विचारांची तोंडओळख करून देण्यासाठी आनंदी बालशिक्षण या दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. मागील वर्षी पहिल्या टप्प्यात आपण राज्यातील सर्व कोलोकेटड अंगणवाडीतील अंगणवाडी सेविकांना राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४, खेळणी आधारित अध्ययन व 'NCERT चा जादुई पिटारा' या संदर्भात प्रशिक्षण दिले आहे. दुसऱ्या टप्प्यात राज्यातील सर्व उर्वरित अंगणवाडी सेविकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात आपण NCERT च्या जादुई पिटाऱ्याऐवजी 'महाराष्ट्राचा जादुई पिटारा' यातील साहित्याची ओळख करून देत आहोत. तसेच NCERT मार्फत विकसित करण्यात आलेल्या जादुई पिटाऱ्यावर आधारित 'ई–जादुई पिटारा' याचीही ओळख करून देण्यात येत आहे. तसेच पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण पूर्ण झालेल्या सेविकांसाठीदेखील हा नवीन भाग पुरवणी वाचन साहित्य स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आपण हे प्रशिक्षण पूर्ण करून आपल्या अंगणवाडीतील बालकांचे शिक्षण आनंददायी करावे, यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
**संचालक,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# प्रशिक्षणाविषयी थोडेसे...

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर – २०२२ प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्राचा राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ हा नुकताच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत विविध तज्ज्ञ व्यक्तींच्या मदतीने विकसित करण्यात आला आहे. नवीन बदलाची चाहूल सर्व क्षेत्रीय अधिकारी व प्रत्यक्ष क्षेत्रावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका यांना देणे अत्यंत आवश्यक आहे, म्हणूनच नवीन शैक्षणिक धोरणानुसार होऊ घातलेले बदल राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर रूपाने मूर्त स्वरूपात आलेले आहेत. पायाभूत स्तरावर बालकांना वर्गातील वातावरण सुरक्षित, सुखद व आनंददायक लाभले तरच त्यांचे अध्ययन चांगले व सहज होते. प्रयोग करणे, अनुभव घेणे व शोध घेणे यांच्या मुबलक संधी उपलब्ध करून देणे, तसेच संगोपन व जबाबदारीची जाणीव असणे ही पायाभूत स्तरावरील अध्यापनशास्त्राच्या उत्कृष्टतेची प्रमाणके आहेत.

मागील शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये राज्यातील कोलोकेटेड अंगणवाडी सेविकांना अंगणवाडी पर्यवेक्षिकेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. यामध्ये बालकांचे सर्वांगीण विकास क्षेत्र, अध्यापनशास्त्र व मूल्यांकन, तसेच खेळणी आधारित अध्यापनशास्त्र, NCERT चा जादुई पिटारा यांचा समावेश करण्यात आलेला आहे. मात्र शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये महाराष्ट्राचा जादुई पिटारा व NCERT चा ई–जादुई पिटारा यांचा समावेश प्रशिक्षणात व संबंधित वाचन साहित्यात करून देत आहोत. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील सदर प्रशिक्षण पूर्ण झालेल्या सेविका यापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना हे नव्याने समाविष्ट वाचन साहित्य पुरवणी स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण अंगणवाडी सेविकांपर्यंत पोहोचविताना राज्यातील एकात्मिक बालविकास योजना विभाग आणि शिक्षण विभाग यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. याचाच एक भाग म्हणून दुसऱ्या टप्प्यातदेखील सदर प्रशिक्षण अंगणवाडी सेविकांसोबतच अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना देखील देण्यात येत आहे. एवढेच नाही तर अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्या माध्यमातूनच हे प्रशिक्षण प्रत्यक्ष सेविकांपर्यंत देण्यात येणार आहे.

बालक अनेक मार्गांनी शिकण्याचा आनंद घेते. बोलणे, ऐकणे, खेळणी वापरणे, साहित्य वापरून कृती करणे, चित्र काढणे, गाणे म्हणणे इत्यादी कृतींच्या साहाय्याने बालकांना शिकते करणे हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून 'आनंदी बालशिक्षण' प्रशिक्षणाचे वाचन साहित्य आपणास उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे. आपणास उत्स्फूर्तपणे प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!


**डॉ. माधुरी सावरकर**
**उपसंचालक,**
**सेवापूर्व शिक्षण,**
**बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग.**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अंगणवाडी सेविकांशी हितगुज

देशाच्या शिक्षणप्रणालीला उज्ज्वल भविष्याच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची प्रत्यक्ष अंमलबजावणी विविध टप्प्यावर वेगाने सुरू आहे. पायाभूत स्तरासाठी राष्ट्रीय पातळीवर विकसित करण्यात आलेल्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२२ वर आधारित राज्याच्या गरजा व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्याचा पायाभूत स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसित केला आहे.

या आराखड्यातील शिक्षण विचारांची समज निर्माण होण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे उद्‌बोधन होणे गरजेचे आहे. हे प्रशिक्षण दोन दिवसांचे असून, पहिल्या टप्प्यात शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये राज्यातील सर्व संलग्नित (collocated) अंगणवाडी सेविकांना तर दुसऱ्या टप्प्यात शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये बाकीच्या सर्व अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

प्रत्यक्ष प्रशिक्षणासोबतच 'आनंदी बालशिक्षण – प्रशिक्षण वाचन साहित्य' पुस्तिका रूपाने आपल्या हाती देत आहोत. ही पुस्तिका या प्रशिक्षणातील प्रशिक्षक व सर्व अंगणवाडी सेविकांना उपयोगी असणार आहे. त्यामुळे या वाचन साहित्याचा संदर्भ प्रशिक्षण सुरू असताना आणि नंतरही उजळणीसाठी पाहता येईल. आनंदी बालशिक्षण या वाचन साहित्यरूपी पुस्तिकेत विषयाची मांडणी जाणीवपूर्वक सोप्या भाषेत आणि थोडक्यात केली आहे. त्यात विषय उलगडून दाखवणारी छायाचित्रे आहेत. अंगणवाडीतील अनेक कृती, उपक्रम, जादुई पिटाऱ्यातील खेळण्यांचा वापर इत्यादींचा प्रभावी अनुभव देण्यासाठी Youtube/google drive वर किंवा इतर स्वयंसेवी संस्थांनी तयार केलेले व्हिडिओ निवडून त्यांच्या लिंक्स QR code च्या रूपाने योग्य ठिकाणी दिले आहेत. यांचाही वापर प्रशिक्षक आणि अंगणवाडी सेविका करू शकतील.

पायाभूत स्तर आराखड्याचा विस्तार व्यापक असल्याने दोन दिवसांच्या मर्यादित कालावधीत शिक्षणाविषयीचा ठळक विचार आणि आचार पोहोचवणे एक आव्हान आहे. याविषयी समग्र विचार करून प्रशिक्षणात चार क्षेत्रांना प्राधान्य द्यावे असे ठरविले आहे. सर्वांगीण बालविकास चित्राचा परिचय हे यातील पहिले क्षेत्र आहे. पायाभूत स्तरावरील शिक्षण पूर्ण केल्यानंतर सर्वांगीण विकास झालेले बालक कसे असेल याचे चित्र अभ्यासक्रम तयार करताना तयार करावे लागते. विकास क्षेत्रनिहाय अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व प्रत्येक क्षमतेमध्ये समाविष्ट वयोगटनिहाय अध्ययन निष्पत्ती वाचून या विकासचित्राचे स्वरूप स्पष्ट होते. पायाभूत आराखड्यात ही मांडणी खूप सविस्तरपणे केली आहे. शारीरिक विकास, सामाजिक, भावनिक, नैतिक विकास, बोधात्मक विकास, भाषा आणि साक्षरता विकास तसेच सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास अशा पाच विकास क्षेत्रांत सर्वांगीण विकासाची विभागणी केली आहे. भारतीय विचारधारेमध्येही याची मांडणी 'पंचकोश विकास' या स्वरूपात केली आहे. आराखड्यात पंचकोश आणि पाच विकास क्षेत्रांची सांगड स्पष्ट केली आहे. त्यातून काय शिकवायचे आणि कसे शिकवायचे याचा विचार रेखीवपणे करायला अधिक मदत होणार आहे. मूल्यांकनही अधिक नेमकेपणे करता येईल. हा सगळा विचार समजावून सांगणे हा पहिल्या क्षेत्राचा हेतू आहे.

पायाभूत स्तरावर बालकांमध्ये काय साध्य करायचे हे ठरले, तरी ते प्रत्यक्ष वर्गात कसे घडवून आणायचे हे पुढचे आव्हान असते. याची गुरुकिल्ली देणारे अध्यापनशास्त्र या प्रशिक्षणाचे दुसरे क्षेत्र आहे. अध्यापनशास्त्र हे

संशोधन, प्रयोग आणि दीर्घ अनुभव यावर आधारित असते. त्यातील तत्त्वे लक्षात घेऊन सर्वप्रथम पाठ्यक्रम तयार केला जातो. यानंतर पाठ्यक्रमातील आशय बालकापर्यंत पोहोचण्यासाठी 'आशय संघटन' केले जाते. अंगणवाडीतील शिकणे सुलभ होईल असे अध्ययनपूरक वातावरण तयार केले जाते. अशा सुसज्ज व मुक्त आनंदमय वातावरणात बालशिक्षण घडवून आणले जाते. उदयोन्मुख साक्षरता, भाषा साक्षरता व गृहभाषेचा उपयोग यांचे महत्त्व आहे. शिकवले ते समजले का?, किती समजले? या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करून मिळतात. मूल्यांकनाची हाताळणी नाजूकपणे आणि आस्थेवाईकपणे करावी लागते. विविध उद्देशांनुसार मापन करणारी साधने वापरावी लागतात. बालकांच्या संचयिकेच्या रूपाने बालकांच्या प्रगतीचे चित्र तयार करावे लागते. हा सर्व भाग अध्यापनशास्त्र या क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेला आहे.

खेळ आणि खेळणी यावर आधारित शिक्षण हे या प्रशिक्षणामधील अत्यंत महत्त्वाचे तिसरे क्षेत्र आहे. खेळ हा तर बालशिक्षणाचा आत्मा आहे! खेळातून मुक्त आनंद आणि शिक्षण यांचा सुंदर मेळ साधला जातो. मुलांच्या भावविश्वात खेळाचे स्थान, खेळाचे फायदे, वर्गात शिकताना आणि शिकवताना त्यांचा प्रभावी वापर याची चर्चा या विभागात आहे. मुले कधी कधी कोणाची मदत न घेता स्वतःच खेळात रमून जातात; तर कधी शिक्षकांच्या मदतीने खेळतात. खेळाच्या या विविध पद्धतींचा समावेश या क्षेत्रात आहे. याशिवाय यात खेळणी वापरून शिकणे–शिकविणे अधिक प्रभावी कसे करता येईल याची चर्चा आहे. खेळण्यांचे प्रकार आणि उदाहरणे दिली आहेत. कागद, कापड, टाकाऊ वस्तू यांपासून अंगणवाडी सेविकांना स्वनिर्मित खेळणी कशी तयार करता येतील याच्या सचित्र कृती दिल्या आहेत.

खेळण्यांचा संग्रह असलेली जादुई पिटारा प्रशिक्षणाचे चौथे महत्त्वाचे क्षेत्र आहे. खेळाचा पसारा मांडणे, जोडा जोडी करत रंगून जाणे हा मुलांचा आवडता उद्योग. पेटीतील संग्रह निवडताना अनेक बाबींचा विचार केला आहे. हा जादुई पिटारा NCERT ने तयार केलेल्या 'जादुई पिटारा' या खेळणीसंग्रहाच्या धर्तीवर तयार केला आहे. यातील खेळणी सर्व विकास क्षेत्रांना न्याय देणारी आहेत. पुस्तिकेत त्याची विकास क्षेत्रानुसार वर्गवारी दिली आहे. खेळण्याची केवळ यादी न देता प्रत्येक खेळणे कसे वापरावे, त्याचा बालकाला नेमका उपयोग काय होतो त्याचीही थोडक्यात माहिती दिली आहे. याशिवाय NCERT मार्फत ई–जादुई पिटारा हे मोबाइल ॲप विकसित करण्यात आले असून त्या संदर्भात देखील माहिती देण्यात आलेली आहे.

या चार क्षेत्रांखेरीज अजूनही अनेक महत्त्वाच्या बाबींची चर्चा यात आहे. बालशिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर, शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितता, बाललैंगिक अत्याचार यांची शाळेतील जबाबदारीने हाताळणी करण्याविषयी चर्चा केली आहे. सदर प्रशिक्षणासाठी वाचन साहित्य निर्मिती करण्यासाठी बालशिक्षण विभागाच्या समन्वयाने जाणकार तज्ज्ञ, आयसीडीएस प्रतिनिधी, शासकीय आणि अशासकीय संस्थांमधील अधिकारी, बालशिक्षणाला वाहून घेतलेल्या स्वयंसेवी संस्था यांनी योगदान दिले आहे. या प्रशिक्षणामुळे अंगणवाडीतील चिमुकल्या बालकांचे शिक्षण अधिक मुक्त, आनंदमय आणि फलदायी होईल असा विश्वास आम्हांला वाटतो. यासाठी सर्व अंगणवाडी सेविका यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**डॉ. गितांजली बोरुडे**
**उपविभाग प्रमुख,**
**बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | प्रकरण १ :<br>राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – भाग १ : बालकांची सर्वांगीण विकास क्षेत्रे | १ |
| २) | प्रकरण २ :<br>राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – भाग २ : अध्यापनशास्त्र व मूल्यांकन | ११ |
| ३) | प्रकरण ३ :<br>खेळणी आधारित अध्यापनशास्त्र (Toy Based Pedagogy) | २३ |
| ४) | प्रकरण ४ :<br>महाराष्ट्राचा 'जादुई पिटारा' | ४२ |
| ५) | प्रकरण ५ :<br>ई–जादुई पिटारा : मोबाइल ॲप | ६४ |
| ६) | परिशिष्ट अ :<br>विकास क्षेत्रे, ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती यांतील सहसंबंध | ७५ |
| ७) | संदर्भग्रंथ सूची | ९३ |

# प्रकरण १
# राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर - भाग १
# बालकांची सर्वांगीण विकास क्षेत्रे

**प्रस्तावना :**

पंधराव्या शतकापासून बालशिक्षणाचा प्रवाह हळूहळू नवी वळणे पार करत आला आहे. श्री. गिजूभाई बधेका, श्रीमती ताराबाई मोडक आणि श्रीमती अनुताई वाघ यांनी अत्यंत मायेने बालशिक्षणाचे रोप लावले आणि दमदारपणे वाढवले. पुढे इ. स. १९७५ मध्ये एकात्मिक बाल विकास योजना सुरू झाली. हळूहळू राज्यात एक लाखाच्या वर अंगणवाड्या बालसंगोपनाची आणि शिक्षणाची काळजी घेऊ लागल्या. यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी बालसंगोपन आणि शिक्षणात आजपर्यंत अजोड भूमिका बजावली आहे. त्यांचे हे एक मोठे राष्ट्रीय कार्यच आहे. ८६ व्या घटना दुरुस्तीमुळे २१ (अ) या कलमाचा समावेश झाला, त्यामुळे ६ ते १४ वर्षे वयोगटासाठी शिक्षण हा मूलभूत हक्क झाला आणि ४५ व्या कलमामध्ये सहा वर्षांखालील बालकांच्या शिक्षणाचा देखील समावेश झाला. पुरोगामी असणाऱ्या महाराष्ट्र राज्याने या सुसंधीचा फायदा घेतला. पुढाकार घेऊन देशात सर्वप्रथम ३ ते ५ + या वयोगटासाठी 'आकार' हा बालशिक्षणक्रम तयार केला. तो वाढ आणि विकासाची तत्त्वे, बालमानसशास्त्र, बालअध्यापनशास्त्र यांच्या भक्कम पायावर विकसित केला. इ.स. २०१६ पासूनच्या सर्व अंगणवाड्यांमध्ये तो प्रचलित आहे. २०२० मध्ये देशात तिसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार झाले आणि प्रथमच शिक्षणाच्या नवीन आकृतिबंधामधील ३ ते ८ वर्षे या पायाभूत स्तरामध्ये बालशिक्षणाचा समावेश झाला. त्यामुळे बालशिक्षणाची अंमलबजावणी राज्यभर अधिक सरस होण्याचा मार्ग प्रशस्त झाला. धोरणातील पायाभूत स्तराच्या शिक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा – २०२४ तयार झाला. आकार बालशिक्षणक्रम आणि हा आराखडा यामध्ये शिक्षण प्रक्रियेतील उद्दिष्टे, अध्ययन–अध्यापन पद्धती, नियोजन, मूल्यमापन इत्यादींबाबत सविस्तर चर्चा केली आहे. आकार या बालशिक्षणक्रमाच्या तुलनेत नवीन आराखड्यात शैक्षणिक उद्दिष्टांची मांडणी अधिक विस्ताराने आणि पद्धतशीरपणे केली आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून बालशिक्षण अधिक समृद्ध कसे करता येईल याचे मार्गदर्शन केले आहे. खेळ व खेळणी आधारित शिक्षणाविषयी विस्ताराने चर्चा केली आहे. सध्या अंगणवाडी सेविकांना या खूप सविस्तर असलेल्या आराखड्याची थोडक्यात तोंडओळख करून द्यायची आहे. तसेच रोज शिकवताना नेमके कोणते बदल हवे आहेत ते स्पष्ट करायचे आहे. या संवादाची रूपरेषा स्पष्ट करणारे साहित्य परिषदेने तयार केले आहे. अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांना याचा उपयोग होईल आणि अंगणवाडी सेविका देखील हे वाचून नवीन राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील पायाभूत स्तरावरील शिक्षण आणि अपेक्षा समजून घेऊ शकतील.

## अध्ययन निष्पत्ती :

**अंगणवाडी सेविका...**

१) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ प्रमाणे नवीन शैक्षणिक रचना व प्रकरण योजना यांचे ठळक स्वरूप सांगते.

२) पायाभूत स्तरावरील अपेक्षित सर्वांगीण बालविकासाची लक्ष्ये, क्षेत्रे, ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती यांतील सहसंबंध स्पष्ट करते.

३) पायाभूत स्तरावरील भाषा शिक्षण, आणि साक्षरतेबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट करते.

४) बालशिक्षणाच्या अध्यापनशास्त्रातील ठळक मुद्दे स्वत:च्या शब्दांत सांगते.

५) अध्ययन–अध्यापनासाठी आशयाची निवड, संघटन आणि संदर्भीकरण उदाहरणांसह स्पष्ट करते.

६) बालकांच्या अध्ययनाच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्याची पद्धत स्पष्ट करते.

७) पायाभूत स्तरावरील वेळेच्या व्यवस्थापनाची पद्धत स्पष्ट करते.

८) अतिरिक्त निर्णायक क्षेत्रे, विशेष गरजा असलेली बालके, शाळेतील सुरक्षा व सुरक्षितता यांची गरज स्पष्ट करते.

९) शिक्षकांचे सक्षमीकरण आणि बालशिक्षणाची शैक्षणिक व प्रशासकीय अधिकाऱ्यांची भूमिका स्वत:च्या शब्दांत सांगते.

१०) पायाभूत स्तरावरील अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील पालकांची भूमिका स्वत:च्या शब्दांत सांगते.


## १) राज्य अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तर : काही ठळक माहिती

### १.१) नवीन बालशिक्षणक्रमाच्या दिशेने :

घटनेच्या ४५ व्या मार्गदर्शक कलमासंदर्भात ८६ वी घटना दुरुस्ती झाली. त्यामधील कलम २१ (अ) नुसार शिक्षण हा मूलभूत हक्क झाला. हा शिक्षणाचा हक्क ४५ व्या कलमामधील ६ ते १४ वर्षे या वयोगटाला मिळाला आणि ४५ व्या कलमात सहा वर्षाखालील बालकांच्या शिक्षणाचा समावेश झाला. या बदलाची दखल भारतात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याने घेतली. एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे या संस्थेने आयसीडीएस व युनिसेफ यांच्या मदतीने 'आकार' हा बालशिक्षणक्रम विकसित केला. आयसीडीएस मधील अंगणवाड्या व बालवाड्यांमध्ये, इ. स. २०१६ पासून 'आकार' बालशिक्षणक्रम सुरू आहे. आता राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) जाहीर झाल्यामुळे शिक्षणात अनेक बदल घडू लागले. याचाच एक भाग म्हणून बालशिक्षणही आता नवे वळण घेत आहे. आकार या बालशिक्षणक्रमाच्या जागी नवीन धोरणावर आधारित बालशिक्षणक्रम विकसित होत आहे.

### १.२) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) आणि बालशिक्षण वयोगट :

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) नुसार शैक्षणिक रचनेत वयोगटाची विभागणीही बदलली आहे. त्यात बालशिक्षणाचा वयोगट नव्याने समाविष्ट झाला आहे. खालील आकृतीमध्ये आणि सारणीमध्ये प्रचलित रचना आणि नवीन रचना यांची तुलना मांडली आहे.




**(संदर्भ : राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) नुसार शैक्षणिक रचना – पृष्ठ क्र. ७)**

वरील आकृतीमधील माहिती खालील तक्त्यात अधिक स्पष्ट होईल.

| प्रचलित शैक्षणिक रचना | | | | नवीन शैक्षणिक रचना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **वयोगट** | **कालावधी वर्षे** | **इयत्ता** | **स्तराचे नाव** | **वयोगट** | **कालावधी वर्षे** | **नाव/इयत्ता** | **स्तराचे नाव** |
| ३ ते ६ वर्षे | – | समावेश नाही | – | ३ ते ८ (३ ते ६+ ६ ते ८) | ५ (३+२) | बालवाटिका + इ. पहिली व दुसरी | पायाभूत स्तर |
| ६ ते ११ वर्षे | ५ | इ. पहिली ते पाचवी | निम्न प्राथमिक | ८ ते ११ | ३ | इ. तिसरी ते पाचवी | पूर्वतयारी |
| ११ ते १४ वर्षे | ३ | इ. सहावी ते आठवी | उच्च प्राथमिक | ११ ते १४ | ३ | इ. सहावी ते आठवी | मध्य |
| १४ ते १६ वर्षे | २ | इ. नववी व दहावी | माध्यमिक | १४ ते १६ | २ | इ. नववी ते बारावी | माध्यमिक |
| १६ ते १८ वर्षे | २ | इ. अकरावी व बारावी | उच्च माध्यमिक | १६ ते १८ | २ | | |
| **एकूण** | **१२ वर्षे** | | | | **१५ वर्षे** | | |

प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण (ECCE ) यासाठी, ० ते ८ वर्षे असा वयोगट निश्चित केला आहे. यातील ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांचे शिक्षण कुटुंबामध्ये होईल. घरात हे शिक्षण चांगल्या रीतीने कसे देता येईल याविषयी महिला आणि बालविकास विभागाने मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. या पुढील ३ ते ८ वर्षे वयोगटाचा समावेश आता NEP-2020 मधील शैक्षणिक रचनेत केला आहे. तीन ते सहा वयोगटाचे शिक्षण ४५ व्या कलमात समाविष्ट झाले असले तरी तो शैक्षणिक रचनेचा भाग प्रथमच होत आहे. या मोठ्या बदलामुळे या वयोगटातील शिक्षणाची अंमलबजावणी अधिक पद्धतशीरपणे होईल. राज्यातील बालवाटिका उपगट ३ ते ६ वर्षे असा आहे. नवीन वयोगट आणि शैक्षणिक अपेक्षा यांना अनुसरून नवीन बालशिक्षणक्रम तयार केला जाईल. तो पायाभूत स्तराच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या (SCF : FS - 2024) च्या आधारे तयार होईल. हा बालशिक्षणक्रम राज्यातील शासकीय बालशिक्षण केंद्रासमवेत अशासकीय केंद्रांनाही लागू होईल. हा आराखडा कसा तयार झाला हे पाहू.

### १.३) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ (SCF-FS - 2024) :

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) या धोरणाआधारे केंद्राने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – २०२२ (NCF : FS - 2022) तयार केला. राज्याने या आधारे SCF : FS - 2024 विकसित केला. तो तयार करताना राज्य अभ्यासक्रम आराखडा (NCF) मधील मार्गदर्शक शैक्षणिक तत्त्वे विचारात घेतली. SCF : FS - 2024 आधारे आता राज्यातील शिक्षणामध्ये बदल केले जातील. SCF-FS-2024 तयार करताना राज्याच्या गरजांनुसार NCF : FS - 2022 मध्ये काही बदल केले. ठळक बदल पुढीलप्रमाणे आहेत :

**राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ (SCF-FS-2024) : महाराष्ट्र राज्य संदर्भात महत्त्वाचे बदल**

- महाराष्ट्रातील बालशिक्षण तज्ज्ञांच्या कार्याचा समावेश.
- महाराष्ट्रातील खेळ, खेळणी यांचा अध्ययन प्रक्रियेत समावेश.
- स्थानिक सण, उत्सव, समारंभ व परंपरा यांचा समावेश.
- महाराष्ट्रातील स्थानिक गृहभाषा आणि बोलीभाषा यांचा स्वीकार व अध्ययन प्रक्रियेत त्याचा वापर करण्यावर भर.
- स्थानिक संदर्भसाहित्य व बालसाहित्याचा विचार.

### १.४) राज्य अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तर : प्रकरण योजना ही मांडणी एकूण १० प्रकरणांमध्ये केली आहे :

| | |
|---|---|
| १) प्रास्ताविक व परिचय | ३) भाषा शिक्षण आणि साक्षरतेबाबत दृष्टिकोन |
| २) शिक्षणाची लक्ष्ये, अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती | ४) अध्यापनशास्त्र |

| | |
|---|---|
| ५) अध्ययन–अध्यापनासाठी आशयाची निवड | ८) अतिरिक्त निर्णायक क्षेत्रे |
| ६) अध्ययनातील प्रगतीसाठी मूल्यांकन | ९) प्राथमिक स्तराला जोडणारे दुवे |
| ७) वेळेचे व्यवस्थापन | १०) साहाय्यभूत शैक्षणिक परिसंस्था निर्मिती |

**परिशिष्टे :** या प्रकरणांशिवाय यामध्ये तीन परिशिष्टांचा समावेश आहे.

परिशिष्ट १ : अध्ययन निष्पत्तींचे उदाहरणांसह स्पष्टीकरण.

परिशिष्ट २ : पायाभूत स्तरासाठी निपुण भारत आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा या दोन्हींमधील क्षमतांची सांगड.

परिशिष्ट ३ : बालशिक्षणावरील भारतीय आणि जागतिक संशोधन. परिशिष्टे संपल्यावर पारिभाषिक शब्दावली आणि मराठी, इंग्रजी भाषांतील संदर्भ दिले आहेत.

## २) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – अपेक्षित सर्वांगीण बालविकास


**लक्ष्ये, अभ्यासक्रमातील ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती –** SCF : FS - 2024 हा आराखडा एससीईआरटी, महाराष्ट्र, पुणे या संस्थेने आयसीडीएसचे अधिकारी, अंगणवाडी सेविका/बालवाडी सेविका, शिक्षणतज्ज्ञ, शासकीय व अशासकीय व्यक्ती यांच्या मदतीने तयार केला.

### २.१) आराखड्यानुसार अपेक्षित बालशिक्षणक्रमाचे ध्येय :

वय वर्षे ३ ते ८ वयोगटातील प्रत्येक बालकाला इ. स. २०२५ पर्यंत मोफत सुरक्षित गुणवत्तापूर्ण आणि विकासाच्या दृष्टीने सुयोग्य वातावरण मिळवून देणारे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षण सहज उपलब्ध व्हायला हवे.

### २.२) पायाभूत स्तर : व्यक्तिविकास चित्राची मांडणी – भारतीय विचारधारा :

शिक्षणाचा उद्देश व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधणे हा असतो. भारतात याचा विचार झाला आहे. त्यानुसार मनुष्य हा पंचकोश म्हणजे पाच कोशांनी तयार झाला आहे. हे कोश म्हणजे जीवावरील आवरणे मानली आहेत. हे कोश खालील आकृतीमध्ये दाखविले आहेत.




पंचकोश विकास

त्यांचा विकास करणे, म्हणजे या आवरणातील क्षमता विकसित करणे असा आहे. शिक्षणातून या क्षमता विकसित करत बालकाचा हळूहळू संपूर्ण व्यक्तित्व विकास करता येतो.

भारतीय बालशिक्षण विकासामध्ये अनेक समाजसुधारक, तत्त्ववेत्ते व तज्ज्ञांनी योगदान दिले आहे. SCF : FS - 2024 मधील मुद्दा क्र. १.२.२ मध्ये त्याचा अल्प परिचय दिला आहे. पाश्चात्य विचारवंतांचे प्रायोगिक योगदान मुद्दा क्र. १.२.५ मध्ये दिले आहे.

**२.३) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ प्रमाणे बालकाचे सर्वांगीण विकासचित्र :**

**पायाभूत स्तर : लक्ष्ये, अभ्यासक्रमातील ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती : परस्परसंबंध**

SCF : FS - 2024 मध्ये बालकाचे सर्वांगीण विकासचित्र अभ्यासक्रमातील ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती असे उतरत्या क्रमाने मांडले आहे. हे SCF : FS - 2024 ने पाहिलेले बालविकासाचे एक भव्य स्वप्नच आहे. यातील घटकांचा अर्थ आणि एकमेकांशी असलेला संबंध पुढील सारणीमध्ये थोडक्यात पाहू.

| सर्वांगीण विकासाच्या पायऱ्या | शब्दचिन्ह | संकल्पना | अभिप्राय |
|---|---|---|---|
| **लक्ष्ये** | – | शिक्षणाची लक्ष्ये ही शिक्षणव्यवस्थेतील सर्व प्रयत्नांना दिशा देणारी व्यापक विधाने असतात. | |
| **विकासाची क्षेत्रे** (एकूण–५) | – | विकासाची क्षेत्रे म्हणजे सर्वांगीण विकासाचे ठळक घटक लक्षात घेऊन त्याचे पाडलेले भाग.<br>• शारीरिक विकास<br>• सामाजिक, भावनिक/मानसिक, नैतिक विकास<br>• बोधात्मक विकास/बौद्धिक विकास<br>• भाषा व साक्षरता विकास<br>• सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास/आत्मिक विकास | |

| सर्वांगीण विकासाच्या पायऱ्या | शब्दचिन्ह | संकल्पना | अभिप्राय |
|---|---|---|---|
| **ध्येये** (एकूण–१३) | **CG** Curricular Goal | • शिक्षणाचे ध्येय हे विकासक्षेत्राचा एक पैलू असतो.<br>• अभ्यासक्रमाची ध्येये ही पाठ्यक्रम विकसन आणि अंमलबजावणीसाठी उपयोगी ठरतात. उदाहरणार्थ शारीरिक विकास या क्षेत्रामध्ये तीन ध्येये आहेत. त्यापैकी एक ध्येय असे आहे की, बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. हे ध्येय साध्य होईल अशी रचना शारीरिक विकासाचा पाठ्यक्रम तयार करताना केली जाते.<br>• प्रत्येक क्षेत्राचा विकास झाला हे समजण्यासाठी त्याचा भाग असलेली ध्येये साध्य व्हावी लागतात.<br>पायाभूत स्तरासाठी एकूण १३ ध्येये आहेत. त्यांची विभागणी वर दिलेल्या पाच क्षेत्रांत केली आहे. एखादे ध्येय साध्य होण्यासाठी अनेक क्षमता साध्य व्हाव्या लागतात. या संदर्भात तक्त्याखालील उदाहरण वाचावे. | पाच विकास क्षेत्रे आणि त्यातील १३ ध्येये यांची सांगड या पुस्तिकेत परिशिष्ट (अ) मध्ये (पृष्ठ क्र. ८० व ८१) वर दिली आहेत.<br>ध्येयांना CG 1, CG 2... CG 13 असे क्रमांक दिले आहेत. |
| **क्षमता** | **C** Compe-tency | • क्षमता हे ध्येयाचे लहान भाग आहेत. क्षमतेचे निरीक्षण केले जाऊ शकते आणि ती साध्य झाली का हे मूल्यमापन करून पाहता येते.<br>• क्षमता C या अक्षरचिन्हाने दाखविल्या आहेत.<br>• काही ध्येयात एकापेक्षा अधिक क्षमता आहेत.<br>• प्रत्येक क्षमतेला विशिष्ट क्रमांक आहे. CG1 म्हणजे ध्येय एकमध्ये सहा क्षमता आहेत. त्यांचे क्रमांक C1.1, C1.2... C1.6 असे आहेत. CG 7 मधील तीन क्षमतांचे क्रमांक C7.1, C7.2, C7.3 असे आहेत.<br>• CG1 ते CG13 या 13 ध्येयात मिळून ६८ क्षमता आहेत. | ध्येये आणि त्यातील क्षमता यांची सांगड परिशिष्ट (अ) मधील विभाग ४ क्षमता या मुद्द्याखाली पाहता येईल. (पाहा पृष्ठ क्र. ८१ ते ८६)<br>क्षमता क्रमांक मांडणी, क्षमता चिन्ह C, डॅश ध्येय क्र. टिंब क्षमता क्र. उदा. C-2.4 म्हणजे दुसरे ध्येय. त्यातील चौथी क्षमता : वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो. |

| सर्वांगीण विकासाच्या पायऱ्या | शब्दचिन्ह | संकल्पना | अभिप्राय |
|---|---|---|---|
| **अध्ययन निष्पत्ती** | क्षमतांचे भाग | • अध्ययन निष्पत्ती म्हणजे, अध्ययन झाल्यावर अपेक्षित असणारी निष्पत्ती. याचा सोपा अर्थ एखादा घटक मुलांना शिकवल्यावर होणारे अध्ययन/वर्तन बदल आपल्या डोळ्यांसमोर असावेत. घटक शिकविल्यानंतर त्यांच्यात कोणते बदल हवे आहेत त्यांची यादी आधीच तयार हवी.<br>• शिकल्यावर बालकांमध्ये कोणते बदल अपेक्षित असतात? उदा. त्यांना काही गोष्टींची माहिती होते, कौशल्य मिळते किंवा वृत्ती विकसित होते. जसे की, मदत करण्याची वृत्ती. असे जे जे काही बदल व्हावे असे ठरवलेले असतात. ती विधाने (वाक्ये) लिहून काढली तर, त्या घटकाच्या अध्ययन निष्पत्ती मिळतात.<br>• क्षमता विकसित होण्यासाठी तिच्या अंतर्गत येणाऱ्या अध्ययन निष्पत्ती साध्य व्हाव्या लागतात. | प्रत्येक क्षमतेच्या अंतर्गत अनेक अध्ययन निष्पत्ती असतात. प्रत्येक क्षमतेसाठी परिशिष्ट १ मध्ये स्वतंत्र सारणी दिली आहे. यानंतर या सारणीमध्ये त्या क्षमतेशी संबंधित अध्ययन निष्पत्ती पाहता येतात. त्या एक किंवा अधिक असू शकतात. |
| **अध्ययन निष्पत्तींचे टप्पे** | अ, ब, क, ड, इ | • प्रत्येक अध्ययन निष्पत्तीचे अ, ब, क, ड, इ असे टप्पे दिले आहेत. हे टप्पे वय वर्षे ३ ते ८ या कालावधीत पूर्ण करायचे आहेत. | |

२.४) **ध्येय, क्षमता, अध्ययन निष्पत्ती, प्रत्येक अध्ययन निष्पत्तीचे अ, ब, क, ड, इ हे टप्पे यातील परस्परसंबंध :** क्षेत्र, ध्येय, क्षमता, अध्ययन निष्पत्ती, प्रत्येक अध्ययन निष्पत्तीचे अ, ब, क, ड, इ हे टप्पे यातील परस्परसंबंध खालील एक उदाहरण पाहून लक्षात येईल. यासाठी परिशिष्ट-१ मधील एका सारणीचे उदाहरण दिले आहे.

**परिशिष्ट-१ चे वाचन – उदाहरण : क्षमता C1.3 व अध्ययन निष्पत्तीची सारणी**

SCF : FS - 2024 च्या परिशिष्ट-१ मध्ये ५ क्षेत्रे, १३ ध्येये, प्रत्येक ध्येयाखाली क्षमता व अखेरीस प्रत्येक क्षमतेसंबंधित अध्ययन निष्पत्ती दिल्या आहेत. आपण ज्या वयोगटाला शिकवतो त्यासाठी नेमके काय अपेक्षित आहे हे समजून घेण्यासाठी यातील सारण्यांचे वाचन करता येणे गरजेचे आहे. त्यासाठी C1.3 या क्षमतेची नमुना सारणी निवडली आहे.

## C-1.3 : अध्ययन निष्पत्ती

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | **C-1.3 : वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो.** | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | • स्वतःच्या वस्तू जसे की पिशवी, बाटली, बूट, रुमाल इ. यांच्याबाबत सजग असतो. | • स्वतःच्या वस्तू योग्य जागी ठेवतो आणि योग्य जागेवरून घेतो. | • स्वतःच्या वस्तूंची चांगल्या प्रकारे देखभाल करतो. | • अभ्यासाचे साहित्य काळजीपूर्वक हाताळतो. | • शाळेची मालमत्ता, फर्निचर, पुस्तके आणि इतर साहित्य यांची काळजी घेतो. |
| २ | • मोठ्यांच्या मदतीने अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | • स्वच्छ पेले, ताटल्या ओळखतो आणि वापरतो. तसेच स्वतंत्रपणे अस्वच्छ (खरकटे) ताटल्या आणि भांडी ठरवलेल्या जागी ठेवतो. | • स्वतःच्या ताटल्या आणि भांडी स्वच्छ करतो. | • वर्गात आणि मैदानावर स्वच्छता राखण्यास सुरुवात करतो. | • वर्ग स्वच्छता आणि मैदान स्वच्छता यांमध्ये सहभागी होतो. |
| ३ | • इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतो. | • कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करायला सुरुवात करतो. | • नेहमी कचरा टाकण्यासाठी कचरापेटीचा वापर करतो. | • कचऱ्याचे सुका आणि ओला असे वर्गीकरण करायला सुरुवात करतो. | • योग्य प्रकारे कचऱ्याचे वर्गीकरण करतो. |

### ही सारणी कशी वाचणार? :

१) **C1.3 क्षमतेचे क्षेत्र :** शारीरिक विकास आहे.

२) **C1.3 मधील 1 हा अंक, क्षमतेचा ध्येय क्रमांक दाखवितो.**

Curricular Goal (CG1) बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

३) **C1.3 यातील 3 हा अंक ध्येय 1 मधील तिसरी क्षमता दाखवितो.** ध्येय १ मध्ये एकूण सहा क्षमता आहेत. 1.3 ही पहिल्या ध्येयातील तिसरी क्षमता आहे.

C1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवितो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.

C1.2 स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता याचा अवलंब करतो.

C1.3 वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो.

(या क्षमतेची सारणी आपण पाहात आहोत.)

C1.4 वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो.

C1.5 हालचालींमध्ये सहजता दाखवितो आणि योग्य रीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालविणे)

C1.6 असुरक्षित, धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो.

४) **अध्ययन निष्पत्ती :** सारणीत दाखविल्यानुसार C1.3 ही क्षमता आहे. या क्षमतेमध्ये 1, 2, 3 अशा एकूण तीन अध्ययन निष्पत्ती आहेत. हे क्रमांक सारणीच्या डाव्या बाजूला उभ्या स्तंभात दिसतील. प्रत्येक क्षमतेच्या अंतर्गत असणाऱ्या अध्ययन निष्पत्तींची संख्या वेगवेगळी आहे. C1.1 मध्ये चार अध्ययन निष्पत्ती आहेत.

५) **अध्ययन निष्पत्तीचे वयानुसार टप्पे : अ, ब, क, ड, इ :** अध्ययन निष्पत्तीचा स्तर वयानुसार वाढतो. खालील सारणीत पहिल्या अध्ययन निष्पत्तीचे अ, ब, क, ड, इ हे ५ टप्पे आहेत. यातील अपेक्षा डावीकडून उजवीकडे वाढत्या आहेत. अक्षरे पुढील वयोगट दाखवितात अ-३ ते ४, ब-४ ते ५, क-५ ते ६, ड-६ ते ७ व इ-७ ते ८ परंतु हे टप्पे त्या-त्या वयोगटानुसार पूर्ण होतीलच असे नाही. सर्व टप्पे ८ वर्षे पूर्ण होईपर्यंत पूर्ण व्हावेत अशी अपेक्षा आहे.

परिशिष्ट-१ मध्ये अशा अनेक सारण्या आहेत. सर्व तक्त्यांचे वाचन इथे घेतलेल्या उदाहरणानुसार करता येते. या वाचनासाठी थोड्या सरावाची गरज आहे.

## २.५) परिशिष्ट १ मधील विकासचित्र मांडणीची उपयुक्तता :

परिशिष्ट १ मधील विकासचित्र मांडणी समजून घेतली तर कोणते फायदे होतील?

- परिशिष्ट १ मध्ये आता नमुना सारणी पहिली त्याप्रमाणे अनेक सारण्या दिसतील. सर्व सारण्या मिळून ३ ते ८ वर्षे या वयोगटासाठी अपेक्षित संपूर्ण भव्य विकासचित्र आपल्या डोळ्यांसमोर येईल. त्याचा पहिला भाग असलेल्या ३ ते ५ वर्षे या बालवाटिका स्तराचे विकासचित्रही लक्षात येईल.
- अध्ययन निष्पत्ती वाचून मुलांकडून नेमक्या अपेक्षा कोणत्या ते समजेल. त्या साध्य करण्यासाठी योग्य कृती/उपक्रम नेमकेपणे ठरवता येतील.
- आपण घेत असलेल्या विविध कृतींमुळे कोणकोणत्या अध्ययन निष्पत्ती साध्य होत आहेत? किंवा त्यांचे अ, ब, क, ड, इ मधील कोणते टप्पे साध्य होत आहेत हे समजेल.
- दैनंदिन वेळापत्रक, साप्ताहिक, मासिक, वार्षिक नियोजन करताना सर्व ध्येये, क्षमता, निष्पत्ती, टप्पे यांना योग्य न्याय दिला जातो का हे समजेल. यातून शिकणे आणि शिकविणे या दोन्हीमध्ये अधिक नेमकेपणा येईल आणि आपल्या मनातले बालकाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार होत आहे की नाही हे ठरवायला मदत होईल.

# प्रकरण २
# राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर - भाग २
# अध्यापनशास्त्र व मूल्यांकन

## १) अध्यापनशास्त्राचा अर्थ :

अध्यापनशास्त्रामध्ये शिकवणे, शिकणे आणि या प्रक्रियेमधील आनुषंगिक बाबी यांची शास्त्रशुद्ध मांडणी असते. यामध्ये शिकणाऱ्या व्यक्तीमध्ये आंतर्बाह्य बदल घडवून आणण्यासाठी विविध गोष्टींचे नियोजन केले जाते. म्हणजेच बालके व त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, परिस्थिती, वातावरण, त्यांचा परिसर, त्यांच्या क्षमता, त्यांची कौशल्ये, आकलनशक्ती, त्यांचे वर्तन व मानसिकता या सर्व गोष्टी विचारात घेऊन शालेय वातावरणातील आवश्यक गोष्टीचे नियोजन करावे लागते.

### १.१) अध्यापनशास्त्राची तत्त्वे :

प्रत्येक शास्त्राला संशोधन आणि दीर्घ अनुभव यांचा आधार असावा लागतो. त्याप्रमाणे अध्यापन म्हणजेच शिकवणे या प्रक्रियेलाही काही आधारभूत तत्त्वे आहेत.

### १.२) नियोजन :

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया योग्य प्रकारे झाल्यावर बालकामध्ये अपेक्षित बदल घडतो, परंतु त्यासाठी उत्तम आखणी करावी लागते, वेळेचा सदुपयोग करून घ्यावा लागतो. वर्षभरासाठी, महिन्यासाठी, आठवड्यासाठी, एका दिवसासाठी अशी आखणी करून ठेवली, तर अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुयोग्य घडते.

### १.३) शिक्षक - बालक - पालक संबंध :

यामध्ये उत्तम सुसंवादाची गरज आहे. बालक हा शिक्षक-पालक यांच्यामधील महत्त्वाचा दुवा आहे. बालकाच्या भल्यासाठी दोघेही काम करत असतात.

### १.४) खेळाद्वारे अध्ययन :

खेळ हा बालकाच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे. त्याद्वारेच बालकाचे शिक्षण उत्तम होऊ शकते. उदा. चित्रकोडी, अंकजिना, शब्दजिना, अक्षरजिना, ठोकळे व त्याच्या रचना अशा खेळांतून उत्सुकता, जिज्ञासा जागी होते. प्रयोगशील वृत्ती विकसित होते. बालके स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला शिकतात. खेळताना बालके एकमेकांशी आंतरक्रिया करतात. त्यातून भाषिक विकासाला चालना मिळते.

## २) उदयोन्मुख साक्षरता आणि साक्षरता व संख्याज्ञान :

'आकार' बालशिक्षणक्रमामध्ये वाचन, लेखन, गणन याची सिद्धता किंवा पूर्वतयारी या आधारे आपण

बालकांसाठी कृती, उपक्रम घेत आहोत. त्याची औपचारिक म्हणजेच छापील अक्षर वाचता–लिहिता येणे, अंक, संख्या ओळखता येणे, मोजता येणे यासाठी पूर्वतयारी करून घेत आहोत. साक्षरतेकडे जाण्यापूर्वी काय काय करायचे असते, त्याबाबतीत बालकाचा विकास कसा होतो हे लक्षात घेऊन आखणी केली आहे, परंतु आता नव्याने साक्षरतेबाबत अजून एक महत्त्वाची संकल्पना उदयाला आली आहे. ही संकल्पना 'उदयोन्मुख साक्षरता' म्हणजेच Emergent Literacy अशी आहे.

## २.१) उदयोन्मुख साक्षरता :

साक्षरतेची जाणीव होणे म्हणजे, उदयोन्मुख साक्षरता असे म्हणावे लागेल. एकूणच वाचन–लेखन–गणन यांच्या पूर्वतयारीकडे जाण्यापूर्वीही वाचन–लेखन–गणन यासाठी बालकाच्या आजूबाजूच्या वातावरणात अनेक गोष्टी बालक बघत असते. त्याचाच वापर पुढे वाचन–लेखनासाठी होत असतो याची जाणीव होणे म्हणजे 'उदयोन्मुख साक्षरता' होय.

यासाठी आपण बालकाच्या अवतीभोवती योग्य वातावरण निर्मिती करायची म्हणजे साक्षरतेच्या पहिल्या पायरीला चालना मिळते. म्हणजेच–

- बालकांना वाचन साहित्याची ओळख करून देणे ही वाचनाची पहिली पायरी आहे.
- बालकाला लेखन साहित्याची ओळख होणे.
- साहित्य हातात कसे धरतात व वापरतात हे समजणे.
- लेखन कसे दिसते हे चित्राच्या स्वरूपात समजणे.
- छापील शब्द, अक्षरे त्यांचे ध्वनी समजू लागणे.
- बोलताना, वाचन करताना ठरावीक वेग असतो हे समजणे.
- वाचन करताना डोळे दोन्ही कडांना फिरतात, तसेच वरून खाली नजर फिरते हे समजू लागणे.

## २.२) भाषा साक्षरता :

- **मौखिक भाषेचे महत्त्व :** ० ते ८ वर्षे हा भाषा शिक्षणाचा महत्त्वाचा कालावधी. या कालावधीत बालके मौखिक भाषा लवकर आत्मसात करतात.
- **बहुभाषिकता :** बालके अनेक भाषा सहज शिकतात, बहुभाषिकतेमुळे त्यांच्या बोधात्मक, भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना मिळते.
- **मातृभाषा/घरची भाषा/परिचयाची भाषा :** बालकांमध्ये संवादकौशल्य विकसित होण्यासाठी, आत्मविश्वास वाढण्यासाठी, संकल्पना दृढीकरणासाठी, चिकित्सकवृत्तीचा विकास आणि सांस्कृतिक विकासासाठी पायाभूत स्तरावर मातृभाषेतून शिक्षण महत्त्वाचे ठरते.
- **L1, L2, L3 संकल्पना :** मौखिक स्वरूपात बालकाच्या मातृभाषेचा सतत वापर व्हावा, दर्जेदार बालसाहित्य निर्माण व्हावे, स्थानिक शिक्षकांची नेमणूक व्हावी, स्थानिक भाषेत

शब्दकोश निर्मिती व्हावी, आवश्यक तिथे फिरते शिक्षक नेमावे या बाबी भाषेबाबत आराखड्यात मांडल्या आहेत.


इतर भाषा किंवा विषय शिकविण्यासाठी मातृभाषेचा सेतू म्हणून वापर व्हावा, वर्गात शिक्षकांकडून जाणीवपूर्वक बालकांच्या मातृभाषेचा वापर केला जावा. बालके दोन–तीन भाषा मौखिक स्वरूपात गतीने शिकतात म्हणून भाषा विकासासाठी कविता, नाटक, गोष्टी, यांचा वापर केला जावा.

- **R1, R2, R3 संकल्पना :** बालकांमध्ये वाचन–लेखनाची संकल्पना R1 मधून विकसित होते, R1 ही प्राधान्याने L1 असावी.
- **छपाई समृद्ध साहित्याची उपलब्धता :** R1, R2 मधील सोपे शब्द, वाक्ये, चिन्हे, चित्रे शाळेच्या भिंतीवर चिकटवावीत.
- **वाचनकौशल्य विकसन :** चित्रमय पुस्तकातून शिक्षकांचे प्रकटवाचन, सहभागी वाचन आणि शेवटी स्वतः वाचन असे टप्पे असावेत. भारताचा इतिहास, संस्कृती, परंपरा यांवर आधारित वाचनसाहित्य हे गमतीदार व बालकांच्या भावविश्वाशी निगडित असावे, उदा. चित्रे, गोष्टीची पुस्तके, फलकवाचन इ.
- **लेखनकौशल्य विकसन :** ही केवळ एक शैक्षणिक कृती नव्हे, तर अभिव्यक्तीचा प्रकार आहे, उदा. रेखाचित्रे, फलकलेखन, स्तरनिहाय कृतिपुस्तिका लेखन. बालक वयाच्या ८ व्या वर्षापर्यंत R1 मध्ये स्वतंत्र वाचक व लेखक होणे अपेक्षित आहे.
- **वर्गातील सकारात्मक वातावरण/सकारात्मक वर्गसंस्कृती, वर्तन व्यवस्थापन, शिस्त, शिक्षकांची भाषा :** हे सर्व घटक एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. बालकास स्वयंशिस्त लागणे गरजेचे आहे, बालकाला स्वावलंबनाकडे नेणे हे शिक्षकांचेही कर्तव्य आहे. यासाठी वर्गवातावरण खूप सकारात्मक असावे. बालकावर दडपण न येता मोकळेपणा वाटला पाहिजे असे असावे. तसेच अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंदमय वातावरणामध्ये घडली, तर आपल्याला बालकांमध्ये अपेक्षित बदल घडताना दिसतात. शिक्षक हा घटक या संपूर्ण प्रक्रियेत खूप महत्त्वाचा असतो. शिक्षक या व्यक्तीचे अनुकरण केले जाते त्यामुळे त्यांचे बोलणे, त्यांच्या हालचाली, चेहऱ्यावरचे हावभाव, देहबोली जाणीवपूर्वक आदर्श असावे. बालक नकळत या सर्व बाबींचे निरीक्षण करून ते वर्तन आत्मसात करीत असते.

### ३) अध्ययन–अध्यापनासाठी आशयाची निवड, संघटन आणि संदर्भीकरण :

अध्यापनशास्त्राचा अर्थ जाणून घेतल्यावर प्रत्यक्ष अध्ययन–अध्यापनासाठी अत्यावश्यक गोष्टी कोणत्या हे माहीत करून घेणे महत्त्वाचे ठरते, कारण अध्यापनशास्त्र हा या प्रक्रियेचा पाया आहे.

## अध्ययन–अध्यापन प्रक्रिया




**३.१) अध्यापनशास्त्राची तत्त्वे लक्षात घेऊन सर्वप्रथम पाठ्यक्रम विकसित करावा लागतो :**

पाठ्यक्रम विकसित करताना काही तत्त्वांचा आधार असतो. पाठ्यक्रम कोणासाठी (टार्गेट ग्रुप) करत आहोत हे सर्वांत आधी लक्षात ठेवून, पुढे राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार मार्गदर्शक तत्त्वे वापरावीत. पाठ्यक्रम ज्ञानरचनावादातील तीन तत्त्वांच्या पायावर उभा करावा लागतो. ती म्हणजे सोप्याकडून कठिणाकडे, माहीत असलेल्या गोष्टींकडून माहीत नसलेल्या गोष्टींकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे. विषयानुसार पाठ्यक्रम तयार करावा लागतो.

**३.२) आशय संघटित करण्याचे विविध मार्ग :**

यामध्ये विचार असतो तो पाठ्यक्रमाला अनुसरून तयार होणारा आशय बालकांपर्यंत कसा पोहोचवावा. याचा यासाठी विशिष्ट दृष्टिकोन ठेवणे, साधन–साहित्य निर्मिती करणे, त्याची मांडणी व रचना ठरवणे, म्हणजेच बालकांपर्यंत सहजतेने पोहोचणे आणि त्यांना सहज उपलब्ध करून देणे हे मोठे काम असते.

३.३) याबाबत महत्त्वाची गोष्ट म्हणजे टार्गेट ग्रुप किंवा कोणासाठी काम चालू आहे हे लक्षात ठेवून प्रत्येक गोष्ट करणे. त्यानुसार नियोजन करून वेळेची आखणी, बैठक व्यवस्था, पुरेसे साहित्य, त्याची सहज उपलब्धी या बाबी तपासाव्या लागतात.

३.४) सर्वांत शेवटचा मुद्दा म्हणजे एकदा सर्व संघटन झाले की, प्रत्येक साहित्य कुठे, किती प्रमाणात, कसे वापरायचे, कसे मांडायचे, कशी रचना करायची या संदर्भानुसार व नियोजनानुसार वर्गातील व वर्गाबाहेरील वातावरण निर्मिती या गोष्टीकडे वळावे. बालकांमध्ये अपेक्षित बदल घडावेत, सर्वांना समान संधी मिळाव्यात, साहित्याची

अध्यापनशास्त्र संदर्भात अधिकच्या माहितीसाठी हा कोड स्कॅन करा.

समान वाटणी व्हावी, बालकांवर कोणतेही दडपण नसेल अशी वर्गसंस्कृती म्हणजेच सकारात्मक अध्ययनपूरक वातावरण निर्मिती करायला हवी.

### ४) बालकांच्या अध्ययनाच्या प्रगतीसाठी मूल्यांकन :

आतापर्यंत 'आकार' बालशिक्षणक्रमाच्या माध्यमातून आपण बालकाच्या प्रगतीचे पडताळा सूची व पद निश्चयन श्रेणी वापरून त्याद्वारे मूल्यमापन करत होतो. मग आताच्या अभ्यासक्रमात नव्याने काय आहे.

बालक जेव्हा आपल्या अंगणवाडीत प्रवेश घेते, तेव्हा त्याचा शिक्षण प्रवास सुरू होतो. घरामधूनही बालकाचे शिक्षण होतच असते; परंतु ते शिक्षण, समोर घडणाऱ्या प्रसंगातून, सहवासात येणाऱ्या व्यक्तींच्या बोलण्यातून, त्यांच्याबरोबर येणाऱ्या अनुभवातून घडत असते. मग अंगणवाडीत वेगळे काय असते? तर अंगणवाडीत बालकाला आखीवरेखीव, नियोजनबद्ध व रचनात्मक कार्यक्रम मिळतो. अध्ययन अनुभव मिळतात. सर्वांत विशेष असे की, दिले जाणारे अनुभव विशिष्ट हेतू समोर ठेवून आखले जातात.

विशिष्ट हेतू जर डोळ्यांसमोर असतील, तर ते हेतू पूर्ण झाले की, नाही याची तपासणी करावी लागते. जसे – आपण शाळेत परीक्षा देतो आणि त्यावर ठरत असते की, आपण पुढच्या वर्गात जाणार किंवा नाही. अगदी तसेच आपल्या अंगणवाडीत घडते, पण परीक्षा, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका असे काहीही न वापरता. बालके अंगणवाडीत रोज काही ना काही कृती करत असतात म्हणजेच बालके क्रियाशील असतात. आपण रोज त्यांना बघत असतो. आपल्या डोळ्यांसमोर, त्यांच्यात झालेले बदल घडत असतात. होणारे बदल देत असलेल्या अनुभवांमुळे घडत असतात. पण ते किती प्रमाणात झाले, किती वेगाने होत आहेत हे सर्व जाणून घ्यायला हवे. याचाच अर्थ शिक्षणाच्या प्रवासात बालकांची अधूनमधून मूल्यांकनाची साधने वापरून तपासणी करावी लागेल.

बालकाने अंगणवाडीत प्रवेश घेतला आणि त्याचा शिक्षण प्रवास सुरू झाल्यापासून साधारणपणे तीन वर्षे बालके आपल्यासोबत असतात. त्या काळात आपला मुख्य हेतू बालकांचा सर्वांगीण विकास घडवणे हाच असतो. पण विकास बरोबर होतो आहे की, नाही हे तपासणे आवश्यक आहे. यासाठी एक प्रक्रिया असते म्हणजेच वेळोवेळी बालकांचे निरीक्षण करणे आवश्यक असते, त्यासाठी त्याच्या नोंदी ठेवाव्या लागतात. बालकांना प्रश्न विचारून त्यांची भाषा, मौखिक प्रकटीकरण कसे आहे हे पाहावे लागते. बालके खेळताना त्यांच्या शरीराची ठेवण कशी आहे, ते पळतात कसे, इतरांबरोबर सहकार्याने खेळतात का, त्यांच्या वयानुसार सर्व क्रिया त्यांना करता येतात का हे पाहावे लागते.

ही पूर्ण प्रक्रिया सातत्यपूर्ण असावी लागते आणि त्याचा आढावा ठरावीक काळानंतर घ्यायचा असतो. म्हणजेच घेतलेल्या नोंदी, केलेली निरीक्षणे या सर्वांवरून त्या बालकाबद्दलचे, त्याच्या वर्तनाचे अर्थ आणि अंदाज घ्यायचे. त्याचा अहवाल तयार करायचा. त्याची स्वतंत्र संचयिका (फाईल/पोर्टफोलिओ) तयार करायची. यालाच बालकाच्या प्रगतीचे मूल्यांकन म्हणतात.

## ४.१) मूल्यांकनाची गरज व महत्त्व :

**गरज :**

१) बालकांची प्रगती ही वयानुरूप मानदंडानुसार चालू आहे की, नाही हे पाहता यावे.

२) शिक्षकांना बालकांबरोबर काम करण्याची योग्य दिशा मिळावी.

३) प्रत्येक बालकांची व्यक्ती विशिष्टता जाणून घेता यावी.

४) सर्वांगीण विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत आहे का हे जाणून घेता यावे.

**महत्त्व :**

१) मूल्यांकनामुळे बालकाची बलस्थाने बारकाईने शोधता येतात आणि कमतरता असेल तिथे आधारभूत गोष्टी पुरवता येतात. उदा. वाचादोष असेल, तर वाचातज्ज्ञांकडे पाठवता येते किंवा गाणी, गोष्टी, गप्पा अशा कृतींद्वारे मदत करता येते.

२) एखाद्या विकासामध्ये बालक कमी पडत असेल किंवा मागे पडत असेल अशावेळी मूल्यांकनाच्या मदतीने हस्तक्षेप (intervention) करता येतो. त्याचे स्वरूप व कारण शोधून लवकरात लवकर दोष निवारणास किंवा कमतरता दूर करण्यास मदत होते.

३) मूल्यांकनाद्वारे विश्लेषण केलेल्या माहितीच्या आधारे पालकांना बालकाच्या विकासाच्या प्रवासात क्रियाशील राहण्यास मदत होते.

४) मूल्यांकन, अध्यापन साहित्य निर्मितीस, अध्यापनाच्या नियोजनात साहाय्यभूत ठरते.

५) मूल्यांकन, बालकाच्या विकासाबाबत व सिद्धतेबाबत शिक्षकांना, अंतर्दृष्टी देते म्हणजेच बालकाचे अंतरंग जाणून घेण्याची क्षमता निर्माण करते.

## ४.२) मूल्यांकन पद्धती, साधने व प्रतिसादांचा अन्वयार्थ काढणे :

कोणतीही गोष्ट पद्धतशीरपणे होण्यासाठी संशोधने व अभ्यासाअंती निश्चित केलेल्या निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक असते. पायाभूत स्तरासाठी काम करताना मोठे आव्हान असते, कारण आपल्यासमोरील बालक अजून कोणत्याच बाबतीत सिद्ध नसते. परंतु त्याची प्रगती होत आहे का? याकडे लक्ष ठेवावेच लागते. अशावेळी बालकाच्या हालचाली, वर्गातील त्याचे वर्तन, त्याने काढलेली चित्रे, खेळताना इतर समवयस्कांशी त्याचे वागणे, प्रौढ व्यक्तींशी वागणे, बोलताना वापरली जाणारी भाषा आणि मूल्यमापनाच्या वेळी दिलेली उत्तरे, करत असलेल्या कृती, सर्व बाबतीतील क्रियाशीलता किंवा अक्रियाशीलता यावरून प्रगतीचे विश्लेषण करावे लागते.

यासाठी निरीक्षण व नोंदी, पडताळा सूची/तपास सूची, पालकांची मुलाखत, आवश्यकतेनुसार सातत्यपूर्ण निरीक्षण, बालकाने काढलेल्या चित्राचे विश्लेषण अशा साधनांचा वापर करावा

लागतो. उदा. बालक मैदानावर खेळताना कसे पळते या कृतीचे निरीक्षण केल्यास सर्वसाधारणपणे असे आढळते की, ३ वर्षांचे बालक हालचालीत सफाईदारपणा नसल्याने पळताना थोडे अडखळते. ४ वर्षांच्या बालकाच्या पळण्यात बराच सफाईदारपणा आलेला असतो. ५ वर्षांचे बालक मात्र वेगाने आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने पळू शकते. याचा अन्वयार्थ असा होतो की, पायाचे मोठे स्नायू जसे विकसित होत जातात तशी हालचालीत सुधारणा होते.

### ४.३) नोंदी, अहवाल व दस्तऐवज :

बालकाच्या प्रगतीच्या नोंदी ठेवणे महत्त्वाचे असते. ते महत्त्व आपण सर्वांत पहिल्या मुद्द्यात, मूल्यांकनाची गरज व महत्त्व मांडताना पाहिले आहे. मूल्यांकन, अध्यापन साहित्य निर्मितीस, अध्यापनाच्या नियोजनात साहाय्यभूत ठरते. मूल्यांकन, बालकाच्या विकासाबाबत व सिद्धतेबाबत शिक्षकाला अंतर्दृष्टी देते, म्हणजेच बालकाचे अंतरंग जाणून घेण्यास मदत करते. बालकाने शाळेत प्रवेश घेतल्यापासून सर्वांगीण विकासाच्या विविध नोंदींच्या संचयिका ठेवल्यामुळे नंतर त्यांचा संदर्भ घेता येतो व बालकाला मदत करता येते.

## ५) दिनचर्येचे व्यवस्थापन :

लहान बालकांसाठी सहज, सुलभ व सुनियोजित दिनचर्या अत्यंत महत्त्वाची असते. सुनियोजित दिनचर्येमुळे बालकांना दिवसभरात करावयाच्या क्रियांची माहिती होते. त्यामुळे वातावरणाशी समरस होण्यास मदत होते. तसेच त्यांच्यात सुरक्षिततेची भावना वाढीस लागते. योग्य दिनचर्या ही बालकांना विकासाच्या सर्वच क्षेत्रात पुरेशा अनुभवांची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाची असते.

### ५.१) दिनचर्येकरिता लक्षात ठेवावयाच्या बाबी :

- प्रत्येक कृतीचे नियोजन बालकाची अवधान कक्षा लक्षात घेऊन केले पाहिजे.
- दैनंदिन दिनचर्येचे आयोजन हे संस्थात्मक रचना, कामकाजाचे तास आणि कामकाजाचे दिवस यांची संख्या यावर आधारित असते.
- बालकाच्या स्वयंप्रेरित कृती, शिक्षक मार्गदर्शित कृती, गटात तसेच वैयक्तिक व जोडीने करावयाच्या कृती यांच्यामध्ये योग्य संतुलन असले पाहिजे.
- विविध कृती, मैदानी खेळ किंवा मुक्त खेळ यांना वेळ व प्राधान्य देणे आवश्यक असते.

### ५.२) ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठीची दिनचर्या :

३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी गोलावरील गप्पा/कथा वेळ/संकल्पना वेळ/गणनपूर्व कृती आणि अनुभव हे शिक्षक मार्गदर्शित, तर मुक्त खेळ, खेळ कोपरे, अभ्यास कोपरे यामध्ये बालकांसाठी स्वतंत्र कृती दिलेल्या आहेत.

### ३ ते ६ वर्षे वयोगटासाठी नमुना वेळापत्रक

| अ. क्र. | कृती | कालावधी (मिनिटे) |
|---|---|---|
| १) | मुक्त खेळ | ३० |
| २) | परिपाठ (Circle time) - प्रार्थना, चेतना व्यायाम, आरोग्य तपासणी, दिनदर्शिका, हवामान तक्ता, हजेरी, ओळखपत्र (Name tag activity), बातमी सांगणे. | १० |
| ३) | छोटी सुट्टी | १० |
| ४) | बोधात्मक विकास | ३० |
| ५) | गाणी | १५ |
| ६) | भाषा आणि साक्षरता विकास | ३० |
| ७) | मोठी सुट्टी | ३० |
| ८) | शारीरिक विकास (वर्गातील व वर्गाबाहेरील खेळ) | २० |
| ९) | सौंदर्यदृष्टीचा विकास व सर्जनशील कृती/परिसर परिचय/ विज्ञानानुभव (एक दिवसाआड) | २० |
| १०) | गोष्ट | १० |
| ११) | आज आपण काय केले/रोजचे सिंहावलोकन (Good Bye Circle time) | ५ |
| | **एकूण वेळ** | **२१० मिनिटे (३ तास ३० मि.)** |

**(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २०८)**

### ५.३) ६ ते ८ वर्षे वयोगटातील बालकांसाठीची दिनचर्या :

या वयोगटातील बालकांसाठीची दिनचर्या ही जास्त कालावधीची आणि अधिक संरचित असावी. यांना भाषेसाठी स्वतंत्र वेळ देणे आवश्यक आहे. साक्षरता, संख्याज्ञान आणि कला या विषयांसाठी स्वतंत्र तासिकांचे नियोजनही केले जाऊ शकते.

### नमुना दिनचर्या वेळापत्रक : इयत्ता पहिली व दुसरी

| अ. क्र. | दैनंदिन दिनचर्या | उपक्रम/कृती/विषय |
|---|---|---|
| १) | ३० मिनिटे | परिपाठ |
| २) | ३० मिनिटे | L1/R1 भाषिक संवाद |
| ३) | ३० मिनिटे | L1/R1 शब्द ओळख/शब्द प्रत्याभिज्ञान |
| ४) | १५ मिनिटे | छोटी सुट्टी |

| अ. क्र. | दैनंदिन दिनचर्या | उपक्रम/कृती/विषय |
|---|---|---|
| ५) | ६० मिनिटे | गणित |
| ६) | ३० मिनिटे | कला/हस्तकला |
| ७) | ६० मिनिटे | मोठी सुट्‌टी |
| ८) | ३० मिनिटे | L1/R1 वाचन/लेखन |
| ९) | ६० मिनिटे | L1/R1 मौखिक संवाद/गप्पा, शब्दओळख |
| १०) | १५ मिनिटे | छोटी सुट्‌टी |
| ११) | ३० मिनिटे | शारीरिक शिक्षण व आरोग्य/कार्यशिक्षण |

**(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २०९)**

### ५.४) शालेय वार्षिक दिनदर्शिका :

- एका शैक्षणिक कॅलेंडर वर्षात शालेय उपक्रम कोणत्या महिन्यात/आठवड्यात/दिवशी घ्यायचे याचे पूर्वनियोजन म्हणजे शालेय वार्षिक दिनदर्शिका होय.
- शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी सदर नियोजन तयार असणे गरजचे आहे.
- यामध्ये वर्षभरातील सर्व महत्त्वाच्या घडामोडींचा समावेश असावा.

## ६) अतिरिक्त निर्णायक क्षेत्रे :

बालकाच्या शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक बालकाचा सन्मान राखणारे, सुरक्षित, आश्वासक आणि सकारात्मक प्रतिसाद देणारे शैक्षणिक वातावरण प्रदान केले पाहिजे. यासाठी शिक्षक व शैक्षणिक संस्थांनी बालकांच्या विकासातील अडथळे शोधून त्यांना आवश्यक बाबी पुरविणे आवश्यक आहे.

- बालकाची वाढ व विकासात पहिली आठ वर्षे अत्यंत महत्त्वाची आहेत. सकस आहार, संगोपन आणि प्रेरणादायी, उत्साहपूर्ण वातावरण हे अध्ययन आणि विकासाच्या या टप्प्यावर महत्त्वपूर्ण ठरते.
- वयानुरूप अपेक्षित विकासाचे टप्पे गाठण्यात पडलेले लक्षणीय अंतर म्हणजे, विकासात्मक विलंब होय.
- विकासाच्या कोणत्याही क्षेत्रात सदर विलंब असू शकतो, उदा. शारीरिक, भाषिक, सामाजिक, भावनिक व बोधात्मक इत्यादी.
- विकासात्मक विलंब आणि दिव्यांगत्व यांमधील फरक अंगणवाडी सेविकांना ओळखता आला पाहिजे.

### ६.१) शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितता :

बालकाच्या विकासासाठी त्याला सर्वार्थाने सुरक्षा व सुरक्षितता पुरविली पाहिजे. यामध्ये त्याला शारीरिक, मानसिक आणि भावनिक सुरक्षितता देणे गरजेचे आहे. यासाठी वेगवेगळ्या कृती, उपक्रम घेता येतील. उदा.

**कृती क्रमांक १ :** गट तयार करून भूमिका पालन (Role Playing Game) घेऊन त्यामध्ये प्रत्येकाला –

१) तुला बक्षीस मिळाले...

२) मित्राने हातावर किडा ठेवला...

३) मैदानावर तुला साप दिसला...

४) कुत्रा तुझ्यावर भुंकला...

तर तुला काय वाटेल हे विचारून भावनिक सुरक्षिततेविषयी सांगता येईल.

### ६.२) बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधात्मक उपाय :

यासाठी बालकांना गोष्ट आणि खेळाच्या माध्यमातून शिक्षक जागरूक करू शकतात. सुरक्षित स्पर्श आणि असुरक्षित स्पर्श यांचा परिचय करून देऊ शकतात.


**कृती क्रमांक २ :** शारीरिक सुरक्षितता किंवा POCSO कायद्याविषयी सांगताना योग्य व अयोग्य स्पर्श (Good touch and bad touch) विषयीचा व्हिडिओ दाखवावा.

चांगला व वाईट स्पर्श (Good touch and bad touch) व्हिडिओ

## ७) प्राथमिक स्तराला जोडणारा दुवा :

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मधील सुधारित आकृतिबंधानुसार पहिली पाच वर्षे पायाभूत स्तरासाठी (वयोगट ३ ते ८ वर्षे) निश्चित करण्यात आली आहेत. त्यांपैकी पहिली तीन वर्षे (३ ते ६ वर्षे) प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षणाशी संबंधित आहेत. बालकाच्या संपूर्ण अध्ययन प्रक्रियेत पायाभूत स्तराला महत्त्व देण्यात आले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार बालक जेव्हा पायाभूत स्तरामधून (बालवाटिका) प्राथमिक स्तरावर (इयत्ता पहिलीत) जाते, तेव्हा शिक्षणप्रक्रियेत सातत्य आणि बदल असे दोन्ही आवश्यक असतात. पायाभूत स्तरावरील विकासाबरोबरच आवश्यक क्षमता आणि कौशल्ये यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करणे हा या स्तरावरील सर्वांत महत्त्वपूर्ण बदल आहे. यामध्ये साक्षरता, संख्याज्ञान, अनुमान, तर्क करण्याची क्षमता, निरीक्षण क्षमता, बोधात्मक क्षमता, माहिती गोळा करणे, माहितीचे विश्लेषण करणे, कला आणि क्रीडा यांमध्ये सहभाग घेणे, मूल्ये, विश्वास आणि सामाजिक कौशल्ये या सर्व महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे. या स्तरावर इयत्ता दुसरीच्या अखेरीस बालकांनी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त करणे अपेक्षित आहे.

## पायाभूत स्तरावरील शैक्षणिक रचना




**(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. २२५)**

### ७.१) विकासात्मक ध्येयाकडून अभ्यासक्रमातील क्षेत्राकडे :

विकासात्मक ध्येयाकडून अभ्यासक्रमातील क्षेत्राकडे जाताना दोन्ही स्तरांमध्ये एकसंधता असणे आवश्यक आहे. असे न झाल्यास बालकांच्या अध्ययनात अडथळा निर्माण होतो आणि पुढच्या स्तरावर शाळाबाह्य होण्याची शक्यता असते. पायाभूत स्तर आणि प्राथमिक स्तरामध्ये बालकांचा सहभाग, नोंदणी, पुनर्प्रवेश, संपादणूक वाढविण्यासाठी भौतिक सुविधा आणि शिक्षकांची नियुक्ती यांमध्ये दुव्यांची निर्मिती करणे गरजेचे आहे.

**अध्ययन दुव्यांची निर्मिती :**

१) अंगणवाडी/पूर्वप्राथमिक वर्ग हे प्राथमिक शाळेच्या आवारात किंवा परिसरात भरवले जावेत.

२) पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळा सुरू होण्याची वेळ एकच असावी.

३) पायाभूत स्तरावरील विविध कृती/उपक्रमांचे आयोजन करणे.

### ७.२) आशय, अध्यापन आणि मूल्यांकन पद्धतीत सातत्याने बदल :

पायाभूत स्तरांकडून प्राथमिक स्तराकडे जाताना आपणास आशय, अध्यापन आणि मूल्यांकन यामध्ये बालकांच्या अध्ययन क्षमतेनुसार वेळोवेळी बदल करणे आवश्यक आहे. प्राथमिक स्तरांमध्ये बालकांकडून स्वनिर्देशित कामाची अपेक्षा केली जाते. आशयाचे आकलन होणे गरजेचे असते. अध्यापनाच्या विविध कार्यनितीचा अवलंब करणे आवश्यक असते. पायाभूत स्तरावर बालकांचे मूल्यांकन मुख्यत्वे सातत्यपूर्ण निरीक्षणावर अवलंबून असते, तर प्राथमिक स्तरावरील मूल्यांकन कृती किंवा उपक्रम किंवा लिखित स्वरूपाची कार्ये यावर आधारित असावे.

## ८) साहाय्यभूत शैक्षणिक परिसंस्था निर्मिती :

राज्य अभ्यासक्रम आराखडा अंमलबजावणीसाठी आशय, अध्यापनशास्त्र आणि मूल्यांकनासाठी योग्य वातावरणाची गरज आहे. त्यासाठी शिक्षक, पालक, कुटुंब, पर्यवेक्षीय यंत्रणा व समाज यांच्या भूमिका या प्रकरणात स्पष्ट केल्या आहेत.

### ८.१) शिक्षकांना सक्षम करण्यासाठी खालील गोष्टींची आवश्यकता आहे :

- प्रेरणादायी वातावरण.
- व्यावसायिक शिक्षणाचा अनुभव.
- शिक्षकांसाठी सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षणे.
- जगभरातील अद्ययावत संशोधनांची माहिती पोहोचविणे.
- शिक्षकांना नियोजन, आशय, अध्यापनपद्धती यांमध्ये परिस्थितीनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य देणे.
- शिक्षकांनी बालकांचे मूल्यांकन करण्याच्या नवीन पद्धती, तंत्रे, साहित्य यांबद्दल अद्ययावत राहणे.

### ८.२) तंत्रज्ञानाचा वापर :

सध्या विविध गोष्टींसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. शिक्षणक्षेत्रामध्ये बालकांच्या क्षमता विकासासाठी विविध ॲप्सच्या मदतीने शिक्षकांपर्यंत अध्ययन-अध्यापन पद्धती पोहोचविणे. तसेच उपलब्ध साहित्य कशाप्रकारे वापरता येईल यासाठी मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. आपणही आपल्या वर्गातील विशेष गरजा असलेल्या व सर्वसामान्य बालकांसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करूया.

■■■

# प्रकरण ३
# खेळणी आधारित अध्यापनशास्त्र
## (Toy Based Pedagogy)

**प्रस्तावना :**

'खेळणी' हा खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धतीचा महत्त्वाचा घटक आहे. बालके प्रत्यक्ष अनुभवातून शिकतात व प्रत्यक्ष वस्तूंबरोबर खेळतात. बालके प्रयत्न करतात व अनुभव घेऊन शिकतात. वर्गातील वातावरणातून खेळण्याची आणि खेळण्यांची हाताळणी करून अनुभव घेण्याचीही भावना जोपासली पाहिजे. प्रत्येक बालकाच्या परिसरात अनेक स्थानिक खेळणी उपलब्ध असतात. त्यांचा उपयोग अध्यापन आणि अध्ययनासाठी महत्त्वाचा स्रोत म्हणून केला पाहिजे.

**खेळणी साधी असोत किंवा गुंतागुंतीची रचना असलेली असोत त्यात बालकांसाठी शिकण्यायोग्य काही ना काही असतेच.**

जेव्हा बालक खेळणे हातात धरते आणि हाताळते, तेव्हा त्याच्या कारककौशल्यांचा सराव आपोआप होतो. बालकाचा हस्त-नेत्र समन्वय दृढ होतो. खेळण्यांमुळे बालक ढकलणे, ओढणे, पकडणे, चिमटीत धरणे, वळवणे किंवा हात आणि शरीराचा साधन म्हणून वापर करते. ते बालकाच्या वाढीसाठी महत्त्वाचे असते. जेव्हा काही बालके ठोकळ्यांचा मनोरा बनवतात आणि शेवटी तो जमिनीवर पडताना पाहतात, तेव्हा ते काही संकल्पना शिकतात. जसे की, बालक पडणे व थांबणे या क्रियांबद्दल विचार करतात. एक कोडे बालकांना आकृतिबंध शोधण्यात मदत करते. जेव्हा बालके ठोकळे, बाहुल्या, प्राण्यांची खेळणी, चेंडू, खेळण्यातील गाडी किंवा लुटुपुटूची खेळणी वापरतात, तेव्हा त्यांच्या मनात एखादे कथाबीज तयार होते. त्यानंतर वास्तव जीवनाशी सांगड घालण्याची प्रक्रिया सुरू होते. बोर्ड गेम्स् उदा. सापशिडी, ल्युडो बालकांना साधे नियम पाळायला शिकवितात, तसेच भाषा व गणिताची समज वाढवायला शिकवतात.

कोडी सोडविण्यामुळे बालकांना तर्क करणे, समस्या सोडवणे आणि कार्यकारण संबंध प्रस्थापित करणे याला प्रोत्साहन मिळते. चिकणमाती, मणी, कोलाज साहित्य, रंग, पुसण्यायोग्य शाईचे ठसे यांसारख्या हस्तकला सामग्रीचा वापर बालकांच्या सर्जनशील अभिव्यक्तीसाठी उपयुक्त असतो. गुंतागुंतीची रचना असलेले संच आणि पूरक साधने बालकांना पुरवल्याने बालके वस्तू एकमेकांत कशा अडकतात आणि कशा बसतात याचे प्रयोग करतात. त्यामुळे बालकांची कारककौशल्ये विकसित होतात. चेंडू, बीनबॅग्ज (स्पर्श पिशवी) आणि दोरीवरच्या उड्या यांद्वारे शारीरिक सुदृढता वाढते. त्यातून बालकांचा आत्मविश्वास वाढवण्यास, इतरांसोबत मजा करण्यास आणि कारककौशल्ये विकसित होण्यास मदत होते.

## अध्ययन निष्पत्ती :

**अंगणवाडी सेविका...**

१) खेळ, खेळणी व मुले यांच्यातील परस्परसंबंध सांगते.

२) खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती व खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धतीचा अर्थ व स्वरूप सांगते.

३) खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती व खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धतीचा वापर स्पष्ट करते.

४) खेळण्यांचे विविध प्रकार व त्यांचा वापर सोदाहरण स्पष्ट करते.

५) खेळण्यांची प्रकारनिहाय निर्मिती करून अध्ययन अध्यापनात वापर करते.

६) खेळणी हाताळताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे स्पष्ट करते.

७) पालकांच्या मदतीने खेळणी निर्मिती संदर्भात सहभाग घेते.

### १) खेळ, खेळणी आणि मुले यांच्यातील परस्परसंबंध :

बालकांना निसर्गत: खेळायला आवडते. खेळात बालकांना सक्रिय राहायला आवडते. खेळ हे खेळण्यांबरोबर किंवा खेळणी न वापरताही खेळले जातात. खेळात शारीरिक, मानसिक आणि मनोरंजनात्मक कृती असतात. ज्यामध्ये निर्भेळ आनंद हेच उद्दिष्ट असते. खेळात केलेल्या सुसंगत कृतींमध्ये करमणुकीबरोबरच वर्तनात्मक, सामजिक आणि सकारात्मक उपलब्धींचा समावेश असतो. जसे - सहानुभूती, प्रेम, काळजी, संघ बांधणी, समस्या सोडवणे इ. कृती बालकांनी ठरवलेल्या असतात व नेहमीच आनंददायक आणि उस्फूर्त असतात.

खेळण्यांद्वारे बालकांमध्ये वैचारिक ज्ञान व कौशल्ये आत्मसात करण्यास नैसर्गिकरीत्या मदत होते. खेळण्यासाठी योग्य व पुरेशी खेळणी दिल्यास मुले स्वत: नवीन गोष्टी तयार करण्याचा आनंद घेतात. बालके खेळण्यांच्या साहाय्याने अधिक गतीने व चांगल्या पद्धतीने शिकतात. खेळण्यांद्वारे बालकांचा आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढतो.

### २) खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती :

#### २.१) खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती : अर्थ

खेळ आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती म्हणजे, खेळाद्वारे शिकणे व शिकविणे होय.

बालके खेळातून आनंददायी व गतीने शिकतात. 'खेळणे' या शब्दामध्ये बालकांसाठी मनोरंजक आणि गुंतवून ठेवणाऱ्या सर्व कृतींचा समावेश होतो. यामध्ये विविध शारीरिक खेळ, परस्पर संवाद, कथा सांगणे, सामायिक वाचन करणे, चित्रवाचन करणे, कोडी, बडबडगीते, संगीत यांचा समावेश असलेल्या आनंददायी कृती असू शकतील.


खेळ बालकांना कृतियुक्त, रचनात्मक व आनंददायी अध्ययन करण्यासाठी तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहेत.

खेळ बालकांना वेगवेगळ्या पद्धतीने चालना देतात. जसे की,

- खेळ बालकांना क्रियाशील ठेवतात.
- खेळ बालकांना शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देतात.
- खेळ बालकांच्या विचारांना चालना देतात.

## २.२) खेळाच्या विविध पद्धती :

बालकांच्या विकासासाठी खेळ विविध पद्धतीने आयोजित करता येतात.




१) मुक्त खेळ (Free play)

२) मार्गदर्शित खेळ (Guided play)

३) संरचित खेळ (Structured play)

### १) मुक्त खेळ (Free play) :

मुक्त खेळ बालकांनी संपूर्णपणे स्वत: सुरू केलेले आणि स्वयं-मार्गदर्शित खेळ असतात. मुक्त खेळ खेळताना, बालकांना काय खेळायचे आहे, कसे खेळायचे आहे आणि किती वेळ खेळायचे आहे याची निवड ते स्वत: करतात. यातून बालकांचे सामाजिक व स्व-नियमन कौशल्य विकसित होण्यास मदत होते.

मुक्त खेळात शिक्षक अप्रत्यक्ष भूमिकेत असतात. जसे की, खेळासाठी वातावरण निर्मिती करणे, खेळ खेळताना बालकांचे निरीक्षण करणे, गरज असेल तेव्हा मदत करणे.

**उदा.** कोडी सोडविणे, समवयस्कांसोबत भूमिका करणे.

https://youtu.be/A5nPiviQexE?si=e8kE2asPhfi1ZJte

मुक्त खेळाचा नमुना

### २) मार्गदर्शित खेळ (Guided play) :

खेळाच्या या प्रकारात बालके स्वत: कृतींची निवड करत नाहीत. अंगणवाडी सेविका सुलभकाचे काम करतात. विकासाच्या सर्व क्षेत्रांशी संबंधित कौशल्ये वाढविण्यासाठी मार्गदर्शित खेळ हे सर्वांत प्रभावी मानले जातात.

शिक्षकांना बालकांसोबत चर्चेत सहभागी होण्याची व प्रश्न विचारण्याची संधी मिळते. आरंभिक वर्षात मार्गदर्शित खेळ प्रभावी मानले जातात, कारण ते विशिष्ट अध्ययन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बालनिर्देशित अध्ययनावर लक्ष केंद्रित करतात.

उदा. चिकणमातीच्या मदतीने खेळ - विविध आकार व आकृतिबंध तयार करणे.

### ३) संरचित खेळ/दिग्दर्शित खेळ (Structured play) :

संरचित खेळ हे शिक्षक दिग्दर्शित असतात. ते आनंददायी, मजेशीर व खेळकर असतात. संरचित खेळ हे नियम व मार्गदर्शक सूचना असलेल्या शिक्षक दिग्दर्शित कृती असतात. पायाभूत स्तरावर विशिष्ट क्षमता विकसित करण्यासाठी संरचित खेळ सर्वांत उपयुक्त आहेत. खेळ व कृतींच्या माध्यमातून शिक्षक संरचित व खेळाधारित अध्ययन अनुभव देऊ शकतात.

https://youtu.be/YR6RmDlKdc4?si=33t5RtpvL3WT-Vog
संरचित खेळाचा नमुना

**उदा.** भाषिक खेळ : एक ओळ जोडून कथा तयार करणे,
गणितीय खेळ : संख्येएवढ्या उड्या मारणे.

खाली दिलेल्या तक्त्यात मुक्त खेळ, मार्गदर्शित खेळ, संरचित खेळांतील फरक समजून घेऊ या.

| | **मुक्त खेळ (Free play)** | **मार्गदर्शित खेळ (Guided play)** | **संरचित खेळ/दिग्दर्शित खेळ (Structured play)** |
|---|---|---|---|
| **भूमिका** | **बालककेंद्रित – बालक दिग्दर्शित** | **बालककेंद्रित – शिक्षक साहाय्यित** | **शिक्षककेंद्रित – बालकांचा सक्रिय सहभाग** |
| **बालके काय करतील?** | बालके खेळाचे सर्व दृष्टिकोन ठरवतात – काय करायचे, कसे खेळायचे, किती वेळ खेळायचे, कोणाबरोबर खेळायचे | बालके नियोजन करून स्वत: खेळ पुढे नेतात, ते मुक्त खेळाप्रमाणे खेळ खेळतात. | शिक्षक नियोजन करतात व मुले नियोजनाप्रमाणे सक्रिय भाग घेतात, नियम पाळतात. खेळ व कृतीमध्ये सहभागी होतात. |
| **अंगणवाडी सेविका/ शिक्षक काय करतात?** | शिक्षक वर्गात खेळासाठी प्रवृत्त करणाऱ्या वातावरणाची निर्मिती करतात. बालकांचे निरीक्षण करतात व त्यांनी मदत मागितल्यास मदत करतात. | शिक्षक खेळासाठी सुलभीकरण व मदत करतात. शिक्षक बालकांना प्रश्न विचारतात व त्यांच्यात सहभागी होऊन विशिष्ट अध्ययन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बालकांना विविध कृतींमध्येच मार्गदर्शन करतात. | अध्ययनातील क्रम लक्षात घेऊन शिक्षक विशिष्ट क्षमता विकसनासाठी नियम असलेले खेळ व कृतींचे काळजीपूर्वक नियोजन करतात. दैनंदिन अध्यापनात भाषिक व गणिती खेळ, निसर्ग फेरी, गाणी, बडबडगीते यांचे नियोजन करतात. |

## ३) खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती :

### ३.१) खेळणी म्हणजे काय?

'खेळणी' म्हणजे एखादी वस्तू अथवा त्यापासून बनविलेले साधन ज्याच्या मदतीने विविध मनोरंजक कृती करता येतात. ज्यातून बालक आनंद व अनुभव घेते.

अशी कोणतीही वस्तू जी बालकांना आकर्षक व मनोरंजक वाटते. बालके सहज त्या वस्तूला हाताळू शकतात. वस्तूंसोबत खेळता खेळता शिकतात.

### ३.२) खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती :

खेळणी वापरून शिकण्यासाठी एक अनुकूल वातावरण तयार करता येते. ज्यामध्ये बालके कोणत्याही भीतीशिवाय आणि खूप उत्सुकतेने आणि आनंदाने शिकतात.

खेळणी आधारित अध्ययन-अध्यापनाद्वारे बालक एकट्याने अथवा गटात कृतीद्वारे शिकते. वेगवेगळ्या कल्पनाशक्तींचा वापर करून बालके नवनिर्मिती करतात. या पद्धतीचा प्रमुख आधार खेळणी असतात. खेळणी वापरून एखादी संकल्पना समजण्यास, आत्मसात करण्यास व विश्लेषण करण्यास मुलांना साहाय्यक ठरते.

खेळणी आधारित अध्ययन-अध्यापन पद्धती मुलांच्या सर्वांगीण विकासास चालना देते. खेळणी ही मनोरंजनासोबतच अध्ययन अनुभवाचे साधन आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या हेतूने खेळणी ही उपयुक्त आहेत.

**लक्षात घेऊया..**

- खेळणी बालकांच्या कल्पनाशक्तीला व नवनिर्मितीला चालना देतात.
- खेळणी बालकांच्या सौंदर्यदृष्टीत वाढ करून आनंददायी शिक्षण घेण्यास मदत करतात.
- खेळणी बालकांना त्यांची आवड व शिकण्याची सवय जोपासण्यास मदत करतात.
- खेळणी बालकांमध्ये स्वातंत्र्य आणि जबाबदारीची भावना विकसित करण्यास मदत करतात.
- योग्य व पुरेशी साधने/खेळणी दिल्यास मुले स्वतः नवीन गोष्टी तयार करण्याचा आनंद घेतात.
- खेळणी वापरून बालके अधिक गतीने व आनंदाने शिकतात.
- खेळण्यांमुळे बालकांचा आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढतो.

## ४) खेळण्यांचे विविध प्रकार :

| खेळण्यांचे प्रकार | खेळणी - काही उदाहरणे | उपयोग/फायदे | QR Code/Link |
|---|---|---|---|
| १) लाकडी खेळणी | (१) ठोकळे<br>(२) वाहने<br>(३) पझल्स (puzzels)<br>(४) कटआऊट्स (प्राणी, पक्षी, फुले, भाज्या)<br>(५) वाहने<br>(६) रिंग संच कोडे<br>(७) भातुकली | ही लाकडापासून बनवलेली खेळणी असतात. यापासून विविध रचना करणे, वाहन खेळण्याचा आनंद घेणे, क्रमवारिता शिकण्यासाठी उपयोग केला जाऊ शकतो. यातून बालकांच्या कारककौशल्याचा, सर्जनशीलतेचा विकास होतो. | https://youtu.be/o6KQ2hwupkU?si=IIAFsz9brZXCzlss<br>लाकडी खेळणी बाजारपेठ |

| खेळण्यांचे प्रकार | खेळणी – काही उदाहरणे | उपयोग/फायदे | QR Code/Link |
|---|---|---|---|
| **२) धातूची खेळणी** | (१) भातुकली<br>(२) अवजारे<br>(३) गाड्या वगैरे | ही खेळणी वेगवेगळ्या धातूंपासून बनवली जातात. जसे: लोखंडापासून गाड्या, व्यावसायिकांची अवजारे, जे वापरून मुलांना आपल्या परिसरातील व्यावसायिकांच्या कामाचा परिचय होतो व मुले प्रत्यक्ष अनुभवातून काम करतात. जसे : बागकाम. | https://youtu.be/YGaL7UREv34<br>धातूची खेळणी बनविण्याची कृती |
| **३) कापडी खेळणी** | (१) बाहुल्या<br>(२) कठपुतळी<br>(३) बीन बॅग<br>(४) स्पर्श पिशवी | पारंपरिक खेळण्यातील बाहुली ही कापसाची बनवलेली असते. तिला विविध आकर्षक रंगामध्ये भरतकाम केलेल्या कापडाने सजवलेले असते. लहान–मोठ्या आकारांत बाहुल्या उपलब्ध असतात. नाट्यीकरणासाठी बाहुल्या वापरल्या जातात. बाहुलीला कुशीत घेऊन झोपताना बालकांमध्ये सुरक्षिततेची भावना विकसित होते. | <br><br> |
| **४) कागदी खेळणी** | (१) भिरभिरे<br>(२) वेगवेगळ्या चित्रांचे कटआऊट्स (आकार, पाने, फुले)<br>(३) तक्ते | कमी खर्चीक, सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यातून ही खेळणी बनतात. तसेच बालकांच्या दृष्टीने सुरक्षित व हाताळायला सोपी असतात. पर्यावरणपूरकही असतात. तसेच यापासून बालक स्वत: खेळण्यांची निर्मिती करू शकतात. भिरभिरे, बोट, विमान यांसारखी खेळणी वैज्ञानिक संकल्पना समजण्यासाठी उपयोगात येतात. | १) https://youtu.be/QOQYc0JR5k<br>भिरभिरे बनवण्याची कृती<br>२) https://youtu.be/Ss1zW4-Avu0?si=T3Y6QLYixSAhdtox<br>डुलणारे खेळणे |

| खेळण्यांचे प्रकार | खेळणी – काही उदाहरणे | उपयोग/फायदे | QR Code/Link |
|---|---|---|---|
| **५) मातीची खेळणी** | (१) फळे, भाज्या आणि प्राणी<br>(२) किल्ल्याचे साहित्य<br>(३) भातुकली | ही खेळणी मातीपासून बनवली जातात. बालक स्वत: खेळण्याची निर्मिती करतात. स्वनिर्मितीचा आनंद बालकांना यातून मिळतो. निसर्गासोबत सहवासाची संधी त्यांना मिळते. | https://youtu.be/OykhgOlvzz8<br>चिकणमातीपासून खेळणी बनविण्याची कृती |

## ५) खेळण्यांची निर्मिती :

खेळण्यांची निर्मिती करणे हे कौशल्याचे काम आहे. तरीही सातत्याने याबाबत काम केले असता त्यामध्ये प्रभुत्व मिळणे सहज सोपे आहे. खेळणी शून्य खर्चात तयार करणे शक्य आहे. त्यासाठी टाकाऊ वस्तूंचा सातत्याने संग्रह करणे गरजेचे आहे. यामध्ये आपण पालक आणि विद्यार्थ्यांची मदत घेऊ शकतो.

खेळणी तयार करताना बालकांची अवधान पातळी आणि स्मरणशक्ती वाढविण्यास मदत होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ज्यामुळे बालकांची अध्ययनाबद्दल सकारात्मक वृत्ती विकसित होण्यास मदत होते.

### ५.१) DIY (Do It Yourself) :

DIY (Do It Yourself) ही खेळणी स्वत: तयार करणे/विकसित करण्याची पद्धती आहे. खेळणी बनविण्यासाठी कागद, लाकूड, कापड, माती अशा स्वरूपाचे साहित्य वापरले जाते. DIY पद्धतीने बनवलेली खेळणी ही अल्प खर्चात व आपल्या जवळ असलेल्या उपलब्ध साहित्यातून सहज बनविता येतात.

तयार केलेली खेळणी आकर्षक असू शकतात. खेळणी कापड, बाटल्या, पुठ्ठ्याचे बॉक्स, दोरा, बांगड्या, बाटल्यांची झाकणे, डबे यांसारख्या सहज उपलब्ध वस्तूंपासून बनवली जाऊ शकतात.


ही खेळणी बालकांच्या तार्किक, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्य विकसनासाठी आव्हान निर्माण करतात.

### ५.२) कागदी खेळणी बनवणे :

**घडीकाम :** अर्धी घडी, चौकोनी घडी, त्रिकोणी घडी, डबल त्रिकोणी घडी, कागदाची घडी यांपासून तयार होणाऱ्या वस्तू : मासा, पिशवी (पॅकेट), कागदी बोट, विमान, भिरभिरे, कागदी फूल, कागदाचे तुकडे, बाहुली, कागदी बॉल, कागदी पपेट, मुकुट.

खोक्यापासून खेळणी : बिल्डिंग, गाडी, अंक

### १) घडीकामाचा मासा बनवणे :




**साहित्य :** घोटीव कागद

**कृती :**

- १५ सेमी × १५ सेमी मापाचा घोटीव कागद घ्यावा.
- चित्रात दाखवल्याप्रमाणे घडी घालून मासा तयार करावा.

### २) कागदी बोट पपेट :

**चला खेळणी तयार करूया...**

**साहित्य :** रंगीत कागद, बाटलीचे झाकण, कात्री.


**कृती :**



- A4 मापाचा निळ्या रंगाचा जाड कागद घ्यावा.
- १० सेमी लांब व ५ सेमी रुंद अशा पाच पट्ट्या कापून घ्याव्यात.
- त्याच्या पुंगळ्या बनवाव्यात. साधारण बोटात घालता येतील अशा त्या असाव्यात.
- चित्रात दाखवल्याप्रमाणे, नंतर पाण्याची टाकाऊ प्लास्टिक बाटलीच्या झाकणाने पाच गोल कापून घ्यावेत.
- त्या गोलावर चित्रात दाखवल्याप्रमाणे सूर्य, चांदण्या, ढग, पाऊस अशी चित्रे काढावीत किंवा रंगीत कागदापासून बनवावीत.

### ३) मुखवटा तयार करणे :

**साहित्य :** कार्डशीट कागद व दोरी, स्केचपेन



**कृती :**

- बालकाच्या चेहऱ्याच्या मापाचा जाड कागद घ्यावा.
- त्यावर चेहऱ्याची बाह्यरेषा काढावी. उदा. वाघाच्या चेहऱ्याची.
- आवश्यक तिथे रंग भरावे.
- योग्य ठिकाणी दोरी बांधावी.

५.३) **कापडी खेळणी :** बाहुली, सॉक्स पपेट आदी.


**चला खेळणी तयार करूया...**

**१) हाताने कठपुतळी बनवणे.**

**साहित्य :** सुती कापड किंवा उशीचे कव्हर किंवा जुने ड्रेस (पसंतीचा कोणताही रंग), कात्री, धागा आणि सुई, ब्लॅक मार्कर, डोळे तयार करण्यासाठी गुगली डोळे (बाजारात मिळणारे हलणारे डोळे) किंवा जुने कापड.

**कृती :**

- हाताची कठपुतळी बनवण्यासाठी जुने उपयोगात नसलेले स्वच्छ कापड घेणे.





- साध्या सोप्या पद्धतीने हँड पपेट बनवण्यासाठी, तुमचा तळहात तुमच्या कापडाच्या तुकड्यावर ठेवा. लक्षात घ्या की, मधली तीन बोटे एकत्र जुळवून ठेवणे आवश्यक आहे.





- तुमचा अंगठा आणि करंगळी वेगळे ठेवा.
- आता पेन्सिल किंवा मार्करने तुमच्या हाताची बाह्यरेषा काढा. कापडाचे दोन तुकडे एकमेकांवर ठेवा. कापडाच्या दुसऱ्या तुकड्यावर तुम्ही काढलेले किंवा तुमच्या तळहाताची बाह्यरेषा काढलेला भाग ठेवा.
- कापडाच्या दोन्ही तुकड्यांना बाह्यरेषेवर कापून घ्या. कापडाचे दोन्ही तुकडे एकाखाली एक व्यवस्थित आहेत याची खात्री करा. कापडाचे दोन तुकडे एकत्र बाह्यरेषेवर शिवून घ्या. तळाकडील भाग शिवू नका म्हणजे तुम्ही तेथून हात आत घालू शकाल.
- तुम्ही डोळे आणि तोंडासाठी दोऱ्याचा वापर करू शकता.
- बाहुल्यांवर ठिपक्यांची नक्षी काढण्यासाठी वेगवेगळ्या रंगाचे कापड वापरू शकता.

अशाप्रकारे हे पपेट तयार होते.

## ५.४) टाकाऊपासून टिकाऊ :

बाटलीपासून खुळखुळा, पपेट, करवंट्यांपासून टाळ, लाकडी भुशापासून चिमणी, रिकाम्या खोक्यापासून विविध वस्तू तयार करणे.


उदा. कार्डबोर्डच्या वस्तू – स्पर्शकार्ड, घड्याळ, रस्ता शोधण्याचा खेळ (लेसिंग बोर्ड)

**चला खेळणी तयार करूया...**

### १) शिवण पाटी :

**साहित्य :** पुठ्ठा/कार्डबोर्ड, दोरी/लोकर/सुतळी/काथ्या





**कृती :**

- आपल्याकडे उपलब्ध असलेला एखादा खोक्याचा किंवा कोणत्याही प्रकारचा पुठ्ठा किंवा कार्डबोर्ड घ्या.
- मुलांना हाताळण्यास सुलभ होईल एवढ्या आकाराचा पुठ्ठा किंवा कार्डबोर्ड असावा.
- वर्गव्यवस्थापनासाठी घेतलेला पुठ्ठा किंवा कार्डबोर्डवर आपण आपल्याला हवा असणारा आकार काढावा.
- काढलेल्या आकाराच्या बाह्यरेषेवर एका ठरावीक अंतराने छिद्रे पाडावी.
- पाडलेल्या छिद्रातून दोरी किंवा लोकर किंवा सुतळी किंवा काथ्या ओवण्यासाठी बालकांना प्रोत्साहित करावे.

### २) बाटलीच्या झाकणापासून खुळखुळा :

**साहित्य :** रिकाम्या पाण्याच्या बाटलीची झाकणे, खिळा, वायरचा तुकडा

**कृती :**



- जाड खिळा गरम करून बाटलीच्या विविध रंगांच्या झाकणांना छिद्रे पाडा.
- छिद्रे पाडलेल्या झाकणांमधून जुनी वायर टाकून त्यांना बांधून खुळखुळा तयार करा.

### ३) बाटलीचा खुळखुळा (शेकर) :



**साहित्य :** झाकण बंद असेल अशी कोणतीही प्लॅस्टिकची बाटली जी लहान मुलांच्या हातात बसू शकेल. डिंक, बटण, रंग, रंगीत चिकटपट्टी/रंगीत कागद टणक स्वरूपाच्या गोलाकार वस्तू घ्या. (जसे – छोटे खडे, वाळू, मणी, तांदूळ, ज्वारी, डाळी, वाळलेले मक्याचे दाणे, मिरीदाणे, शेंगदाणे, वाळलेल्या फळबिया, छोटे–छोटे दगड, चिंचोके)

**कृती :**

- खुळखुळ्यासाठी झाकण असलेली प्लॅस्टिकची रिकामी बाटली घ्या.
- बाहेरून त्या बाटलीला पेंटने रंग द्या अथवा रंगीत कागद/चिकट टेप चिकटवा.
- त्यावर बटण, चांदण्या इत्यादी डिंकाने चिकटवा आणि बाटली सजवा.
- जसे तुम्ही साहित्य टाकून बाटली भरत जाल, तसे त्याचा आवाज तपासून पाहा आणि त्यानुसार साहित्य काढा किंवा घाला.
- बाटलीचे झाकण घट्ट बसवून चिकटपट्टीने घट्ट बंद करा.


### ४) स्पर्शकार्ड :

**साहित्य :** ५'' × १०'' आकाराचा पुठ्ठा, सुतळी/काथ्या/लोकर/वाळू/रांगोळी/माती, कात्री, डिंक/खळ.









**कृती :**

- प्रथम ५'' × १०'' च्या आकाराचा कागदी पुठ्ठा घ्या.
- घेतलेल्या पुठ्ठ्यावर अक्षरांचे आकार किंवा रेषांचे आकार काढा.
- काढलेल्या अक्षरांचे आकार/रेषांचे नमुने यांना डिंक/खळ लावून घ्या.
- ज्या ठिकाणी डिंक/खळ लावलेला आहे. त्यावर सुतळी/काथ्या इत्यादी लावा.
- अशा पद्धतीने स्पर्शकार्ड तयार होतील.

## ६) खेळणी हाताळताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे :

१) खेळ व खेळणी यांची निवड करताना वयानुरूप आणि विकासानुरूप करावी.

२) कोणतीही खेळणी खेळायला देण्यापूर्वी बालकांची शारीरिक व मानसिक पूर्वतयारी करून घ्यावी.

३) बालकांना मुक्त खेळ, मार्गदर्शित खेळ व संरचित खेळ खेळण्यासाठी खेळणी उपलब्ध करून द्यावीत.

४) रंगीबेरंगी खेळणी निवडावीत.

५) खेळणी मुलांना हाताळण्यास सोपी व सुरक्षित असावीत. (खूप लहान किंवा खूप मोठी नसावीत, टोकदार व खडबडीत नसावीत.)

६) बालकांच्या परिसरातील व स्थानिक खेळणी निवडावीत.

७) शक्यतो खूप महाग खेळण्यांचा वापर टाळावा.

८) ज्या उद्देशासाठी खेळणी खेळण्यास देणार आहोत त्यातून तो उद्देश सफल व्हावा.

९) खेळणी खेळताना मुलांना आनंद मिळायला हवा.

१०) सर्व ज्ञानेंद्रियांना अनुभव मिळेल अशी खेळणी निवडावीत.

## ७) अंगणवाडी सेविका व पालक यांची भूमिका :

### ७.१) खेळणी निर्मितीमध्ये अंगणवाडी सेविकांचा सहभाग :

खेळणी आधारित अध्यापन पद्धतीत सेविकेची सक्रिय भूमिका असते कारण मुलांची विकास क्षेत्रे, वयोगट, आवड, प्रवृत्ती लक्षात घेऊन खेळण्यांची निवड किंवा निर्मिती करणे गरजेचे असते. स्थानिक परिसरातील वस्तूंचा खेळणी म्हणून वापर कसा करता येईल या विचाराने क्रियाशील राहणे आवश्यक आहे. टाकाऊ वस्तूंचा वापर करून खेळण्यांची निर्मिती कशी करता येईल हे देखील पाहावे. खेळत असताना मुलांच्या संख्येप्रमाणे खेळणी आहेत का? प्रत्येकास खेळण्यांनी खेळण्याची संधी मिळते का? हेही पाहणे महत्त्वाचे आहे. मुलांच्या विकास क्षेत्रानुसार खेळणी ज्या हेतूने खेळावयास दिली आहे तो हेतू साध्य होतो का याचे मूल्यमापन वेळोवेळी करणे आवश्यक ठरते. खेळणी निर्मिती व त्याचा परिणामकारक वापर करत असताना पालकांचाही सहभाग घेणे अपेक्षित आहे, ज्यामुळे पालकांची शैक्षणिक खेळण्यांविषयीची संकल्पना स्पष्ट होईल व घरीसुद्धा पालक मुलांना विविध खेळणी देऊन त्यांच्या विकासास हातभार लावतील.

## ७.२) खेळणी निर्मितीमध्ये पालकांचा सहभाग :


- सुलभक म्हणून कामकाज करणे.
- घर व परिसरातील साधनसामग्री गोळा करणे.
- वर्गीकरण करण्यास मदत करणे.
- खेळणी निर्मितीबाबत चर्चा करणे. कोणती खेळणी वापरू शकतो याची यादी बनवण्यास मदत करणे.
- जुनी खेळणी शाळेला देण्यास प्रोत्साहित करणे.
- टाकाऊ वस्तूंपासून नवीन खेळणी बनविणे.
- खेळ व खेळणी बनवण्यासाठी स्वतःहून सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे. खेळणी–बँक/ खेळणी–हाऊस/खेळणी–देणगी/खेळणी–ग्रंथालयाची रचना करणे.
- पालक/समाजातील खेळणी बनवणाऱ्या व्यक्तींना शाळेत पाचारण करणे.
- अंगणवाडी सेविकांनी पालक व मुलांना एकत्रितरीत्या खेळ व खेळणी तयार करण्यासाठी प्रोत्साहित करणे.


  **जसे :** मुखवटे, मोड–तोड–जोड करण्यासारखी खेळणी, मातीची, कागदाची खेळणी. अशाप्रकारे आपण पालक व कुटुंबाचा सहभाग घेऊन मुलांसाठी समृद्ध वातावरण तयार करू शकतो.


## ८) खेळण्यांचा अध्ययन-अध्यापनात वापर : क्षमता विकसन आराखडा

**विकासाचे क्षेत्र : १) शारीरिक विकास**

**CG-2** : बालके ज्ञानेद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

| क्षमता | खेळणी / साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| C-2.1 : आकार, रंग आणि त्यांच्या छटा यांच्यातील फरक ओळखतो. | द्विमितीय व त्रिमितीय चित्र |  | • चित्र दाखवून चित्राचे निरीक्षण करण्यास सांगतात.<br>• आकार व रंग ओळखण्यास सांगतात.<br>• चित्रातील फरक ओळखण्यास सांगतात. | • चित्राचे निरीक्षण करतात. आकार व रंग ओळखतात. फरक सांगतात. |
| C-2.4 : वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो. | वासाच्या वस्तू असलेली पेटी (स्मेल बॉक्स) |  | • बालकांना वस्तू उचलून त्याचा वास घेण्यास सांगतात. | • वास ओळखतात, सुगंध व उग्र वास असे वर्गीकृत करतात. |
| C-2.5 : विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते. | स्पर्शकार्ड |  | • स्पर्शकार्डाद्वारे बालकांना विविध स्पर्श करायला सांगून अनुभव देतात. | • स्पर्श करतात, स्पर्श ओळखतात, स्पर्शातील फरक ओळखतात व सांगतात. |
| **CG-3** सुदृढ व लवचीक शरीर विकसित होते. | | | | |
| C-3.2 : विविध शारीरिक कृतींमध्ये तोल समन्वय आणि लवचिकता दर्शवितो. | चेंडू व बादली |  | • चेंडू बादलीमध्ये टाकणे याबाबत कृती करून दाखवितात. | • सुचनेनुसार चेंडू बादलीत टाकतात. |

| क्षमता | खेळणी/ साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| C-3.3 : हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालीमध्ये अचूकता व नियंत्रण दर्शविते. | भिरभिरे |  | • भिरभिरे तयार करण्यासाठी कागदी घडी घालून दाखवितात. व भिरभिरे तयार करून घेतात. | • सूचनेनुसार कागदी घड्या घालतात. त्यानुसार भिरभिरे तयार करतात. भिरभिरे वाऱ्याच्या दिशेने पकडतात. |
| | ग्लासचा मनोरा स्टील/ प्लॅस्टिकचे ग्लास |  | • स्टील/प्लॅस्टिकचे ग्लास देऊन मनोरा तयार करण्यासाठी देतात. | • ग्लासच्या साहाय्याने मनोरा तयार करतात. |
| **विकासाचे क्षेत्र : २) सामाजिक, भावनिक व नैतिक विकास**<br>**CG-4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात. | | | | |
| C-4.2 : विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. | इमोजी कार्ड/पपेट |  | • विविध इमोजी दाखवितात. त्यातील भावना ओळखण्यास सांगतात.<br>• भावनेनुसार कृती करण्यास सांगतात. | • इमोजी ओळखतात. इमोजीतील भावनेप्रमाणे कृती करतात. |

| क्षमता | खेळणी/ साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| C-4.5 : शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो. | दिशादर्शक फलक |  | • दिशा सांगतात उजवी व डावी दिशा/बाजू दाखवितात. | • उजवी व डावी दिशा/बाजू ओळखतात व सांगतात. |
| **CG-5** बालके उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात. | | | | |
| C-5.1 : इतरांना मदत करण्यासाठी वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो. | रंगीत ठोकळे |  | • रंगीत ठोकळे गटात देतात.<br>• रंगानुसार गट करून दाखवितात. त्यानुसार कृती करून घेतात.<br>• ठोकळे जागेवर ठेवण्याची सूचना देतात. | • रंगीत ठोकळ्यांचे रंगानुसार गट तयार करतात. कृती पूर्ण झाल्यावर जागेवर ठेवतात. |
| **विकासाचे क्षेत्र : ३) बोधात्मक विकास**<br>**CG -7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची ओळख करून घेतात. | | | | |
| C-7.1 : वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक आणि वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो. | कापडी पक्षी |  | • कापडी खेळणी दाखवतात.<br>• त्याचे निरीक्षण करण्यास सांगतात. | • दिलेल्या खेळण्याचे निरीक्षण करून त्याविषयी एकमेकांशी संवाद साधतो. |

| क्षमता | खेळणी / साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| **CG-8** बालके प्रमाण, आकार व मोजमापे या गणितीय आकलन आणि क्षमतेद्वारे सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात. | | | | |
| C-8.8 : मूलभूत भौमितिक आकार ओळखतो, तयार करतो, वर्गीकरण करतो समजून घेतो, समजावून सांगतो. | वेगवेगळ्या आकारांच्या वस्तू |  | • वेगवेगळ्या आकारांच्या वस्तू देतात.<br>• त्यांचे वर्गीकरण करायला सांगतात.<br>• वर्गीकरणासंदर्भात प्रश्न विचारतात. | • वस्तूंच्या आकारानुसार वर्गीकरण करतात.<br>• वस्तूंच्या वर्गीकरणाच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे देतात. |
| **CG-2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. | | | | |
| C-2.2 : चिन्हे आणि प्रतीके यांकरिता दृक्स्मृती (Visual Memory) विकसित करतो. | स्मरणशक्ती खेळ– चित्र असलेले कार्ड |  | • चार वेगवेगळी चित्रे असलेली कार्डे दाखवतात.<br>• बाजूला एक कार्ड काढून ठेवतात.<br>• बाजूला ठेवलेले कार्ड ओळखण्यास सांगतात. | • कार्ड पाहतात.<br>• कोणते कार्ड बाजूला ठेवले आहे हे सांगतात. |
| **विकासाचे क्षेत्र : ४) भाषा व साक्षरता विकास**<br>**CG-9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्य विकसित करतात. | | | | |
| C-9.1 : साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो. | बाटलीच्या झाकणांचा खुळखुळा |  | • बाटलीच्या झाकणांच्या खुळखुळ्याच्या साहाय्याने बडबडगीत म्हणून घेतात. | • बाटलीच्या झाकणांच्या खुळखुळ्याच्या साहाय्याने बडबडगीत म्हणतात. |
| C-9.3 : अस्खलितपणे संभाषण करतो आणि अर्थपूर्ण संभाषण करतो. | खेळण्यातला टेलिफोन |  | • टॉय टेलिफोनच्या मदतीने बालकांना एकमेकांशी संवाद साधण्यास वातावरण तयार करतात. | • टॉय टेलिफोनच्या मदतीने बालके एकमेकांशी संवाद साधतात. |

**CG-10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.

| क्षमता | खेळणी / साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| C-10.9 : बालकांसाठी असलेली विविध पुस्तके वाचताना रुची दर्शविते. | चित्र पुस्तक |  | • चित्र पुस्तक दाखवतात.<br>• चित्रवाचन करण्यास सांगतात.<br>• प्रश्न विचारतात. | • चित्र पाहतात.<br>• चित्रांचे वाचन करतात.<br>• प्रश्नांची उत्तरे देतात. |
| C-10.8 : स्वत:ला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वत:चे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करतो. | वाळू/माती |  | • वाळू/मातीमध्ये लेखन करण्यासंदर्भात वातावरण तयार करतात.<br>• वाळू/मातीमध्ये लिहिण्यास सांगातात. | • वाळू/मातीमध्ये स्वलिपीतून लेखन करतात. |

**विकासाचे क्षेत्र : ५) सौंदर्यात्मक व सांस्कृतिक विकास**

**CG-12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण व आनंददायक मार्गाने कलेद्‌वारे व्यक्त करतात.

| क्षमता | खेळणी / साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| C-12.2 : संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वत:चा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो. | मुखवटा |  | • विविध प्रकारचे मुखवटे उपलब्ध करून देतात.<br>• मुखवटे बालकांना घालायला सांगतात.<br>• घातलेल्या मुखवट्याप्रमाणे कृती/अभिनय करण्यास वातावरण उपलब्ध करून देतात.<br>• सादरीकरणानंतर प्रोत्साहन देतात. | • बालके आपल्या आवडीचे मुखवटे घेतात.<br>• घेतलेल्या मुखवट्यांचे निरीक्षण करतात.<br>• मुखवटे घालतात.<br>• मुखवट्याला अनुसरून कृती/अभिनय करतात. |

| क्षमता | खेळणी / साहित्य नाव | चित्र | अंगणवाडी सेविका कृती | बालक कृती |
|---|---|---|---|---|
| C-12.3 : बालक कलेच्या माध्यमातून स्वत:च्या कल्पना व भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो. | पक्षी, प्राणी, वाहने यांच्या प्रतिकृती |    | • गटामध्ये कापडी खेळणी खेळण्यास देतात.<br>• खेळण्यांच्या साहाय्याने छोटे छोटे संवाद बोलण्यास सांगतात. | • बालक गटात कापडी खेळण्यांच्या मदतीने संभाषण व हालचाली करतो. |
| C-12.4 : कला माध्यमामध्ये सहयोगाने काम करतो. | कापडी खेळणी |  | • गटामध्ये कापडी खेळणी खेळण्यास देतात.<br>• खेळण्यांच्या मदतीने छोटी छोटी संभाषणे करण्यास प्रोत्साहन देतात. | • बालक गटात कापडी खेळण्याच्या मदतीने संभाषण व हालचाली करतो. |

**टीप :**

**खेळण्यांचा अध्ययन–अध्यापनात वापर :** क्षमता विकसन आराखडा यामध्ये नमुन्यादाखल/उदाहरणांसाठी काही CG व क्षमता विकसनासाठी खेळणी साहित्य, अंगणवाडी सेविका कृती व शिक्षक कृती देण्यात आल्या आहेत. याप्रमाणे अधिक कृती आपणास इतर क्षमता विकसनाकरिता घेता येतील.

# प्रकरण ४
# महाराष्ट्राचा 'जादुई पिटारा'

## प्रस्तावना

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) मध्ये ३ ते ८ वर्षे या वयोगटाला पायाभूत स्तर म्हटले आहे. या वयोगटातील, प्रत्येक बालकाला इ. स. २०२५ पर्यंत मोफत, सुरक्षित आणि उत्तम दर्जाचे आणि विकासाच्या दृष्टीने योग्य असे पूर्वप्राथमिक शिक्षण मिळावे, असे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. उत्तम दर्जाचे शिक्षण म्हणजे काय? तर पायाभूत स्तरावरील शिक्षणात गरजेप्रमाणे बदल करण्याची लवचीकता हवी. ते विकासाच्या अनेक अंगांना स्पर्श करेल, अशी विविधता असावी.



एनसीईआरटीमार्फत विकसित करण्यात आलेला 'जादुई पिटारा'.

पायाभूत स्तरावर खेळ हा शिक्षणाचा आत्माच आहे. खेळता–खेळता बालके खूप काही शिकतात; याउलट शिकणे हाही त्यांच्यासाठी एक खेळच असतो. खेळताना ती अगदी मनापासून गुंतून जातात, भान विसरतात. मित्र–मैत्रिणी आणि इतर मोठी माणसे यांच्याबरोबर खेळता–खेळता त्यांच्यात सामाजिक विकासाचे बीज पेरले जाते. खेळातील प्रत्येक कृतीमुळे मुलांच्या मनात काही विचार सुरू होतात आणि नवनवीन कल्पना सुचतात.

खेळणी वापरून आणि न वापरताही हे खेळ खेळता येतात. खेळणी हाताळताना त्यांना छोट्या–छोट्या गोष्टींचे नवल वाटते, कुतूहल वाटते, काहीतरी आव्हान वाटते व ते पूर्ण करताना आनंद मिळतो. खेळणी हाताळताना मुले ती उलटसुलट करून पाहतात, वेगवेगळ्या प्रकारे मांडून, जोडून, विस्कटून काही प्रयोग करतात, शोध घेतात. रंग, आकार, स्पर्श, इत्यादींचे कळत नकळत ज्ञान घेतात. खेळणी ही मुलांच्या दृष्टीने एक जादूच असते. इतक्या साऱ्या लाभांमुळेच बालशिक्षणात खेळ आणि खेळणी आधारित शिक्षणशास्त्र वापरावे, असा विशेष आग्रह आहे.

अंगणवाडी किंवा बालशिक्षणात काही ना काही खेळणी सध्या वापरली जातातच. परंतु सर्व ज्ञानेंद्रियांमार्फत ज्ञान मिळेल, अशी विविधता असणाऱ्या वाढ आणि विकासाच्या टप्प्यांशी सुसंगत अशा खेळण्यांचा नमुनासंग्रह एनसीईआरटीने तयार केला आहे. त्याचे नाव आहे 'जादुई पिटारा'. शिक्षण मंत्रालयाने २० फेब्रुवारी, २०२३ रोजी तो बालकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. या पिटाऱ्यामध्ये ५१ प्रकारच्या खेळण्यांचे साहित्य आहे. यात स्थानिक, पारंपरिक खेळण्यांचा समावेश करायला हरकत नाही. तसेच वेगळी खेळणी तयार करून वापरायलाही हरकत नाही, असे म्हटले आहे.

त्यानुसार एनसीईआरटीने तयार केलेल्या जादुई पिटाऱ्यावर आधारित महाराष्ट्र राज्याने देखील आपल्या राज्यातील अंगणवाडी व बालवाडीतील बालके व ताई यांच्यासाठी 'जादुई पिटारा' विकसित केला आहे. या 'जादुई पिटाऱ्या'त एकूण २८ प्रकारचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. येथे आपण महाराष्ट्राच्या 'जादुई पिटाऱ्या'तील साहित्य व त्याचा वापर करण्याविषयी माहिती समजून घेणार आहोत.

**अध्ययन निष्पत्ती :**

**अंगणवाडी सेविका...**




१) 'जादुई पिटाऱ्या'त समाविष्ट साहित्याची नावे सांगते.

२) विशिष्ट विकास क्षेत्रासाठी योग्य साहित्य निवडते.

३) एका पेक्षा अधिक विकास क्षेत्रासाठी उपयुक्त जादुई पिटाऱ्यातील साहित्याची नावे सांगते.

४) निवडलेल्या साहित्याच्या वापराची कार्यपद्धती स्पष्ट करते.

५) निवडलेल्या साहित्याच्या वापराने बालकांचा होणारा विकास स्पष्ट करते.

६) 'जादुई पिटाऱ्या'तील साहित्याच्या उद्देशानुसार प्रत्यक्ष वापराच्या कृती स्पष्ट करते.

७) 'जादुई पिटाऱ्या'तील साहित्याची निगा व वापरताना घ्यावयाची काळजी स्पष्ट करते.

महाराष्ट्राच्या 'जादुई पिटाऱ्या'मध्ये पुढील साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. आपण आता प्रत्येक साहित्य व त्याचा वापर समजून घेऊया.

### १) साहित्याचे नाव : लेसिंग बोर्ड



**लेसिंग बोर्ड**

**विकासक्षेत्र :**

➢ **शारीरिक विकास** : सूक्ष्म स्नायूंचा विकास, हस्त-नेत्र समन्वय

**साहित्याचा वापर :**

- बालकांना बोर्डवरील छिद्रांमधून लेस ओवण्यास सांगावे, तर मोठ्या वयोगटातील बालकांना लेसची गाठ मारायला शिकवून त्याचा सराव करण्याची संधी द्यावी.
- बालकांच्या जोड्या बनवून प्रत्येकास एक बोर्ड द्यावा. त्यांना त्यात लेस ओवण्यास सांगून त्यांची स्पर्धा घेता येईल. जो प्रथम पूर्ण करेल तो खेळ जिंकेल.
- बालकांना डोळे बंद करायला सांगावे आणि कोणत्याही चार छिद्रांमध्ये फक्त स्पर्शाच्या साहाय्याने लेस ओवण्यास सांगावे.
- मोठ्या वयोगटातील बालकांना बोर्डवरील छिद्रांमधून लेस ओवून विविध आकृतिबंध तयार करण्यास सांगावे.

## २) साहित्याचे नाव : मासे पकडायचा खेळ



मासे पकडायचा खेळ

### विकासक्षेत्र :

- **शारीरिक विकास** : सूक्ष्म स्नायूंचा विकास, हस्त-नेत्र समन्वय, स्पर्श संवेदना, अवधान कक्षा वाढण्यास मदत, एकाग्रता, सौंदर्यदृष्टी विकसित होण्यास मदत होते.
- **बोधात्मक विकास** : रंगांची ओळख, संख्याज्ञान, लहान-मोठा, वर्गीकरण, दृष्टिभेद
- **सामाजिक-भावनिक विकास** : सर्वांचा खेळ पाहणे, आपली खेळण्याची वेळ येण्याची वाट पाहणे. इतरांच्या आनंदात सहभागी होणे, मासा पकडला गेला की आनंदी होणे.

### साहित्याचा वापर :

- बालकांना रॉडच्या मदतीने ठरावीक वेळेत सांगितलेल्या संख्येचे मासे पकडायला सांगावे.
- बालकांना मासे पकडण्याच्या रॉडच्या मदतीने विशिष्ट रंगाचे मासे उचलून वर्गीकरण करण्यास सांगावे.
- बालकांना फक्त सर्व लहान मासे किंवा फक्त मोठे मासे पकडण्यास सांगावे.
- बालकांना दोन गुणधर्मांशी जुळणारे मासे पकडायला सांगावे. जसे की, मोठा लाल मासा किंवा लहान हिरवा मासा.
- बालकांना समान आकाराचे मासे पकडण्यास आणि वेगवेगळे करण्यास सांगावे.
- उपरोक्त कृती एकट्याने किंवा दोन-दोन बालकांच्या गटात करून घेता येतील. जोडी किंवा गटामध्ये सरावाने उपरोक्त कृतींच्या स्पर्धा घेता येतील.
- मासे एका पिशवीत ठेवावेत. बालकांना फक्त स्पर्शाच्या साहाय्याने समान आकाराचे मासे शोधायला सांगावे.

## ३) साहित्याचे नाव : पेग बॉक्स



पेग बॉक्स

### विकासक्षेत्र :

- **शारीरिक विकास** : सूक्ष्म स्नायूंचा विकास, हस्त-नेत्र समन्वय.
- **बोधात्मक विकास** : रंगांची ओळख, संख्याज्ञान, लहान-मोठा वर्गीकरण.

**साहित्याचा वापर :**

- बालकांना कोणत्याही एका रंगाचे नाव सांगून त्याच रंगाचा एक पेग निवडून छिद्रात घालायला सांगावे. त्याचप्रकारे प्रत्येक बालकाला नवीन रंग सांगावेत.
- बालकांचे छोटे गट तयार करावेत. गटातील प्रत्येक बालकाला समान संख्येने पेग वाटावेत. नंतर 'जादूच्या पिटाऱ्या'तील फासे द्यावेत. प्रत्येकाला फासे टाकण्याची संधी द्यावी. फाशावर आलेल्या संख्येप्रमाणे आपल्या जवळील पेग लावायला सांगावे. ज्या मुलाचे सर्व पेग आधी संपतील तो खेळ जिंकेल.
- बालकांना एका रंगाचे पेग दुसऱ्या रंगाच्या छिद्रात घालण्यास सांगावेत. उदा. निळे पेग हिरव्या छिद्रांमध्ये आणि लाल पेग नारंगी छिद्रांमध्ये.
- बालकांना पेग बॉक्सवर पेगच्या साहाय्याने वेगवेगळे आकार आणि आकृतिबंध बनवायला सांगता येतील.
- फळ्यावर एक संख्या लिहावी आणि बालकांना तितके पेग मोजून बॉक्सवरील छिद्रांमध्ये घालायला सांगावेत. ही क्रिया 'जादुई पिटाऱ्या'तील मोजणीच्या वस्तू, कार्ड वापरून देखील करता येईल.

## ४) साहित्याचे नाव : टच कार्ड

**विकासक्षेत्र :**

➢ **शारीरिक विकास** : स्पर्श संवेदना



टच कार्ड

**साहित्याचा वापर :**

- बालकांना वेगवेगळी कार्डे देऊन, त्यांना जाणवणाऱ्या स्पर्शाबद्दल प्रश्न विचारावेत. जसे की, या कार्डचा स्पर्श कसा जाणवत आहे? बालकांना या अनुभवाबद्दल बोलायला प्रोत्साहित करावे. आवश्यकतेनुसार सूचक प्रश्न विचारावेत. त्या स्पर्शासारख्या समान स्पर्श असलेल्या इतर वस्तूंची नावे सांगण्यात यावीत.
- बालकाच्या डोळ्यांस कापडाची पट्टी बांधावी किंवा डोळे बंद करण्यास सांगावे आणि फक्त स्पर्शाच्या आधारावर दोन समान स्पर्शांच्या कार्डांची जोडी बनवायला सांगावे.
- बालकांमध्ये टच कार्ड वितरित करावेत. त्यांना समान स्पर्शाचे कार्ड असलेल्या इतर मुलांसोबत जोड्या बनवायला सांगावे.
- टच कार्ड एका पिशवीत ठेवावे. बालकांना स्पर्शाच्या साहाय्याने एक मऊ आणि एक खरबरीत कार्ड शोधायला सांगावे.

- बालकांना एक–एक टच कार्ड दाखवून त्याचा स्पर्श करावा. तसा समान स्पर्श असलेल्या वर्गातील वस्तू शोधण्यास सांगावे किंवा या उलट वेगवेगळ्या वस्तू बालकांसमोर ठेवाव्यात. बालकांना त्या वस्तूंना स्पर्श करून ज्या वस्तू मऊ वाटतात, त्यांच्यासाठी सॉफ्ट/मऊ कार्ड आणि खडबडीत वाटणाऱ्या वस्तूंसाठी रफ (खडबडीत) कार्ड दाखवायला सांगावे.

## ५) साहित्याचे नाव : मोजणीचे मणी

### विकासक्षेत्र :

- **शारीरिक विकास :** सूक्ष्म स्नायूंचा विकास, हस्त–नेत्र समन्वय, ट्रायपॉड ग्रीप विकसित होते. (पेन्सिल, पेन हातात धरण्यासाठी तीन बोटांची पकड आवश्यक असते.)
- **बोधात्मक विकास :** रंगांची ओळख, संख्याज्ञान, लहान–मोठा वर्गीकरण



**मोजणीचे मणी**

### साहित्याचा वापर :

- बालकांना वेगवेगळ्या रंगांचे मणी एकत्र मिसळून द्यावे आणि त्यांना रंगनिहाय मणी वेगळे करून वर्गीकरण करण्यास सांगावे.
- एका ओळीत रिकामे कप किंवा वाट्या ठेवाव्यात. बालकांना एकावेळी एका कपात एक किंवा दोन मणी ठेवून शर्यत पूर्ण करायला सांगता येईल.
- टॅगवर दिलेल्या संख्येनुसार बालकांना दोऱ्यांत मणी ओवायला सांगावे. नंतर हे मणी ओवताना विशिष्ट रंगाचे मणी ओवण्यास सांगता येईल.
- बालकांना तोंडी विशिष्ट एक अंकी संख्या सांगावी. त्या संख्येप्रमाणे टॅगची दोरी निवडायला सांगावे. निवडलेल्या टॅगच्या संख्येनुसार मणी ओवायला सांगता येईल.
- बालकांना दोऱ्यावरील टॅगप्रमाणे समान रंगाचे आणि संख्येचे मणी ओवण्यास सांगावे.
- बालकांना टॅगवरील फुलांच्या पाकळ्या मोजायला सांगावे, टॅगवर दिलेल्या फुलांच्या रंगाशी पाकळ्यांच्या संख्येइतके जुळणारे मणी दोऱ्यात ओवायला सांगावे.
- कमी–अधिक मणी असलेले दोन गट तयार करावेत. नंतर बालकांना अधिक मणी किंवा कमी मणी असलेला गट निवडण्यास सांगावे.
- बालकांचे छोटे गट करून प्रत्येकास समान संख्येचे मणी आणि एक दोरा द्यावा. वर्गातील सर्व बालकांना खेळ खेळण्याची संधी मिळेल, असे पाहावे.
- मणी गोळा करण्याची शर्यत–मणी आणि टॅग ओळीत ठेवावेत. बालकांना टॅग उचलून, सूचित संख्येचे मणी ओवून शर्यत पूर्ण करायला सांगावे.

- मोठ्या गटातील बालकांना दोन वेगवेगळ्या वाट्यांमधील मणी एकत्र करून मणी मोजायला सांगावे.
- प्रत्येक दोऱ्यात काही मणी ओवून मोठ्या गटातील बालकांना मोजण्यास सांगावे आणि टॅगवर लिहिलेली संख्या पूर्ण करण्यासाठी उर्वरित मणी दोऱ्यात ओवण्यास सांगावे.
- मोठ्या गटातील बालकांना टॅगवरील संख्येनुसार आणि विशिष्ट आकृतिबंधानुसार दोऱ्यात मणी ओवण्यास सांगावे.

## ६) साहित्याचे नाव : आइस्क्रीमच्या काड्या



आइस्क्रीमच्या काड्या

### विकासक्षेत्र :

➢ **बोधात्मक विकास :** रंगाची ओळख, मोजणी, वर्गीकरण, कमी जास्त, आकृतिबंध, आकार

### साहित्याचा वापर :

- बालकांना आइस्क्रीमच्या रंगीत काड्यांचे रंगांच्या आधारे वेगवेगळ्या रंगांमध्ये वर्गीकरण करायला सांगावे.
- बालकांना आइस्क्रीमच्या रंगीत काड्या आणि चित्रपॅटर्न कार्ड देऊन त्यांना कार्डावर दाखविलेली आकृती काड्या जोडून बनविण्यास सांगावे.
- बालकांना आइस्क्रीमच्या रंगीत काड्या देऊन त्यांना त्यांच्या कल्पनेनुसार काड्या जोडून वेगवेगळे आकार बनविण्यास सांगावे.
- बालकांना कोणतीही एक संख्या सांगावी. समान संख्येच्या काड्या मोजून देण्यास सांगावे.
- बालकांना कप्प्याच्या बोर्डवर दिलेल्या रंगानुसार आइस्क्रीमच्या काड्या ठेवायला सांगावे.
- मोठ्या गटातील बालकांना क्रियाकार्डवर दाखवल्याप्रमाणे काड्यांपासून आकृत्या बनविण्यास सांगता येतील.
- बालकांना काड्यांच्या मदतीने मोजणी करण्याची संधी देता येईल.
- उपरोक्त कृती गटांमध्ये देखील करून घेता येतील.
- बालकांना काड्या द्या आणि मोजायला सांगा. त्यांना ठरावीक संख्येच्या काड्या बाजूला काढून उरलेल्या काड्या पुन्हा मोजायला सांगावे.
- बालकांना दोन रंगांच्या काड्या सम प्रमाणात देऊन एकास–एक संगती करण्यास सांगता येईल.
- बालकांना काड्यांच्या मदतीने आकृतिबंध तयार करण्यास सांगता येईल. जसे की, लाल–पिवळी–लाल–पिवळी काडी. दोन लाल–एक पिवळी, दोन लाल–एक पिवळी काडी इत्यादी.

- दोन रंगांच्या काड्या विषम प्रमाणात देऊन एकास–एक संगती करण्यास सांगावे. यांतून कमी आणि जास्त प्रमाण समजण्यास मदत करता येईल.

## ७) साहित्याचे नाव : प्राण्यांच्या बोट बाहुल्या (फिंगर पपेट)



प्राण्यांच्या बोट बाहुल्या

### विकासक्षेत्र :

➢ भाषा विकास व साक्षरता विकास

➢ सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास

### साहित्याचा वापर :

- प्राण्यांच्या बोट बाहुल्या वापरून बालकांना वेगवेगळ्या प्राण्यांच्या कविता म्हणून दाखवा आणि त्यांना तुमच्याबरोबर म्हणायला प्रोत्साहित करावे.
- बालकांना पाळीव प्राण्यांच्या बोट बाहुल्या दाखवाव्यात आणि त्यांना त्यांच्या राहण्याच्या जागेबद्दल सांगावे. त्यांना प्रत्येक प्राण्याचे आवाज किंवा हालचाली करून दाखविण्यास सांगावे. जसे की, ही गाय आहे. गाय गोठ्यात राहते, इत्यादी.
- गोष्ट, छोटे संभाषण, छोटे संवाद, गोष्टीचे नाट्यीकरण सादर करण्यासाठी प्राण्यांच्या बोट बाहुल्या वापराव्यात.

## ८) साहित्याचे नाव : कठपुतळी आणि बाहुली



कठपुतळी



बाहुली

### विकासक्षेत्र :

➢ भाषा विकास व साक्षरता विकास

➢ सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास

### साहित्याचा वापर :

**१) कठपुतळी :**

- बालकांना वर्तुळात बसायला सांगावे. 'सर्कल टाइम' किंवा 'मुक्त गप्पा' यासाठी कठपुतळीचा वापर करावा.
- बालकांना कठपुतळी वापरून एखाद्या विषयावर बोलण्यास प्रोत्साहित करावे.
- कठपुतळी बाहुलीचा वापर करून कृतियुक्त गीत सादरीकरण, गोष्ट सांगणे व सादरीकरण करणे, संवाद व संभाषण, नक्कल करणे, यासाठी वापर करता येईल.
- कठपुतळीच्या मदतीने बालकांना स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लावता येतील.
- सकाळी बालकांचे अंगणवाडीत स्वागत करण्यासाठी कधी–कधी कठपुतळीचा वापर करता येईल.

## २) बाहुली :

- बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बाहुलीकडे बोट दाखवून बालकांना शरीराच्या वेगवेगळ्या भागांबद्दल सांगावे. बाहुलीचा वापर करून त्यांना आंघोळ कशी करावी किंवा हात कसे धुवावे, ते दाखवावे. आरोग्य, स्वच्छता आणि चांगल्या सवयींशी संबंधित संकल्पनांचा परिचय करून देण्यासाठी आपल्याला बाहुलीचा वापर करता येईल.
- बालकांना बाहुली वेगवेगळ्या जागेवर ठेवण्यास सांगावे; ज्याद्वारे आत–बाहेर, वर–खाली, मागे–पुढे या संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल. जसे की, बाहुली खुर्चीवर ठेवा किंवा टेबलाखाली ठेवा.
- बालकांना अर्धवर्तुळात बसवावे. बाहुली अशाप्रकारे पकडा की, सर्व बालके ती पाहू शकतील. कपडे आणि त्यांचे महत्त्व याबद्दल बोलावे. बालकांना बाहुलीचे कपडे घालायची कृती करायला सांगावी. अशाच प्रकारे घरी ते स्वतःचे कपडे देखील घालू शकतात, असे त्यांना प्रोत्साहित करावे.
- 'पास द डॉल' हा खेळ खेळण्यासाठी बालकांना वर्तुळात बसवावे, संगीत सुरू करावे आणि बालकांना बाहुली एकाकडून दुसऱ्याकडे पुढे द्यायला सांगावी. एकदा संगीत थांबले की, ज्या बालकाकडे बाहुली आहे, त्याला त्याचे नाव सांगणे, आवडता खाऊ सांगणे, विशिष्ट अक्षराने सुरू होणारे शब्द सांगणे अशा कृती घेता येतील. एका वेळी एकाच प्रकारची कृती घ्यावी.
- बाहुलीघरात मुक्त खेळासाठी उपलब्ध करून द्यावी.

## ९) साहित्याचे नाव : कप्प्यांचा बोर्ड

### विकासक्षेत्र :

➢ **बोधात्मक विकास :** विचारक्षमता विकसित होण्यास मदत व मोजणी.



कप्प्यांचा बोर्ड

### साहित्याचा वापर :

- बालकांना ऑब्जेक्ट कार्डवरील वस्तूचा रंग ओळखायला सांगावे. त्यानंतर ते कार्ड समान रंगाच्या कप्प्यांत ठेवायला सांगावे.
- वर्गात वेगवेगळ्या ठिकाणी कलर ऑब्जेक्ट कार्ड आणि क्रेयॉन किंवा रंगीत खडू पसरून ठेवावेत. बालकांना समान रंगाचे ऑब्जेक्ट कार्ड आणि सामान रंगाचा खडू किंवा क्रेयॉन शोधून संबंधित कप्प्यात ठेवायला सांगावे.
- प्रत्येक कप्प्यास एक विशिष्ट संख्या दाखवावी, बालकांना गटात खडे, मणी उपलब्ध करून द्यावेत आणि संबंधित वस्तू मोजायला सांगाव्यात आणि त्यांना संबंधित क्रमांकाच्या कप्प्यात ठेवायला सांगावे.

- कप्प्याच्या बोर्डवर 'मोठे' आणि 'लहान' अशी लेबल्स लावावी. बालकांना एक ऑब्जेक्ट कार्ड निवडून ते योग्य कप्प्यात ठेवायला सांगावे. याचप्रकारे उपलब्ध ऑब्जेक्ट कार्डच्या मदतीने प्राणी, पक्षी; रंग; सजीव-निर्जीव; जड-हलके; फळे आणि भाज्या याप्रमाणे एका वेळी एका प्रकारचे वर्गीकरण करून घेता येईल.
- बालकांना मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड वाटावेत, सामान संख्येची कार्डे असलेल्या बालकांना गट बनवायला सांगावा. गट बनवून आपापली कार्डे संबंधित संख्येच्या कप्प्यात ठेवायला सांगावे.
- बालकांचे छोटे-छोटे गट करावेत. प्रत्येक गटात काही अक्षर कार्डे द्यावीत. ताईने विविध फळ्यांवर रंगीत खडूने वेगवेगळी अक्षरे लिहावीत. बालकांना ती अक्षरे शोधून त्याच रंगाच्या स्टिकर असलेल्या कप्प्यात ठेवायला सांगावीत.
- मोठ्या बालकांना मोजणीचे ऑब्जेक्ट काड्र्स द्यावेत आणि त्यांना दिलेल्या अंकाच्या आधी येणाऱ्या अंकांचे कार्ड शोधून द्यायला सांगावे. याचप्रमाणे अंकाच्या नंतरच्या अंकांचे कार्ड शोधणे, दोन अंकांच्या मधल्या अंकांचे कार्ड शोधणे अशा कृती करून घ्याव्यात.
- बालकांना कोणतेही ५ मोजणीचे ऑब्जेक्ट कार्ड देऊन ते चढत्या क्रमाने किंवा उतरत्या क्रमाने मांडण्यास सांगावे.
- बालकांना कलर ऑब्जेक्ट कार्ड द्यावेत, बालकांना जुळणाऱ्या रंगांच्या ऑब्जेक्ट कार्डच्या जोड्या बनवायला सांगता येतील.
- बालकांना मोजणीची ऑब्जेक्ट कार्ड देऊन त्यांना समान संख्येचे संच तयार करण्यास सांगता येतील.
- बालकांना कोणतेही ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगावे आणि कार्डवरील वस्तूचे नाव वापरून ३ ते ४ शब्दांचे छोटे वाक्य बोलण्याची संधी देण्यात यावी.

## १०) साहित्याचे नाव : ध्वनी पेटी


ध्वनी पेटी

### विकासक्षेत्र :

- शारीरिक विकास
- सौंदर्यदृष्टीचा विकास
- भाषा विकास : श्रवणकौशल्य विकसित होण्यास मदत, श्रवणभेद.

### साहित्याचा वापर :

- बालकांना ध्वनी पेटी जोरात व हळू हलवायला सांगावे. असे केल्याने दोन्ही आवाजांत काय फरक आहे, ते त्यांना सांगून त्यांना बोलण्याची संधी द्यावी.
- प्रत्येक बालकाला एक ध्वनी पेटी द्यावी. त्यांना आवाज ऐकण्यास सांगावे आणि समान ध्वनी पेटी असलेल्या इतर बालकांसोबत जोडी बनविण्यास सांगावे.

- छोट्या गटात बालकांना एकत्र बसवावे. गटातील एका बालकास प्रत्येक ध्वनी पेटी वाजवायला सांगावे. नंतर त्यांना एकसारखे आवाज असलेल्या पेट्यांची जोडी बनविण्यास सांगावे. अशी संधी गटातील प्रत्येक बालकाला द्यावी.
- ध्वनी पेटीच्या साहाय्याने आवाजांचा विविध आकृतिबंध वाजवून दाखवावा. बालकांना त्याप्रमाणे समान आकृतिबंध वाजवायला सांगावे.

## ११) साहित्याचे नाव : चित्रकोडी

### विकासक्षेत्र :

- ➢ **बोधात्मक विकास** : बौद्धिक विकास, भाषा विकास
- ➢ **शारीरिक विकास** : सूक्ष्म स्नायू विकास, हस्त–नेत्र समन्वय, दृष्टिभेद



चित्रकोडी


### साहित्याचा वापर :

- छोट्या गटातील बालकांना चित्रकोडी देऊन ती सोडवण्यास मदत करावी.
- बालकांना दोन गटांमध्ये विभाजित करून कोडी सोडवायला सांगावे. जो गट सगळ्यात आधी कोडे सोडवेल तो विजेता होईल. याचबरोबर कोडे सोडविल्यावर त्यावरील चित्रांबद्दल बालकांशी चर्चा करावी.
- दोन वेगवेगळ्या कोड्यांचे भाग मिसळा. बालकांना भाग वेगळे करून कोडी पूर्ण करण्यास सांगता येईल. हीच कृती दोन गटांत देखील घेता येईल. यासाठी एका गटात दोन चित्रकोडी मिसळून द्यावीत.

## १२) साहित्याचे नाव : अंक कोडी

### विकासक्षेत्र :

- ➢ **बोधात्मक विकास** : विचारशक्ती, संख्यासाक्षरता, साम्य भेद ओळखणे व मोजणी.




अंक कोडी

### साहित्याचा वापर :

- बालकांना फासा टाकायला सांगावे. त्यांना फाशावरील ठिपके मोजण्यास सांगून त्याच संख्येचे दोन्ही तुकडे निवडून कोडे पूर्ण करायला सांगावे.
- बालकांना कोड्यातील डॉटची बाजू द्यावी व त्यावरील डॉट्स मोजायला सांगावे. डॉट्सच्या संख्येप्रमाणे टोकण, दगड, मणी, बिया मोजून कार्डावर ठेवायला सांगता येईल.

- बालकांसमोर कोड्यातील संख्येचा भाग ठेवून त्यांना दिलेल्या अंकाच्या आधी येणारे अंक ठेवायला सांगावे.
- बालकांना कोणतेही एक डॉट कार्ड दाखवावे व त्यावरील डॉट्स मोजायला सांगावेत. डॉट्सच्या संख्येप्रमाणे बालकांना एकमेकांबरोबर गट बनवायला सांगता येतील.
- बालकांना कोणतेही एक डॉट कार्ड घेण्यास सांगून कार्डावरील संख्येनुसार तितक्या वेळा ठरावीक क्रिया करायला सांगता येईल. जसे : पाच डॉट्स असतील तर पाच वेळा टाळ्या वाजवा किंवा तीन डॉट्स असतील तर तीन वेळा उड्या मारा इत्यादी.
- बालकांना फासा टाकायला सांगावे. फाशावरील संख्येनुसार समान संख्येचे डॉट कार्ड दाखवायला सांगावे.
- बालकांना कोणतेही डॉट कार्ड दाखवावे आणि त्यांना न मोजता कार्ड्सरील डॉट्सच्या संख्येचा अंदाज घेण्यास सांगावा. त्यानंतर प्रत्यक्ष डॉट्स मोजून दाखवावेत आणि त्यांचे उत्तर बरोबर होते की नाही, हे तपासावे.
- बालकांना दोन गटांत विभाजित करावे. अंक कोड्यांच्या संख्येची बाजू एका गटाला आणि डॉटची बाजू दुसऱ्या गटाला वितरित करावी. कुठलीही एक संख्या सांगावी. ती संख्या असलेली दोन्ही गटांतील बालके पुढे येऊन कोडे पूर्ण करतील.
- बालकांना कोणतेही ५ अंकांचे भाग देऊन ते त्यांना चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडण्यास सांगावे.
- १ ते ५ डॉट कार्ड आणि ५ रंग कार्ड्स उलटी करून ठेवावीत. बालकांना एका वेळी एक डॉट कार्ड आणि एक कलर कार्ड उघडायला सांगावे. नंतर त्यांना डॉट कार्डवर दिलेल्या संख्येइतके रंग कार्डाशी जुळणाऱ्या रंगीत ऑब्जेक्ट कार्ड शोधायला सांगावे. उदाहरणार्थ, दोन डॉट कार्ड आणि लाल रंगाच्या कार्डसाठी बालक लाल रंग असलेली दोन ऑब्जेक्ट कार्ड्स निवडतील.
- मोठ्या गटातील बालकांना कोणतेही दोन डॉट कार्ड द्या. बालकांना दोन्ही कार्डांवरील डॉट मोजून एकूण किती डॉट आहेत, याचे उत्तर द्यायला सांगावे.


## १३) साहित्याचे नाव : रंग कोडी

### विकासक्षेत्र :

- **बोधात्मक विकास :** साम्य भेद, रंगओळख.

### साहित्याचा वापर :

- बालकांना कोणतेही ऑब्जेक्ट कलर कार्ड निवडण्यास सांगावे. त्यांना कार्डावरील वस्तूच्या रंगांचे दोन्ही तुकडे शोधून कोडे पूर्ण करण्यास सांगावे.



रंग कोडी

- बालकांना रंगांची कोडी सोडवायला सांगावे. त्यानंतर त्यांना समान रंगांचे ऑब्जेक्ट कार्ड्स शोधून कोड्यांबरोबर ठेवायला सांगता येईल.
- बालकांना दोन गटांत विभाजित करावे. रंग कोड्यांच्या रंगाची बाजू एका गटाला आणि चित्राची बाजू दुसऱ्या गटाला वितरित करावी. कोणताही एक रंग सांगितला की, तो रंग असलेल्या दोन्ही गटांतील बालके पुढे येऊन कोडे पूर्ण करतील.
- रंग कोडे सोडविल्यानंतर बालकांना त्या रंगांच्या इतर वस्तूंची नावे किंवा वर्गातील संबंधित रंगांच्या वस्तू शोधून आणण्यास सांगावे आणि पुन्हा जागेवर ठेवण्यास सांगावे.

## १४) साहित्याचे नाव : क्रिया कार्ड



क्रिया कार्ड

### विकासक्षेत्र :

- **शारीरिक विकास :** स्थूल स्नायूविकास, श्रवण कौशल्य.
- **बोधात्मक विकास :** सूचना समजणे व त्याचे पालन.

### साहित्याचा वापर :

- सेविकेने वर्तुळाच्या मध्यभागी उभे राहावे आणि बालकांना तुमच्याभोवती धावण्यास सांगावे. ‘डोंगराला आग लागली, पळा पळा पळा’ असे म्हणत अचानक ‘स्टॅच्यू’ किंवा ‘फ्रीझ’ म्हणावे व कोणतेही एक क्रिया कार्ड बालकांना दाखवावे. बालकांना कार्डावरील क्रिया करायला सांगावी. असाच खेळ पुढे चालू ठेवावा.
- संगीत खुर्चीप्रमाणे प्रत्येक खुर्चीवर एक क्रिया कार्ड ठेवावे आणि संगीत सुरू करावे. संगीत बंद होताच बालकांना खुर्च्यांसमोर थांबायला सांगून आपल्या समोरच्या खुर्चीवर ठेवलेल्या कार्डावर असलेली क्रिया करायला सांगावी. ज्याला खुर्ची मिळणार नाही, तो बाद होईल आणि इतर बालकांच्या खेळाचे निरीक्षण करेल. जो शेवटपर्यंत नाबाद राहील ते बालक जिंकेल.
- बालकांना कोणतेही एक क्रिया कार्ड निवडायला सांगावे. त्यानंतर त्यांना फासा टाकायला सांगावे. फाशावरील संख्येनुसार बालकांना तेवढे अंक मोजेपर्यंत क्रिया कार्डावरची क्रिया करायला सांगावे.
- प्रत्येकी ५ सेकंद तीन क्रिया कार्ड बालकांना दाखवावे आणि त्यांना दाखवलेल्या अनुक्रमाने क्रिया करण्यास सांगावे. यामुळे बालकांची स्मरणशक्ती वाढण्यास मदत होईल.
- जमिनीवर उडी मारून पोहचता येईल, अशा क्रमाने १ ते ५ क्रमांक लिहावेत. प्रत्येक क्रमांकावर वेगवेगळी क्रिया कार्ड्स ठेवावीत. बालकांनी पहिल्या क्रमांकापासून सुरुवात करून कार्डावरील कृती करायला सांगावी. नंतर त्यांना पुढील क्रमांकावर उडी मारून पुढील क्रिया करावी लागेल. अशाच प्रकारे त्यांना १ ते ५ सर्व क्रिया पूर्ण करण्यास सांगावे.

• जमिनीवर दिशा दाखवणारे बाण काढावेत. प्रत्येक बाणाच्या टोकाच्या बाजूस प्रत्येकी एक क्रिया कार्ड ठेवावे. बालकांना बाणाच्या दिशेने उड्या मारत जाऊन कार्डावरील कृती करायला सांगाव्यात.

## १५) साहित्याचे नाव : पटावरील खेळ – सापशिडी व ट्रेझर हंट






ट्रेझर हंट

### विकासक्षेत्र :

➢ बोधात्मक विकास

➢ भाषा विकास

➢ सामाजिक व भावनिक विकास

### साहित्याचा वापर :

**१) सापशिडी** :

• बालकांना फासा टाकायला सांगावे. फाशावरील संख्येनुसार सोंगटी पुढच्या घरात सरकवण्यास सांगावे. ज्या घरात सोंगटी पोहोचेल, तिकडे लिहिलेली सूचना बालकांना वाचून दाखवावी आणि त्याप्रमाणे कार्य करायला सांगावे.

• बालकांना गटागटात पटावरील खेळ खेळण्यास संधी द्यावी.

**२) ट्रेझर हंट** :

• प्रत्येक बालकाला समान नाणी वाटावीत. प्रत्येक बालकाला क्रमाक्रमाने फासा टाकायला सांगावे. फाशावर असलेल्या संख्येइतक्या घरांनी सोंगटी पुढे नेण्यास सांगावी. ज्या घरात सोंगटी पोहोचेल, तिथे दिलेल्या सूचनेनुसार बालकांना नाणी द्यावी किंवा घ्यावी लागतील, हे समजून सांगावे. तसेच प्रत्येक घरात दिलेली सूचना वाचून दाखविण्यास मदत करावी. हा खेळ गटात घ्यावा. प्रत्येक गटाला हा खेळ खेळण्याची संधी देण्यात यावी.

• या खेळात नाणी म्हणून उपलब्ध करून देण्यात आलेल्या चकत्या मोजण्याची संधी देण्यात यावी. विशिष्ट रंगाच्या चकत्या/नाणी विशिष्ट संख्या सांगून मोजून देण्यास सांगावी.

## १६) साहित्याचे नाव : आकार किट



आकार किट

### विकासक्षेत्र :


➢ **बोधात्मक विकास** : आकाराची ओळख, रंगानुसार व आकारानुसार वर्गीकरण

### साहित्याचा वापर :

• बालकांना कोणताही एक आकार दाखवावा. बालकांना दाखवलेल्या आकाराच्या रंगाचे इतर आकार शोधायला सांगावेत. त्यानंतर त्या आकारातील रंग दाखवून त्या रंगाचे विविध आकार दाखविण्याची संधी देखील द्यावी.

- बालकांना समान आकारांचे संच तयार करण्यास सांगावे. जसे की, सर्व वर्तुळ एकत्र आणि अर्धवर्तुळ एकत्र.
- बालकांना कोणताही एक आकार दाखवावा. त्यांना त्यांच्या आजूबाजूला समान आकाराच्या वस्तू शोधण्यास सांगावे. उदाहरणार्थ, चौरस आकार दाखवावा. बालके त्या चौकोनी आकाराला रुमाल किंवा चौकोनी पुस्तकाशी जुळवू शकतात.
- छोट्या गटात बालकांकडे सर्व आकार द्यावेत आणि त्यांना लहान ते मोठे किंवा मोठे ते लहान अशा क्रमाने आकार लावायला सांगावे.
- बालकांना दिलेल्या आकारांसह वेगवेगळ्या वस्तू बनवायला सांगावे. विविध आकार वापरून त्यांच्या कलात्मकतेप्रमाणे, घर, आइस्क्रीम कोन, बोट अशा विविध वस्तू ते बनवू शकतात का, ते पाहावे.
- फळ्यावर विविध आकारांपासून कॅटरपिलर काढून दाखवावे. बालकांजवळील विविध आकार चिकटवून त्यांना ती आकृती पूर्ण करायला सांगावे.
- बालकांना आकार वेगवेगळ्या जागेवर ठेवण्यास सांगावे. जसे की, लाल चौकोन खुर्चीवर ठेवा किंवा हिरवा त्रिकोण टेबलाखाली ठेवा. याप्रमाणे खाली–वर, जवळ–लांब, पुढे–मागे या संकल्पना अधिक दृढ करता येतील.
- फळ्यावर ५ पर्यंतची कोणतीही संख्या आणि आकार यांचे संयोजन लिहावे. बालकांना त्या आकाराचे दिलेले प्रमाण आकाराच्या मदतीने दाखवायला सांगावे. उदा. ३–○: तर बालक तीन वर्तुळे दाखवेल.
- कोणतेही ३ आकार आणि ३ क्रिया यांचे संयोजन करावे. जसे, वर्तुळ–१ उडी, त्रिकोण–३ टाळ्या आणि चौकोन – ४ बेडूक उड्या. त्यानंतर आकारांचे वेगवेगळ्याप्रकारे संयोजन करून दाखवावे आणि बालकांना संबंधित क्रिया करण्यास सांगाव्या.

## १७) साहित्याचे नाव : गोष्टीचे कार्ड



गोष्टीचे कार्ड

### विकासक्षेत्र :

➢ **भाषा विकास** : श्रवण कौशल्य, संवाद कौशल्य, गोष्ट सांगणे, पूर्ण वाक्यात बोलावे.

### साहित्याचा वापर :

- गोष्टीच्या कार्डावरील चित्रांचा वापर चित्रवर्णन करण्यासाठी करता येईल. बालकांना चित्राचे वर्णन करण्याची संधी द्यावी. चित्रवर्णन करण्यासाठी पूर्ण वाक्याचा वापर करण्यास सांगावे.

- चित्रातील पात्रांमध्ये काय संवाद सुरू असेल, याविषयी कल्पना करून त्याविषयी बोलण्यास सांगावे.
- गोष्टीच्या कार्डांच्या मदतीने बालकांना गोष्ट सांगावी. गोष्टीतील काही प्रसंग सांगून झाल्यावर त्या गोष्टीचा शेवट काय झाला असेल? किंवा पुढे काय झाले असेल, या विषयी कल्पना करून त्याविषयी बोलण्यास सांगावे. थोडक्यात गोष्ट पूर्ण करण्यास सांगावी.
- बालकांना गोष्टीचे कार्ड दाखवून कार्डावरील गोष्ट वाचून दाखवावी. गोष्ट बऱ्याचदा ऐकल्यावर अधून–मधून बालकांना कार्डाच्या मागे दिलेले प्रश्न विचारावेत. बालकांना प्रश्नांची उत्तरे द्यायला आणि गोष्ट सांगण्यास प्रोत्साहित करावे.
- गोष्टीच्या कार्डाच्या मागील बाजूला जिथे मजकूर असेल तो भाग बालकांना दाखवून लहान वयोगटातील बालकांना वेगवेगळी अक्षरे शोधण्यास सांगावे. मोठ्या वयोगटातील बालकांना दोन ते तीन–अक्षरी शब्द शोधायला सांगता येतील.

## १८) साहित्याचे नाव : कवितेचे कार्ड

### विकासक्षेत्र :

➢ **भाषा विकास** : कविता गायन, अक्षर, शब्द याची ओळख.



कवितेचे कार्ड

### साहित्याचा वापर :

- कवितेचे कार्ड बालकांना दाखवावे. हावभाव आणि तालासुरात बालकांना कविता म्हणून दाखवावी. बालकांना एकसुरात कविता म्हणायला प्रोत्साहित करावे. त्यांना चित्रात दिसत असलेल्या पात्रांबद्दल प्रश्न विचारावेत.
- कवितेचे कार्डवरील चित्रांचा वापर चित्रवर्णन करण्यासाठी करता येईल. बालकांना चित्राचे वर्णन करण्याची संधी द्यावी. चित्रवर्णन करण्यासाठी पूर्ण वाक्याचा वापर करण्यास सांगावे.
- चित्रातील पात्रांमध्ये काय संवाद सुरू असेल, याविषयी कल्पना करून त्याविषयी बोलण्यास सांगावे.
- कवितेचे कार्डांच्या मदतीने हावभाव आणि तालासुरात बालकांना कविता म्हणून दाखवावी. बालकांना एकसुरात कविता म्हणायला प्रोत्साहित करावे.
- बालकांना कवितेचे कार्ड दाखवून कार्डावरील कविता वाचून दाखवावी. कविता बऱ्याचदा ऐकल्यावर व म्हटल्यावर अधूनमधून बालकांना कार्डाच्या मागे दिलेले प्रश्न विचारावेत. बालकांना प्रश्नांची उत्तरे द्यायला आणि कविता वाचण्यास प्रोत्साहित करावे.

- कवितेच्या कार्डाची मागील बाजूला जिथे मजकूर असेल तो भाग बालकांना दाखवून लहान वयोगटातील बालकांना वेगवेगळी अक्षरे शोधण्यास सांगावे. मोठ्या वयोगटातील बालकांना दोन ते तीन–अक्षरी शब्द शोधायला सांगता येतील.

## १९) साहित्याचे नाव : प्राण्यांचे हेडबँड

### विकासक्षेत्र :

➢ **भाषा विकास** : संवाद कौशल्य, श्रवण कौशल्य, गोष्ट सांगणे.



प्राण्यांचे हेडबँड

### साहित्याचा वापर :

- बालकांना डोक्यावर प्राण्यांचे हेडबँड बांधायला द्यावेत. हेडबँडवरील प्राण्याप्रमाणे आवाज काढायला व हालचाल करायला सांगावे. जसे, माकडाचा हेडबँड असेल तर माकडासारख्या उड्या मारणे इत्यादी.
- बालकांना डोक्यावर प्राण्यांचे हेडबँड बांधायला द्यावेत. हेडबँड बांधून हावभावासह कविता म्हणायला सांगाव्यात. जसे, माकड – माकडे निघाली शिकारीला.... हत्ती – हत्तीदादा हत्तीदादा...
- बालकांना हेडबँडवरील प्राण्यांची गोष्ट सांगावी. त्यानंतर त्यांना हेडबँड घालून गोष्टीप्रमाणे अभिनय करायला प्रोत्साहित करावे. आवश्यकतेनुसार इतर प्राण्यांचे हेडबँड तयार करावेत.
- प्राण्यांचे हेडबँड घालून बालकांना प्राण्यांची शर्यत लावायला सांगावे. बालके प्राण्यांप्रमाणे उड्या मारून देखील शर्यत लावू शकतात.
- प्राण्यांचे हेडबँड घाला आणि बालकांना त्या प्राण्याबद्दल प्रश्न विचारा जसे की, तो कुठे राहतो, काय खातो इ. असेच विविध भाज्या, फळे, फुले यांचे देखील हेडबँड तयार करून वापरता येतील.

## २०) साहित्याचे नाव : चित्रचर्चा कार्ड

### विकासक्षेत्र :

➢ **बोधात्मक विकास** : संख्याज्ञान, लांब–जवळ, मोजणी.

➢ **भाषा विकास** : चित्रवर्णन, संवाद, वाक्यरचना, शब्दसंपत्ती.



चित्रचर्चा कार्ड

**साहित्याचा वापर :**

- बालकांना एकावेळी एक चित्र कार्ड दाखवावे. त्यावर आधारित चित्रवर्णन करण्यास सांगावे. लहान गटातील बालकांना सूचक प्रश्न विचारून चित्रवर्णन करण्यासाठी बोलते करता येईल.
- बालकांना एकावेळी एक चित्र कार्ड दाखवावे. मोठ्या गटातील बालकांना चित्र वर्णन करताना पूर्ण वाक्यात बोलण्यास सांगावे.
- बालकांना चित्रचर्चा कार्ड दाखवून कार्डाच्या मागील बाजूस दिलेले प्रश्न विचारावेत.
- बालकांना चित्रचर्चा कार्ड दाखवून त्यातील व्यक्ती किंवा माणसे काय बोलत असतील, या संदर्भात अंदाज बांधायला सांगून त्यांचे संवाद काय चालले हे सांगण्यास लावावे.
- बालकांना चित्रातील विविध वस्तूवर बोट ठेवून त्या ओळखण्यास सांगावे. बालकांची शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी चित्रातील नवीन शब्दांची ओळख करून द्यावी.

## २१) साहित्याचे नाव : अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स

**विकासक्षेत्र :**

➢ **भाषा विकास** : अक्षर ओळख, शब्द संपत्ती, अक्षर ध्वनी



अक्षर रोल आणि कव्हर मॅट्स

**साहित्याचा वापर :**

- बालकांना त्यांच्या नावाचे पहिले अक्षर ओळखायला सांगावे आणि ते अक्षर कव्हर मॅटवर तसेच अक्षर कार्डात शोधण्यास सांगावे.
- बालकांना कोणतेही ऑब्जेक्ट कार्ड निवडण्यास सांगावे. त्यांना कार्डावरील वस्तूचे सुरुवातीचे अक्षर ओळखून शोधण्यास सांगावे आणि नंतर ते अक्षर कव्हर मॅटवर चिन्हांकित करायला सांगावे.
- 'जादुई पिटाऱ्या'त दिलेली अक्षरे एका पिशवीत किंवा बॉक्समध्ये ठेवावीत. बालकांना न पाहता त्यामधील अक्षरे उचलायला सांगावीत आणि कव्हर मॅटवर समान अक्षरावर ठेवायला सांगावे.
- बालकांना गटात विभागून प्रत्येक गटाला एक कव्हर मॅट द्यावी. एका पिशवीतून एक-एक अक्षर काढून समान अक्षर असलेल्या कव्हर मॅटवर ते अक्षरचिन्हांकित करण्यास सांगावे. सर्व अक्षरे प्रथम चिन्हांकित करणारा गट खेळ जिंकेल.

- ५ अक्षरे आणि ५ ऑब्जेक्ट काड्‌र्सचा संच एकमेकांसमोर ठेवावा. बालकांना ते एकमेकांशी जुळवून जोड्या बनवायला सांगावे.
- बालकांना दोन गटांत विभाजित करावे. एका गटाला अक्षरे आणि दुसऱ्या गटाला ऑब्जेक्ट कार्ड द्यावीत. त्यांना जोडी जुळण्यास सांगावे आणि कव्हर मॅटवर अक्षरे चिन्हांकित करण्यास सांगावे.
- बालकांना कोणताही एक रंग सांगून त्या रंगाची अक्षरे निवडून कव्हर मॅटवर चिन्हांकित करायला सांगता येईल.
- बालकांना अक्षरे वितरित करावीत. वेगवेगळ्या वस्तू किंवा व्यक्तींची नावे सांगावीत. त्या नावाचे अक्षर ज्या मुलांकडे असेल, त्यांना ते अक्षर दाखवायला सांगावे.
- बालकांना तीन वेगवेगळी अक्षरे सांगावीत जसे की : ख, घ, च. अक्षरांना त्याच क्रमाने कव्हर मॅटवर शोधून चिन्हांकित करायला सांगावे.
- बालकास एक अक्षर सांगावे, त्यास ते अक्षरकार्ड शोधून दाखविण्यास सांगावे. कार्ड शोधून दाखविल्यानंतर त्यास त्या अक्षराने सुरू होणारे शब्द किंवा त्या अक्षराने संपणारे शब्द सांगण्यास प्रोत्साहित करावे.


## २२) साहित्याचे नाव : संख्या रोल व कव्हर मॅट

### विकासक्षेत्र :

➢ **बोधात्मक विकास** : अंकज्ञान, मोजणी, एकास एक संगती

### साहित्याचा वापर :

- बालकांना फासा टाकायाला सांगावे. फाशावरील संख्या मोजून संख्येप्रमाणे कव्हर मॅटवर तोच अंक शोधायला सांगून आणि त्याला चिन्हांकित करायला सांगावे. हा खेळ बालकांचे गट तयार करून घेता येईल. गटातील प्रत्येक बालकाला एकानंतर एक फासा टाकायची संधी द्यावी.



संख्या रोल व कव्हर मॅट

- बालकांना कोणतेही डॉट कार्ड द्यावे. नंतर त्यांना डॉट मोजण्यास सांगावे. संख्येप्रमाणे कव्हर मॅटवर तोच अंक शोधायला सांगावे व सांगून चिन्हांकित करायलाही सांगावे.
- एखादी कृती ठरावीक वेळा करून दाखवावी. जसे की, तीन वेळा टाळ्या वाजविणे. तुम्ही कृती किती वेळा करता ते बालकांना निरीक्षण करून मोजायला सांगावे. कृती किती वेळा

केली ते दर्शविणारी संख्या बालकांना कव्हर मॅटवर चिन्हांकित करायला सांगावे. हा खेळ देखील बालकांचा गट करून गटात घेता येईल.

- बालकांना विविध वस्तू जसे की, मणी, बिया, खडे इत्यादी मोजण्यासाठी द्यावेत. मोजणी करून आलेल्या संख्येप्रमाणे कव्हर मॅटवर तोच अंक शोधून त्याला चिन्हांकित करायला सांगावे.
- बालकांना डोळे बंद करून मॅटवरील कोणत्याही एका अंकावर बोट ठेवण्यास सांगावे नंतर त्यांना समान प्रमाणात मणी, दगड किंवा बिया मोजून ठेवण्यास सांगावे.
- बालकांना 'जादुई पिटाऱ्या'मधील कोणतेही ऑब्जेक्ट मोजणी कार्ड उचलण्यास सांगून त्या कार्डावरील वस्तूंची संख्या मोजायला सांगावी. नंतर ती संख्या बालकांना कव्हर मॅटवर चिन्हांकित करायला सांगावी. हा खेळ मुलांचा गट बनवून देखील खेळला जाऊ शकतो. गटातील प्रत्येक बालकाला एकानंतर एक कार्ड निवडायची व हा खेळ खेळण्याची संधी देण्यात यावी.
- 'जादुई पिटाऱ्या'मधील एकाच रंगाच्या मणी, नाणी/चकत्या या कव्हर मॅटवरील समान अंकावर ठेवण्यास सांगावे. जसे की, सर्व ३ अंक लाल मण्याने चिन्हांकित करणे.
- 'जादुई पिटाऱ्या'मधील आइस्क्रीमच्या काड्यांच्या मदतीने देखील कव्हर मॅटवरील समान अंकांच्या जोड्या लावण्यास सांगता येईल.

## २३) साहित्याचे नाव : शब्दनिर्मिती कार्ड

### विकासक्षेत्र :

➢ **भाषा विकास** : अक्षर ओळख, शब्द वाचन, शब्दनिर्मिती, अक्षरध्वनी




**शब्दनिर्मिती कार्ड**



### साहित्याचा वापर :

- बालकांना शब्दकार्ड व अक्षरे द्यावीत. कार्डावरील चित्र त्यांना ओळखायला सांगावे. दिलेली अक्षरे वापरून चित्रासाठी शब्द बनविण्यास सांगावे. याप्रमाणे लहान गटासाठी दोन अक्षरी तर मोठ्या गटासाठी तीन अक्षरी शब्द तयार करून घ्यावेत.
- चार ते पाच बालकांचा एक गट याप्रमाणे गट तयार करावेत. प्रत्येक गटाला काही अक्षरकार्ड द्यावीत. त्या अक्षरांपासून त्यांना अधिकाधिक शब्द बनविण्यासाठी सांगावे.
- बालकांना शब्दकार्डावर दिलेल्या चित्रातील एखादे अक्षर लावून द्यावे आणि उर्वरित शब्द त्यांना पूर्ण करण्यास सांगावे.
- चित्राच्या नावाच्या शब्दातील अक्षरांना उलट-सुलट लावावे आणि बालकांना उलट-सुलट अक्षरांना क्रमवार लावून शब्द बनवायला सांगावेत.

- बालकांना एखाद्या अक्षरापासून सुरू होणारे विविध शब्द सांगण्यास सांगावे. त्यांपैकी जे शब्द अक्षरकार्डापासून तयार करता येतील ते तयार करण्याची संधी द्यावी.
- चित्र शब्दकार्डवर तयार केलेल्या अक्षरांतील सुरुवातीचे अक्षर किंवा शेवटचे अक्षर असे देखील विचारता येईल.

## २४) साहित्याचे नाव : हुला हूप

### विकासक्षेत्र :



हुला हूप

- **शारीरिक विकास** : हस्तनेत्र समन्वय, सूक्ष्म व स्थूल स्नायूंचा विकास.
- **बोधात्मक विकास :** अक्षर ओळख, संख्याज्ञान.

### साहित्याचा वापर :

- 'हुला हूप' जमिनीवर ठेवून बालकांना सूचनेनुसार 'हुला हूप'च्या आत किंवा बाहेर उडी मारण्यास सांगता येईल.
- जमिनीवर दोन रेषा आखाव्यात एक सुरुवातीची आणि थोड्या अंतरावर अंतिम रेषा आखावी. बालकांना पिटाऱ्यात दिलेला चेंडू 'हूला हूप'ने खेचत सुरुवातीपासून शेवटपर्यंत न्यायला सांगावे.
- मोठ्या बालकांसाठी धावण्याच्या शर्यतीसाठी ट्रॅकवर एक लहान टेबल, खुर्ची आणि 'हुला हूप' यासारखे काही अडथळे ठेवावे. बालकांना टेबलवरून उडी मारायला सांगावी आणि खुर्चीच्या खालून जायला सांगावे नंतर त्यांना स्वत:ला 'हुला हूप'मधून पार करून शर्यत पूर्ण करावी लागेल अशा पद्धतीने खेळाचे आयोजन करावे.
- 'हुला हूप' धरा आणि बालकांना 'हुला हूप'मधून चेंडू फेकण्यास सांगावा. प्रत्येक फेरीनंतर हुला हूप आणि मुलांमधील अंतर वाढवावे. आपल्याला या खेळाच्या, जवळ व थोडे लांब या संकल्पना स्पष्ट करता येतील.
- बालकांना 'हुला हूप' कंबरेभोवती गोल फिरविण्याचा प्रयत्न करायला सांगावे. प्रयत्नाने बालकांना हे करता येईल.
- 'हुला हूप' धरावे आणि बालकांना 'हुला हूप'मधून पलीकडे जायला सांगावे.
- 'हुला हूप' स्वत: भोवती पास करत बालकांना एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यास सांगता येईल.
- ४ ते ५ बालकांचे गट बनवावा. त्यांना एका रांगेत उभे राहण्यास सांगावे. पहिले बालक 'हुला हूप' मधून जाईल व 'हुला हूप' खाली ठेवेल. शेवटी असलेले बालक मागून पुढे पहिल्या स्थानावर येऊन तीच कृती करेल. अशा तऱ्हेने सर्व बालके शर्यत पूर्ण करतील.

## २५) साहित्याचे नाव : चेंडू

### विकासक्षेत्र :



चेंडू

- **शारीरिक विकास :** फेकणे, झेलणे, पकडणे, सूक्ष्म स्नायूविकास व हस्त–नेत्र समन्वय.
- **सामाजिक, भावनिक, नैतिक विकास :** सोबत्याबरोबर चेंडू खेळणे, आपली वेळ येण्याची वाट बघणे. लहान सूचनांचे पालन करणे, खेळून झाल्यावर खेळणी जागेवर ठेवणे.

### साहित्याचा वापर :


- चेंडूचा वापर बालकांना खेळणे, फेकणे, झेलणे, किक मारणे यांसाठी करता येईल. यासाठी बालकांच्या छोट्या गटात किंवा जोडीजोडीने सदर कृती करून घेता येईल.
- दोन्ही बाजूंनी उघडे असलेले एक खोके घेऊन बालकांना अशाप्रकारे चेंडू फेकण्यास सांगावे की, खोक्याच्या एका बाजूने फेकलेला चेंडू दुसऱ्या बाजूने बाहेर पडेल.
- पेग बॉक्स किंवा दोन्ही फासे एकावर एक जमिनीवर उभे ठेवावे. बालकांना चेंडू मारून पेग बॉक्स किंवा दोन्ही फासे पाडायला सांगावे.
- **पास दि बॉल :** बालकांना वर्तुळात बसवावे, संगीत सुरू करून बॉल पास करायला सांगावे. संगीत थांबल्यावर, बॉल जवळ असलेल्या बालकाला वर्तुळाच्या मध्यभागी यायला सांगावे आणि गाणे, नृत्य, दिलेल्या अक्षराने सुरू होणारे शब्द, आवडता खाऊ, झाडाचे, भाजी किंवा फळाचे नाव सांगण्यास सांगावे, इत्यादी पैकी कोणतीही एक क्रिया करण्यास सांगावी. यानंतर ते बालक उर्वरित खेळातून बाहेर होईल. सगळ्यात शेवटी नाबाद राहणारे बालक खेळ जिंकेल.
- एक खोके किंवा बादली एका लहान स्टूलवर ठेवावी. बालकांना थोड्या अंतरावर उभे राहून बॉल खोक्यात किंवा बादलीत फेकायला सांगावे. प्रत्येक फेरीनंतर खोके आणि मुलांमधील अंतर वाढवावे.
- बालकांना वर्तुळात उभे करावे. प्रत्येक बालकाला एक क्रमांक द्यावा. नंतर कोणताही एक क्रमांक सांगावा आणि पहिल्या बालकाला त्या क्रमांकाच्या बालकाकडे बॉल फेकायला सांगावे. अशाप्रकारे बालकांना सांगितलेल्या क्रमांकाप्रमाणे एकमेकांकडे बॉल फेकायला सांगावे.
- बालकांना त्यांच्या पायांमध्ये बॉल धरून, एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जायला सांगावे.
- प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्या किंवा कागदाचे ग्लास जमिनीवर लावावे. बालकांना बॉल मारून त्या पाडायला सांगावे. एका चेंडूत जो जास्त बाटल्या किंवा ग्लास खाली पाडेल तो जिंकेल.
- बालकांना दोन गटांत विभाजित करावे. बॉल मध्यभागी ठेवावा. दोन्ही गट एक बालक एका वेळी येईल आणि बॉल घेण्याचा प्रयत्न करेल.

- बालकांच्या जोड्या बनवाव्यात. त्यांना हात न लावता डोक्याच्या साहाय्याने बॉल धरून अंतिम रेषेपर्यंत जायला सांगावे.

## २६) साहित्याचे नाव : इमोशन बोर्ड

### विकासक्षेत्र :

➢ **सामाजिक भावनिक व नैतिक विकास** : भावनांची ओळख, भावनांना प्रतिसाद



**इमोशन बोर्ड**

### साहित्याचा वापर :

- इमोशन बोर्ड वापरून वेगवेगळ्या भावना दर्शविण्यासाठी बालकांना चेहऱ्यावरील वेगवेगळे हावभाव बनवण्यास सांगावे.
- आपल्या चेहऱ्यावर वेगवेगळे भाव आणून बालकांना दाखवावे जसे की : हसणे, रडणे, रागावणे इत्यादी. बालकांना ते ओळखून इमोशन बोर्डवर त्यासारखाच चेहरा तयार करायला सांगावे.
- या क्रियेसाठी बालकांना एक विशिष्ट परिस्थिती सांगावी. जसे की : त्यांचं आवडतं खेळणं तुटले, किंवा त्यांना नवीन भेटवस्तू मिळाली इत्यादी. त्या परिस्थितीत त्यांना कसे वाटेल, याचा विचार करून त्याप्रमाणे इमोशन बोर्डवर चेहरा बनवण्यास सांगता येईल.
- इमोशन बोर्डवर वेगवेगळे हावभाव बनवावे आणि बालकांना त्या भावनांबद्दल सांगावे. बालकांना त्यांच्या चेहऱ्यावर तसे भाव करायला सांगावेत.

## जादुई पिटाऱ्यातील खेळणी वापरण्यासंदर्भात घ्यावयाची काळजी पुढीलप्रमाणे :

- जादुई पिटाऱ्यातील खेळण्यांचा अध्ययन निष्पत्तीनिहाय विचार करून वापराचे नियोजन करावे.
- त्यामधील कोणतीही खेळणी तुटलेली अथवा खराब झालेली असल्यास ती ताबडतोब दुरुस्त करून घ्यावीत.
- साहित्य व खेळणी नियमित स्वच्छ करावीत.
- ही खेळणी हाताळत असताना बालकांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही या संदर्भात दक्षता घ्यावी.
- जादुई पिटाऱ्यातील खेळण्यांवरच संपूर्णतः अवलंबून न राहता स्थानिक साहित्याचा वापर करून काही खेळणी तयार करता येत असतील तर तयार करावीत.
- येथे दिलेल्या बाबी या केवळ नमुना व मार्गदर्शक स्वरूपातील आहेत. आपण आपल्या कल्पनेनुसार सदर खेळण्यांचा अधिक रचनात्मक वापर करण्याचा प्रयत्न करावा.
- आपण कोणत्याही खेळण्याचा नावीन्यपूर्ण उपयोग केल्यास आपल्या इतर अंगणवाडी सेविका व सहकाऱ्यांना तो अनुभव सांगावा. जेणेकरून त्याही तुमच्याप्रमाणे रचनात्मक विचार करून साहित्याचा पुरेपूर वापर करू शकतील.

# प्रकरण ५
# ई-जादुई पिटारा : मोबाइल ॲप

'ई-जादुई पिटारा' हे NCERT आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या पुढाकाराने विकसित केलेले एक बहुउद्देशीय ॲप आहे. हे ॲप विशेषतः ३ ते ८ वर्षे वयोगटातील बालकांच्या शिक्षणाशी संबंधित प्रामुख्याने पालक, शिक्षक आणि शिक्षणप्रेमींसाठी तयार करण्यात आले आहे. या ॲपचा उद्देश राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० (NEP - 2020) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार खेळ आणि अनुभवात्मक शिक्षणाचा अवलंब करणे हा आहे.

## ई-जादुई पिटाऱ्याची वैशिष्ट्ये :

- **आशयाचा खजिना :**

  या ॲपमध्ये बडबडगीते, गाणी, कथा, कोडी, फ्लॅशकार्ड्स, ऑडिओबुक्स आणि खेळणी यांसारख्या विविध सामग्रीचा समावेश आहे, जे बालकांना शिकताना आनंद देतात.

- **कथात्मक आणि संवादात्मक AI आधारित चॅटबॉट :**

  १) कथा सखी : आपण सुचविलेल्या विषयावर बालकांसाठी कथा सांगते.

  २) पेरंट तारा : पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देते किंवा सल्ला देते.

  ३) टीचर तारा : शिक्षकांसाठी क्रियाशील शैक्षणिक उपाय सुचवते.

- **बहुभाषिक समर्थन :**

  या ॲपमध्ये विविध भाषांमध्ये सामग्री उपलब्ध आहे, जेणेकरून बालकांना त्यांच्या मातृभाषेतून शिकणे सोपे जाईल.

- **संवादात्मकता :**

  ॲपद्वारे AI बॉट्स, व्हॉट्सॲप (WhatsApp), टेलिग्राम (Telegram) आणि IVRS च्या माध्यमांतून सहज उपलब्ध आहेत.

## ई-जादुई पिटाऱ्याची उपलब्धता :

- **मोबाइल ॲप :**

  ई-जादुई पिटारा अँड्रॉइड आणि iOS मोबाइलसाठी उपलब्ध आहे.

  **डाउनलोडसाठी :** ई-जादुई पिटारा (https://bit.ly/e-Jaadui-Pitara).

- **WhatsApp आणि Telegram बॉट्स :**

  **WhatsApp नंबर :** ९५९९९६१४४५

  **Telegram :** [@eJaaduiPitara_bot](https://t.me/eJaaduiPitara_bot)

- **IVRS सेवा :**

१५१०८ या क्रमांकावर कॉल करून कथा, गाणी आणि प्रश्न ऐकता येतात.

- **अधिकृत संकेतस्थळ :**

eJaaduiPitara(https://ejaadupitara.ncert.gov.in).

## ई-जादुई पिटाऱ्याचे शिक्षणक्षेत्रासाठी फायदे :

- **बालकांचा सर्वांगीण विकास :**

शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून बालकांची प्रगती साधण्यासाठी मदत होईल.

- **राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० (NEP - 2020) नुसार शिक्षण :**

केवळ पुस्तकी शिक्षणाऐवजी अनुभवात्मक आणि सर्जनशील पद्धतींचा अवलंब करणे शक्य होईल.

- **पालक व शिक्षकांसाठी मार्गदर्शन :**

शिक्षण अधिक आनंददायी आणि प्रभावी करण्यासाठी संसाधने उपलब्ध होतील.

ई-जादुई पिटारा ही केवळ शिक्षणासाठी नवकल्पना नसून, पायाभूत शिक्षणाच्या टप्प्यावर एक क्रांतिकारी पाऊल आहे, जे बालकांसाठी आनंददायी, संवादात्मक आणि अनुभवात्मक शिक्षणाचा नवा मार्ग दर्शविते.

## ई-जादुई पिटाऱ्याचा वापर :

- ई-जादुई पिटारा डाउनलोड करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे :
  - ➤ तुम्ही QR कोड स्कॅन करून App डाउनलोड करू शकता किंवा PlayStoreApp वर जाऊन ॲप डाउनलोड करू शकता.




**QR कोड** स्कॅन करून **डाउनलोड** करू शकता.


किंवा PlayStore App

**PlayStore App** वर जाऊन जादुई पिटारा किंवा **e-JaaduiPitaraApp डाउनलोड** करू शकता.

**Step 1 :**

Play Store App Open करावे. त्यामध्ये e-JaduiPitara असे टाईप करून सर्च करावे.

**ejaduipitara** टाईप करून सर्च बटणवर क्लिक करावे.





सर्च बटण

**Step 2 :**

e-JaaduiPitara - App डाउनलोड करावे. (Install करावे.)


सर्च केल्यानंतर तुम्हांला **PlayStore** मधून अशा प्रकारे **e-JaaduiPitaraApp** डाउनलोड करावे.




**Install** चे बटण क्लिक करून डाउनलोड करावे.

## Step 3 :

e-JaduiPitara – App डाउनलोड केल्यानंतर जादुई पिटारा Application Open करावे.




Install झाल्यानंतर तुम्हांला **Open** चे बटण पाहायला मिळेल त्यावर क्लिक करून App Open करावे.

## Step 4 :

App उघडल्यावर तुम्हांला अशा पद्धतीचा इंटरफेस पाहायला मिळेल यामध्ये उजव्या कोपऱ्याला तुम्हाला आपली भाषा निवडायचा पर्याय दिलेला आहे.




भाषा निवडण्याच्या पर्यायावर क्लिक करावे.




➢ तुम्ही बघू शकाल येथे १४ प्रकारच्या भाषा दिल्या गेल्या आहेत. तुम्ही ज्या भाषेत शिकवता, त्या भाषेची निवड करावी. उदा. मराठी

➢ उपक्रम शोधून बघायचे असल्यास खाली दिलेल्या पर्यायांचा तुम्हांला उपयोग होतो.




यामध्ये तुम्हांला जे शिकवायचे किंवा बघायचे असेल ते तुम्ही सर्च करू शकता. उदा. गाणी, कविता, कथा इत्यादी.

या **तीन लाईन्सच्या बटणावर** क्लिक केल्यावर तुम्हांला १२ प्रकारच्या श्रेणी दिसतात.




सर्व श्रेणी




➢ १२ प्रकारचे श्रेणींमधील कोणत्याही श्रेणीची निवड करू शकता.

यामध्ये तुम्हांला सर्व श्रेणींचे वेगवेगळे पर्याय आडव्या क्रमाने दिलेले आहेत. उदा. उपक्रम, कथा, यमक गाणी इ.




**उपक्रम** हा शिकवण्याची पहिली श्रेणी आहे. तसेच आपण बाकीच्या श्रेणी पण बघू शकता. उदा. कथा, यमक, गाणी इत्यादी





➢ यामध्ये खाली तुम्ही बघू शकता की, त्यामध्ये कथा सखी, पेरेंट तारा, टीचर तारा आणि माझा पिटारा असे ४ पर्याय दिलेले आहेत.




कथा सखी, पेरेंट तारा, टीचर तारा, माझा पिटारा


➢ खालच्या बाजूस **कथा सखी**मध्ये दोन पर्याय पाहायला मिळतात. या दोनपैकी एक पर्याय निवडण्यासाठी येतो तो स्वीकारायचा आहे. (टीप : नकार आणि स्वीकारा पर्याय कथा सखी, पेरेंट तारा, टीचर तारा एकदाच सुरुवातीला येतो सर्वांनी **स्वीकार** हा पर्याय निवडावा.)




**स्वीकारा** या पर्यायावर क्लिक करावे.


➢ **स्वीकार** केल्यानंतर खालीलप्रमाणे विंडो ओपन होते. त्यामध्ये आपण येथे लिहा हा पर्याय दिसतो त्यावर क्लिक करून तुम्ही गोष्टीसाठी सर्च करू शकता.

## १) कथा सखी




गोष्टीचे नाव येथे टाईप करून देखील तुम्ही सर्च करू शकाल.

या चिन्हावर क्लिक करून तुम्ही बोलून सर्च करू शकता.





गोष्टीचे नाव लिहून झाल्यावर येथे क्लिक करून सर्च करू शकता.

## २) पेरेंट तारा

➤ खाली दिलेल्या **'पेरेंट तारा'** यामध्ये पालकांना मुलांसोबत घरी करण्याचे उपक्रम दिलेले आहेत.





या ठिकाणी क्लिक करून टाईप करून तुम्ही सर्च करू शकता.

**पेरेंट तारा**वर क्लिक करावे.

या चिन्हावर क्लिक करून तुम्ही बोलून सर्च करू शकता.

## ३) टीचर तारा








यामध्ये तुम्हांला **टीचर तारा** या पर्यायावर क्लिक करायचे आहे.

या पर्यायावर टाईप करून, क्लिक करून तुम्ही सर्च करू शकता.


या चिन्हावर क्लिक करून तुम्ही बोलून सर्च करू शकता.

## ४) माझा पिटारा





**माझा पिटारा** या पर्यायावर क्लिक करावे.


यामध्ये तुम्हाला तुम्ही बघितलेले उपक्रम दिसतात




यावर क्लिक केल्यावर तुम्ही तुमची स्वतःची **नवीन प्ले लिस्ट** करू शकाल. नवीन प्ले लिस्ट पर्यायावर क्लिक करा.




प्ले लिस्ट बटणावर क्लिक केल्यावर तुम्ही बघितलेले व्हिडिओ तिथे मिळतील.




प्ले लिस्ट बनवत असताना आपल्याला ज्या उपक्रमाची व्हिडिओ प्ले लिस्टला ठेवायची असेल तिला क्लिक **(select)** करून घ्यावे.

यामध्ये प्ले लिस्टचे नाव टाईप करायचे आहे.







आपण पाहू शकाल की, प्ले लिस्ट बनलेली आहे या बटणावर क्लिक करून तुम्ही तुमची **प्ले लिस्ट** बघू शकाल.

**Select** करून झाले की, आपली प्ले लिस्ट **जतन** करा. या बटणावर क्लिक करायचे आहे.




**होम** बटणावर क्लिक करून तुम्ही परत जाऊ शकता.

➤ तुम्हांला परत **होम पेजला** जायचे असल्यास तुम्ही खाली दिलेल्या **होम** या बटणावर क्लिक करावे.

# परिशिष्ट अ
# विकास क्षेत्रे, ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती यांतील सहसंबंध

प्रस्तुत परिशिष्टात पायाभूत स्तरासाठी अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्तींचे वर्णन आणि चर्चा करण्यात आली आहे. ही शिक्षण मानके राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मध्ये विचारात घेतलेल्या शिक्षणाच्या लक्ष्यांमधून प्राप्त झाली आहेत.

विभाग १ मध्ये शिक्षणाची लक्ष्ये, अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती या शब्दांची व्याख्या केली असून त्यांना शिकण्याचे मानक म्हणून संबोधले जाते. लक्ष्ये, ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्तींमधील स्पष्टता व फरक या विभागांमध्ये अधोरेखित केलेले आहेत.


विभाग २ मध्ये लक्ष्यापासून ते अध्ययन निष्पत्तीपर्यंत येण्याच्या प्रक्रियेचे आणि या प्रक्रियेत सहभागी घटकांच्या भूमिकेचे वर्णन केलेले आहे.

विभाग ३ मध्ये अभ्यासक्रमाची ध्येये स्पष्ट केली आहेत.

विभाग ४ मध्ये अभ्यासक्रमाची ध्येये साध्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमतांची रूपरेषा स्पष्ट केली आहे.

विभाग ५ मध्ये पायाभूत स्तरातील क्षमतांसाठी काही अध्ययन निष्पत्ती उदाहरणादाखल स्पष्ट केल्या आहेत.

सर्व क्षमतांसाठी परिपूर्ण असा अध्ययन निष्पत्तींचा संच शेवटी दिलेल्या क्युआर कोडमध्ये दिला आहे.



## विभाग १
## व्याख्या

अ) **शिक्षणाची लक्ष्ये :** लक्ष्ये ही शिक्षण व्यवस्थेतील सर्व प्रयत्नांना व्यापक दिशा देणारी मार्गदर्शक विधाने आहेत. अभ्यासक्रम विकास, संस्थात्मक व्यवस्था, निधी आणि वित्तपुरवठा, लोकांची क्षमता ही शिक्षणाची लक्ष्ये शैक्षणिक धोरणांमध्ये स्पष्ट केली जातात. उदाहरणार्थ, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार 'शिक्षण प्रणालीचा उद्देश तर्कसंगत विचार आणि कृती करण्यास सक्षम, करुणा आणि सहानुभूती, धैर्य आणि लवचिकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि रचनात्मक कल्पनाशक्ती, योग्य नैतिक बंध आणि मूल्यांसह चांगला माणूस घडवणे हा आहे. आपल्या संविधानामध्ये परिकल्पित केल्याप्रमाणे न्याय्य, सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी उत्पादक आणि योगदान देणारे नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे लक्ष्य आहे.'

ब) **अभ्यासक्रमाची ध्येये :** अभ्यासक्रमाची ध्येये म्हणजे अभ्यासक्रम विकसन आणि अंमलबजावणीसाठी दिशा देणारी विधाने आहेत. अभ्यासक्रमाच्या ध्येयांची निर्मिती शिक्षणाच्या लक्ष्यामधून होऊन शैक्षणिक स्तरासाठी त्याची विशिष्ट रचना केली जाते. राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्या त्या स्तरांतील अभ्यासक्रम विकसित केले जातात. आराखड्यामध्ये अभ्यासक्रमाची ध्येये दिली आहेत. उदा. बालके दैनंदिन व्यवहारासाठी दोन भाषांमध्ये प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात हे ध्येय पायाभूत स्तरासाठी राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये दिलेले आहे.

क) **क्षमता :** क्षमता ही निरीक्षण व पद्धतशीरपणे मूल्यांकन करता येण्यासारखी, अध्ययनातून प्राप्त होणारी संपादणूक आहे. क्षमता अभ्यासक्रमाच्या ध्येयांपासून प्राप्त केल्या जातात आणि ज्या टप्प्यासाठी अपेक्षित आहेत त्या टप्प्याच्या शेवटी त्या प्राप्त होण्याची अपेक्षा असते. अभ्यासक्रमाच्या आराखड्यात क्षमता स्पष्ट केल्या आहेत; परंतु अभ्यासक्रम विकासक ज्या संदर्भांसाठी अभ्यासक्रम विकसित करत असतील, त्यानुसार अपेक्षित क्षमता घेऊन त्यात सुधारणा करू शकतात. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या ध्येयांसाठी तयार केलेल्या काही क्षमतांची उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत :

अस्खलितपणे आणि अर्थपूर्ण संभाषण करतात आणि एखाद्या क्लिष्ट कामासाठी दिलेल्या तोंडी सूचना समजून घेतात व त्या इतरांना समजतील अशा स्पष्ट भाषेत सूचना देऊ शकतात.

ड) **अध्ययन निष्पत्ती :** क्षमता या निश्चित कालावधीत प्राप्त केल्या जातात, म्हणून संपादणुकीचे अंतरिम दर्शक निश्चित करणे गरजेचे आहे. या दर्शकामुळे शिक्षक अध्ययनाचे निरीक्षण करू शकतील आणि त्याचा मागोवा घेऊन विद्यार्थ्यांच्या गरजा सातत्याने पूर्ण करू शकतील.

अध्ययनाच्या संपादनाची दर्शके, म्हणजेच अध्ययन निष्पत्ती होय. अध्ययन निष्पत्ती हा एक महत्त्वाचा टप्पा असून त्यांच्या क्रमश: प्रगतीतून क्षमता प्राप्त होतात. अध्ययन निष्पत्तीमुळे शिक्षकांना अभ्यासक्रमाचा आशय, अध्यापनशास्त्र आणि विशिष्ट क्षमता प्राप्त करण्याच्या दिशेने मूल्यमापनाचे नियोजन करणे शक्य होते. अभ्यासक्रम विकासक आणि शिक्षकांना नेहमी क्षमता लक्षात ठेवून त्यांच्या वर्गातील संदर्भांसाठी योग्य अशा अध्ययन निष्पत्ती परिभाषित करण्याची स्वायत्तता असली पाहिजे.

पुढे दिलेला तक्ता हा क्षमता लक्षात घेऊन तयार केलेल्या अध्ययन निष्पत्तीचे उदाहरण आहे.

**क्षमता : 'अर्थपूर्ण व अस्खलितपणे संभाषण करतो'.**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| | C-9.3 : अर्थपूर्ण व अस्खलितपणे संभाषण करतो. | | | | |
| | वय – ३ ते ८ | | | | |
| १ | • लक्षपूर्वक ऐकतो आणि आजूबाजूच्या परिचित लोकांशी छोटे संभाषण करतो. | • दैनंदिन जीवनातील विविध शालेय परिस्थितीमध्ये समवयस्क व शिक्षक यांच्यासोबत संभाषण सुरू करतो. | • घटना, कथा, गोष्ट किंवा त्यांच्या गरजा यांवर आधारित संभाषणात सहभागी होतो आणि प्रश्न विचारतो. | • संभाषणात सहभागी होतो. बोलण्यासाठी स्वतःची वेळ येण्याची वाट पाहतो. आणि इतरांना बोलू देतो. | • अनेक वेळा संभाषणांमध्ये आदानप्रदान करताना त्या संभाषणाचा धागा पकडून ठेवतो. |
| २ | • लहान अर्थपूर्ण वाक्यांद्वारे स्वत:च्या गरजा आणि भावना व्यक्त करतो. | • सोप्या वाक्यात रोजचे अनुभव कथन करतो आणि काय/केव्हा/कसे/कोण इत्यादी शब्द वापरून साधे प्रश्न विचारतो. | • दैनंदिन अनुभवांचे तपशीलवार वर्णन करतो आणि 'का?' सारखे प्रश्न विचारतो. | • वर्गात वाचून दाखवलेल्या किंवा चर्चा केलेल्या माहितीपर/कथेतर आशयाशी स्वतःचे अनुभवातून मिळालेले ज्ञान सक्षमपणे जोडतो आणि त्याबद्दल बोलतो. | • एखाद्या विषयावर चर्चेत सहभागी होतो, प्रश्न उपस्थित करतो आणि त्याला प्रतिसाद देतो. |

## विभाग २
## शिक्षणाच्या लक्ष्यांपासून ते अध्ययन निष्पत्तीपर्यंत

पायाभूत स्तराचा राज्य अभ्यासक्रम आराखडा (SCF-FS) शिक्षणाच्या लक्ष्यांपासून खाली अभ्यासक्रमाच्या ध्येयांपर्यंत, म्हणजेच क्षमता ते अध्ययन निष्पत्तींपर्यंतच्या प्रवासाचे (flow-down) महत्त्व अधोरेखित करतो; म्हणून उच्च लक्ष्यांचे छोटे छोटे भाग करून ध्येये पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा.

प्रक्रियेत अमूर्त आणि अविभक्त संकल्पनांना शिक्षण प्रक्रियेत वापरता येतील अशा अधिक ठोस घटकांमध्ये विभागणे या अधोगामी प्रवाह प्रक्रियेचा (flow-down) वापर केला पाहिजे. येथे हाच विचार मांडला आहे.

शिक्षण लक्ष्ये ते अध्ययन निष्पत्तींपर्यंतच्या अधोगामी प्रवासात एक सुसंगतता, साखळी निर्माण होते. ही साखळी पाठ्यक्रम, आशय, अध्यापनशास्त्र पद्धती, संस्थात्मक संस्कृती अशा शिक्षणातून साध्य होणाऱ्या बाबी स्पष्ट करते.

अध्ययन निष्पत्तींच्या पूर्ततेतून त्यांच्याशी निगडित असलेल्या क्षमता, ध्येये आणि लक्ष्य गाठणे शक्य होते. त्यामुळे शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या दैनंदिन व्यवहारात अशा वस्तुनिष्ठ, निरीक्षणक्षम अध्ययन निष्पत्तींच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये शिक्षणाची लक्ष्ये स्पष्ट केली आहेत. या लक्ष्यांवर आधारित अभ्यासक्रमाची ध्येये राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये देण्यात आली आहेत. या अभ्यासक्रमाच्या ध्येयांशी निगडित क्षमता आणि क्षमतांशी निगडित अध्ययन निष्पत्ती मांडण्यात आल्या आहेत.

विभाग ४ मध्ये क्षमता आणि विभाग ५ आणि परिशिष्ट १ साठी दिलेल्या क्यूआर कोडमध्ये अध्ययन निष्पत्ती देण्यात आल्या आहेत.

## २.१ शिक्षणाची लक्ष्ये ते अभ्यासक्रमाच्या ध्येयांपर्यंत

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये विचारात घेतलेली शिक्षणाची लक्ष्ये आणि दृष्टिकोन, पायाभूत स्तरासाठी अपेक्षित शैक्षणिक संपादणुकींना दिशा देतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पायाभूत स्तर राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी तीन विशिष्ट स्रोत दिले आहेत.

अ) शिक्षणाची व्यापक लक्ष्ये.

ब) भारतीय पारंपरिक अभ्यास पद्धती आणि आधुनिक विज्ञान या दोन्हींमध्ये निश्चित केल्याप्रमाणे विकासाची क्षेत्रे.

क) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर भर.

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये शिक्षणाचे उद्देश अगदी स्पष्टपणे मांडले आहेत. शिक्षणाची ही लक्ष्ये शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या सर्व स्तरांसाठी लागू आहेत आणि पायाभूत स्तरासाठी दिशादर्शक आणि महत्त्वपूर्ण आहेत. पायाभूत स्तराच्या अभ्यासक्रमातील ध्येये गाठण्यासाठी ते महत्त्वाचे स्रोत आहेत.

पायाभूत स्तर हा ३ ते ८ वर्षे वयोगटातील बालकांसाठी आहे. भारतात आणि जगभरातील इतर संस्कृतींमध्ये विकासाच्या विविध क्षेत्रांबद्दल शोधनाची प्रदीर्घ परंपरा आहे. ही प्रवृत्ती लहान बालकांमध्ये आढळते, जी नैसर्गिक व इष्ट आहे.

तैत्तिरीय उपनिषदातील पंचकोशामध्ये मानवाच्या विकास क्षेत्रांचे वर्णन केले आहे. हे वर्णन वैकासिक जीवशास्त्र, मानसशास्त्र आणि बोधात्मक मेंदूशास्त्र यांच्या माध्यमातून उदयास आलेल्या आधुनिक अर्थबोधाबरोबरच कालसुसंगत असे आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्यासाक्षरतेवर अध्ययनासाठी तातडीची आणि आवश्यक पूर्वअट म्हणून भर दिला आहे. भाषा आणि साक्षरता विकास क्षेत्राच्या माध्यमातून, मूलभूत साक्षरतेवर विशेष लक्ष देऊन, तसेच बोधात्मक विकास क्षेत्राच्या माध्यमातून मूलभूत संख्याज्ञान याकडे विशेष लक्ष देऊन महत्त्व विशद केले आहे.

पायाभूत स्तराकडे औपचारिक शालेय शिक्षणाची पायाभरणी म्हणूनही पाहिले जाते. औपचारिक शालेय वातावरणासाठी अधिक योग्य असलेल्या अध्ययनाच्या सकारात्मक सवयींचा विकास, हे या स्तरासाठी आणखी एक महत्त्वाचे अभ्यासक्रमाचे ध्येय ठरते.

अशा प्रकारे, राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० ची दृष्टी आणि विकासाची क्षेत्रे यांचा समान विचार करून पायाभूत स्तरासाठी अभ्यासक्रमाची ध्येये निश्चित केली गेली आहेत.

## २.२ अभ्यासक्रमाची ध्येये ते क्षमता

पायाभूत स्तरावरील क्षमतांसाठी चार मुख्य स्रोत आहेत :

अ) अभ्यासक्रमाची ध्येये.

ब) पायाभूत स्तरासाठी सद्य:स्थितीतील संशोधन साहित्य.

क) देशातील विविध शैक्षणिक प्रयत्नांतून प्राप्त अनुभव.

ड) ज्यामध्ये संसाधनांची उपलब्धता, वेळेची उपलब्धता, संस्थात्मक क्षमता आणि शिक्षक क्षमता यांचा समावेश असलेले संदर्भ.

शालेय शिक्षणातील सर्व भागधारकांना अपेक्षित असलेल्या क्षमतांविषयी स्पष्टता असली पाहिजे. पायाभूत स्तरातील या क्षमतांच्या प्राप्तीमध्ये प्रत्येक बालकाच्या प्रगतीचा मागोवा ठेवला पाहिजे. त्यामुळे बालकांना अभ्यासक्रमाच्या ध्येयांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य शिक्षणाच्या संधी मिळतील. सुयोग्य अध्ययनाच्या संधीची खात्री करण्यासाठी यामुळे शाळा प्रणालीला मदत मिळेल.

## २.३ क्षमता ते अध्ययन निष्पत्ती

अध्ययन निष्पत्ती या क्षमता प्राप्तीच्या मार्गातील शैक्षणिक संपादणुकीचे टप्पे आहेत. त्यांची व्याख्या सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ, उपलब्ध साहित्य, संसाधने आणि वर्गातील प्रासंगिकता यांच्या आधारे केली जाते. शिक्षण प्रणालीच्या संदर्भाच्या व्यापक आकलनावर आधारित, राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये अध्ययन निष्पत्तींची उदाहरणे दिली आहेत.

**या अध्ययन निष्पत्तींकडे मर्यादा म्हणून नव्हे, तर शिक्षक आणि शाळा प्रमुखांना दिशा देणारी मार्गदर्शक तत्वे म्हणून पाहिले पाहिजे. त्यांना स्थानिक संदर्भानुसार अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी विविध मार्गांचा विचार करण्याची स्वायत्तता आहे.**

## विभाग ३

## अभ्यासक्रमाची ध्येये

या विभागात पायाभूत स्तरासाठी अभ्यासक्रमाची ध्येये मांडण्यात आली आहेत. **राज्य अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करताना आलेले अनुभव व राष्ट्रीय पातळीवर बदलत जाणारे संदर्भ यानुसार आणि राज्याच्या आकांक्षांमधील विकास आणि बदलांद्वारे या अभ्यासक्रमांच्या ध्येयांचे वेळोवेळी पुनरावलोकन केले जावे.**

अभ्यासक्रमाची ध्येये CG 1, CG2 या प्रकारे दिली आहेत.

| विकास क्षेत्रे | अभ्यासक्रमाची ध्येये |
|---|---|
| शारीरिक विकास | **CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात. |
| | **CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. |
| | **CG - 3** सुदृढ आणि लवचीक शरीर विकसित होते. |
| सामाजिक, भावनिक, नैतिक विकास | **CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे स्वतःच्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात. |
| | **CG - 5** बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात. |
| | **CG - 6** बालके स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात. |
| बोधात्मक विकास/बौद्धिक विकास | **CG - 7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. |
| | **CG - 8** बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करून जग समजून घेऊ शकतात. |

| विकास क्षेत्रे | अभ्यासक्रमाची ध्येये |
|---|---|
| भाषा आणि साक्षरता विकास | CG - 9 बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.<br>CG - 10 बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.<br>CG - 11 बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात. |
| सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास/ आत्मिक विकास | CG - 12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. |
| विकासाच्या क्षेत्रांवर आधारित, वरील अभ्यासक्रमाच्या ध्येयांव्यतिरिक्त, अध्ययनाच्या सकारात्मक सवयी विकसित करणे हे मूलभूत टप्प्यासाठी आणखी एक संबंधित ध्येय आहे. | |
| | CG - 13 बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. |

**(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : पृष्ठ क्र. ५४)**

## विभाग ४

## क्षमता

अभ्यासक्रमाच्या प्रत्येक ध्येयाच्या क्षमता या विभागात स्पष्ट केल्या आहेत. या क्षमता अभ्यासक्रम विकासकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून पाहिल्या जाव्यात आणि त्यांना नियम मानू नये.

क्षमतांना C-1.1, C-1.2 असेच क्रमांक दिले आहेत.

### ४.१ विकास क्षेत्र : शारीरिक विकास

| | |
|---|---|
| **CG - 1**<br>बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात | C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शवतो व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.<br>C-1.2 स्वतःची काळजी आणि स्वच्छतेबाबत सतर्क राहतो.<br>C-1.3 वर्ग, शाळा व परिसर इत्यादी स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो.<br>C-1.4 वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो.<br>C-1.5 हालचालींमध्ये सहजता दाखवतो आणि योग्य रीतीने वागतो. (चालणे, धावणे, सायकल चालविणे)<br>C-1.6 असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागतो. |

| | |
|---|---|
| **CG - 2**<br>बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात. | C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.<br>C-2.2 चिन्हे आणि प्रतीके यांकरिता दृक् स्मृती (Visual Memory) विकसित करतो.<br>C-2.3 आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) सूर-ताल-लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो.<br>C-2.4 वेगवेगळे गंध आणि चव यांतील फरक ओळखतो.<br>C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.<br>C-2.6 अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्याकरिता ज्ञानेंद्रियामार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो. |
| **CG - 3**<br>सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते. | C-3.1 विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.<br>C-3.2 विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो/ दाखवितो.<br>C-3.3 हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवतो.<br>C-3.4 एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखवितो. |

## ४.२ विकास क्षेत्र : सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

| | |
|---|---|
| **CG - 4**<br>बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांना स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता निर्माण होणे. | C-4.1 कुटुंब आणि समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.<br>C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.<br>C-4.3 इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.<br>C-4.4 इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागतो.<br>C-4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.<br>C-4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.<br>C-4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो. |

| | |
|---|---|
| **CG - 5**<br>बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात. | C-5.1 इतरांना मदत करण्यासाठी वयानुरूप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो. |
| **CG - 6**<br>बालके स्वतः भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात. | C-6.1 सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो. |

## ४.३ विकास क्षेत्र : बोधात्मक विकास/बौद्धिक विकास

| | |
|---|---|
| **CG - 7**<br>बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात. | C-7.1 वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकाशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.<br>C-7.2 निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन, तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.<br>C-7.3 दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो. |
| **CG - 8**<br>बालकांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेऊ शकतात. | C-8.1 एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू गटात आणि उपगटात वेगळ्या करतो.<br>C-8.2 आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.<br>C-8.3 १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे) दोन्ही मोजतो.<br>C-8.4 चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.<br>C-8.5 स्थानिक किमतीचा वापर करून ९९ पर्यंतच्या संख्या दर्शविण्यासाठी संख्या चिन्हांचा वापर करतो आणि संख्या ओळखतो.<br>C-8.6 संख्यांची जोड (composition) व फोड (decomposition) आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचिक कार्यनीतींचा वापर करून दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो. |

| | |
|---|---|
| | C-8.7 गुणाकार म्हणजे पुन्हा–पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो.<br>C-8.8 मूलभूत भौमितिक आकार ओळखतो ते तयार करतो, त्याचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो.<br>C-8.9 लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व घटक निवडतो.<br>C-8.10 मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककामध्ये कालमापन करतो.<br>C-8.11 १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो.<br>C-8.12 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.<br>C-8.13 राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संदर्भात सोपी गणिते सोडवतो व तयारही करतो. |

## ४.४ विकास क्षेत्र : भाषा आणि साक्षरता विकास

| | |
|---|---|
| **CG - 9**<br>बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात. | C-9.1 साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.<br>C-9.2 स्वतःहून साधी गाणी आणि कविता तयार करतो.<br>C-9.3 अर्थपूर्ण व अस्खलितपणे संभाषण करतो.<br>C-9.4 क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.<br>C-9.5 कथन केलेल्या/वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टीची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेतो.<br>C-9.6 स्पष्ट कथानकासह लघुकथा आणि पात्रे यांचे कथन करतो.<br>C-9.7 दैनंदिन संवाद परिणामकारकरीत्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करतो व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून नवीन शब्दांचा अर्थ लावतो. |

| | |
|---|---|
| **CG - 10**<br>बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. | C-10.1 शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफतो आणि शब्दापासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>C-10.2 पुस्तकाची मूलभूत रचना/स्वरूप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो.<br>C-10.3 भाषा एक (L1) च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.<br>C-10.4 भाषा एक (L1) मधील कथा आणि परिच्छेद योग्य ठिकाणी विराम घेऊन आणि आवाजातील चढ उतारासहित अचूकपणे व ओघवतेपणाने वाचतो.<br>C-10.5 स्वत:हून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतो व त्याचा अर्थ समजून घेतो.<br>C-10.6 कवितेतील कल्पना व शब्दयोजना यांचे रसग्रहण करतो.<br>C-10.7 छोट्या बातम्या, सूचना, पाककृती आणि प्रकाशित साहित्य वाचतो आणि त्यांतील अर्थांचे आकलन करून घेतो.<br>C-10.8 स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करतो.<br>C-10.9 बालकांसाठी असलेली विविध पुस्तके वाचण्यात रुची दर्शवितो. |
| **CG - 11**<br>बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात. | C-11.1 शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे एकत्र करून शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करतो.<br>C-11.2 लिपीतील वारंवार येणारी अक्षरे ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो. |

*१) अनेक वर्गांसाठी बहुभाषिकतेवर काम करणे हे ध्येय असणे गरजेचे आहे. परंतु ज्या परिस्थितीत बालकांसाठी भाषा दोन (L2) फारच अपरिचित आहे, तेथे भाषा दोन (L2) च्या बऱ्याच क्षमता (C-9.1 ते C-9.7 पर्यंत) या उदयोन्मुख स्तरावर असतात, त्या पायाभूत स्तराच्या शेवटी व पूर्वअध्ययन स्तराच्या सुरुवातीच्या वर्षात संपादित केल्या जाऊ शकतात.*

*२) भाषा एक (L1) ही घरात बोलली जाणारी भाषा/मातृभाषा/परिचित भाषा आहे आणि भाषा दोन (L2) ही कमी परिचित भाषा आहे.*

## ४.५ विकास क्षेत्र : सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास/आत्मिक विकास

| | |
|---|---|
| **CG - 12**<br>बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात. | C-12.1 विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.<br>C-12.2 संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वत:चा आवाज, शरीर, जागा, आणि विविध वस्तू यांचा समर्पकपणे उपयोग करतो व खेळतो.<br>C-12.3 बालक कलेच्या माध्यमातून स्वत:च्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेने काम करतो.<br>C-12.4 कला माध्यमामध्ये सहयोगाने काम करतो.<br>C-12.5 विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो. |

## ४.५.१ सकारात्मक अध्ययन सवयी

| | |
|---|---|
| **CG - 13**<br>बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते. | C-13.1 अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : नियोजन, अवधान आणि विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी कृती करणे अशी कौशल्ये संपादित करतो.<br>C-13.2 स्मृती आणि मानसिक लवचिकता : नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे किंवा बदलणे), स्वयं-नियंत्रण (आवेगात्मक कृती किंवा प्रतिसाद रोखणे) विकसित करतो.<br>C-13.3 निरीक्षण, आश्चर्य, कुतूहल आणि अन्वेषण : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्यांचे निरीक्षण करतो, विविध ज्ञानेंद्रियांचा वापर करून अन्वेषण करतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.<br>C-13.4 वर्गखोली नियामके : मन:पूर्वक व समजपूर्वक नियामके स्वीकारतो आणि पालन करतो. |

**(संदर्भ : राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर - २०२४ : पृष्ठ क्र. ५७ ते ६१)**

## विभाग ५

## अध्ययन निष्पत्ती

या विभागात प्रत्येक विकास क्षेत्रामधील एक क्षमता, पुढे अध्ययन निष्पत्तीमध्ये स्पष्ट केली आहे. पायाभूत टप्प्यासाठी अध्ययन निष्पत्ती कशा स्पष्ट केल्या जाऊ शकतात. याचे मार्गदर्शन करण्यासाठी हा नमुना आहे.

### अ) विकास क्षेत्र : शारीरिक विकास

१) अभ्यासक्रमाची ध्येये (CG-2) : बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

१) क्षमता (C-2.1) : आकार, रंग आणि त्यांच्या छटा यांच्यात फरक करतो.

**C-2.1 : आकार, रंग आणि त्यांच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो. (काळा, पांढरा, तपकिरी) | • मूळ प्राथमिक व दुय्यम रंगामधील छटा यांतील फरक ओळखतो. उदा., फिकट निळा, गडद निळा, फिकट हिरवा, गडद हिरवा. | • दोन रंग मिसळल्यावर/एकत्र केल्यावर कोणता नवीन रंग तयार होईल याचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतो. (उदा., निळा आणि पिवळा एकत्र केल्यावर हिरवा दिसतो आणि लाल व पांढरा एकत्र केल्यावर गुलाबी दिसतो. | • दोन रंग एकत्र केल्यावर कोणता रंग तयार होईल याबाबत अंदाज बांधतो. | • कलाकृती तयार करताना चित्रांमध्ये सजावट आणि प्रदर्शन यांमध्ये रंगाचा वापर विविध प्रकारे करतो. |
| २ | • वस्तूंची त्यांच्या रंगानुसार विभागणी/गट करतो. (उदा., सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो.) | • लांबी, रुंदी, उंची या मितींच्या आधारावर वस्तूंचे गट करतो. | • रंग आणि आकार यांच्या वैशिष्ट्यांनुसार वस्तूंचे गट करतो. (जसे– सगळे लाल त्रिकोण एकत्र, सर्व मोठी हिरवी पाने एकत्र करतो.) | • विविध रंग, आकार आणि त्यांच्या छटा यांनुसार गट करून आकृतिबंध तयार करतो, कोडी सोडवतो व खेळ खेळतो. | |

## ब) विकास क्षेत्र : सामाजिक, भावनिक, नैतिक विकास

१) अभ्यासक्रमाचे ध्येय (CG-5) : बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

१) क्षमता (C-5.1) : शाळेमध्ये किंवा घरी वयानुरूप कामात सहभागी होतो.

**C-5.1 : इतरांना मदत करण्यासाठी वयानुरुप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • खेळून झाल्यावर खेळणी आणि इतर साहित्य जागच्या जागी ठेवतो. | • वर्ग सुव्यवस्थित ठेवण्यासाठी शिक्षकांना मदत करतो. | • जेवल्यानंतर स्वतःचे ताट किंवा खाऊचा डबा स्वच्छ करतो.<br>• घरी आणि/किंवा शाळेत दैनंदिन कामे करतो. (उदा., खेळणी ठेवणे, झाडांना पाणी देणे.) | • स्थानिक झाडांचे बी रुजवतो आणि रोपट्याची निगा राखतो. | • अध्ययन–अध्यापन साहित्य निर्मितीमध्ये शिक्षकांना सहाय्य करतो.<br>• स्वयंपाक घरात धुणे, कापणे इ. कामामध्ये मदत करतो. |

## क) विकास क्षेत्र : बोधात्मक विकास

१) अभ्यासक्रमाचे ध्येय (CG-8) : बालके प्रमाण, आकार व मोजमापे या माध्यमातून गणितीय आकलन आणि सभोवताल समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.

१) क्षमता (C-8.4) : चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.

**C-8.4 : चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • परिचित घटना/वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार, २–३ आकार) | • ३ स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावतो आणि त्यांचे स्तर शब्दबद्ध करतो. (मोठे–लहान – जास्त लहान, लांब, आखूड, सर्वांत जास्त आखूड) | • आकार/लांबी/वजनावर आधारित ५ वस्तू चढत्या किंवा उतरत्या क्रमाने मांडतो. | • एकाच गटातील वस्तूची त्यांच्या विविध गुणधर्मानुसार मांडणी करतो. (उदा. आकार, माप, लांबी, वजन)<br>• दिलेल्या संख्यांची चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडणी करतो. (१ ते ९) | • दिलेल्या संख्यांची चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडणी करतो. (९९ पर्यंतच्या) |

## ड) विकास क्षेत्र : भाषा आणि साक्षरता विकास

१) अभ्यासक्रमाचे ध्येय (CG-10) : बालके प्रथम भाषेत सफाईदारपणे वाचन व लेखन करतात. (L1)

१) क्षमता (C-10.5) : स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतो व त्याचा अर्थ समजून घेतो.

**C-10.5 : स्वत:हून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतो व त्याचा अर्थ समजून घेतो.**

वय – ३ ते ८

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • प्रकटवाचन ऐकतो आणि शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो. | • शिक्षकांसोबत सहभागी वाचनात भाग घेतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो. | • शिक्षकांसमवेत मार्गदर्शक वाचनात सहभागी होतो आणि वाचलेल्या भागाविषयीच्या चर्चेत सहभागी होतो. | • दृक् आशय आणि मजकूर समान असणाऱ्या पुस्तकाचे स्वतंत्रपणे वाचन करण्यास सुरुवात करतो. | • दृश्य आशयापेक्षा जास्त मजकूर असणाऱ्या पुस्तकांचे स्वतंत्रपणे वाचन करण्यास सुरुवात करतो. |
| २ | • चित्र पुस्तके वाचतो आणि कृती व वस्तू ओळखतो. | • चित्र पुस्तके वाचतो, त्यातील पात्रे, कथानक ओळखतो आणि घटनांचा योग्य क्रम लावून गोष्ट पुन्हा सांगतो. | • लहान सोपा मजकूर असणारी पुस्तके मोठ्याने वाचतो, दृश्य सूचके व मजकूर या दोन्हींचा वापर वाचण्यासाठी करतो आणि अचूक क्रम व विस्तारासह पुन्हा सांगतो. | • गोष्टींची अपरिचित पुस्तके वाचतो आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ती समजावून घेतो.<br>• गोष्टीतील कथानक व पात्र ओळखतो. | • कथेचे कथानक, पात्रे, घटनाक्रम ओळखतो आणि लेखकाचा दृष्टिकोन लक्षात घेऊन वाचन करतो. |

## इ) विकास क्षेत्र : सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास

१) अभ्यासक्रमाचे ध्येय (CG-12) : बालके दृक् आणि ललित कलांमध्ये क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना कलेद्वारे अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

१) क्षमता (C-12.1) : विविध प्रकारचे साधनसाहित्य हाताळतो आणि त्याबरोबर खेळतो तसेच द्विमितीय (2D) किंवा त्रिमितीय (3D) कलाकृती वेगवेगळ्या आकारात तयार करतो.

**C-12.1 : विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • योग्य कलासाहित्य, साधने आणि उपकरणे हाताळतो. | • साहित्य आणि साधने वापरताना विविध प्रकारांनी पकडतो आणि हाताळतो. (उदा. : काड्या, बिया, खडे, दगड, खडू, दोरा, पेन्सिली, ब्रश, भुकटी, कात्री इ.) | | • दृक् कलांमध्ये गडद व फिकट छाप/ठसे/रेघा काढण्यासाठी हातांचा कमी–जास्त दाब देता येण्यासाठी सक्षम होतो. | |
| २ | • दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा, आणि इतर द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो. | • समवयस्क, सुलभक आणि स्थानिक समुदायाच्या सहयोगाने मोठ्या स्वरूपाची कामे करतो. (उदा. : जमिनीवरील रांगोळी, भित्तिचित्रे, शिल्पकृती) | | • उपलब्ध जागा व साहित्यानुसार लहान व मोठ्या आकारामानामध्ये स्वतःचे काम स्वतः करतो. (उदा. मातीची छोटी बाहुली किंवा कागदाची मोठी बाहुली तयार करणे.) | |
| ३ | • साहित्य एकत्रित मिसळून छाप व आकृती तयार करतो. (उदा. : माती आणि पाणी, वाळू आणि पाणी, पीठ आणि पाणी, रंग आणि पाणी. | • माती किंवा कणिक यांसारखे साहित्य थापून किंवा वळकटी करून त्रिमितीय (3D) आकार तयार करतो. | • स्वत:च्या रचनेमध्ये वेगवेगळ्या घनतेचे, रंगांचे आणि पोतांचे साहित्य एकत्र करून कोलाज तयार करतो.<br>• परिसरातून मिळालेले साहित्य व वस्तू यांची सरमिसळ करून त्रिमितीय रचना/जोडणी करतो. | | |
| ४ | • ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो. | | • ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांच्या सोप्या रचना करतो. | • विविध आकार, पोत, आणि रंग यांच्या आधारे साहित्याची जोडणी करून रचना तयार करतो. | • एकाच साहित्याची विविध प्रकारे हाताळणी करून त्यांचे विविध पोत तयार करतो. (उदा. : माती, कापड, कागद, रबर, लाकूड) |

## फ) विकास क्षेत्र

१) अभ्यासक्रमाचे ध्येय (CG-13) : बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात, यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

१) क्षमता (C-13.4) : वर्गातील नियम : वर्गातील नियम समजून घेऊन अंगीकारतो आणि पाळतो.

**C-13.4 : वर्गखोली नियामके : नियामके समजपूर्वक स्वीकारतो आणि पालन करतो.**

**वय – ३ ते ८**

| | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| १ | • वर्गातील नियमकांसाठी प्रौढ व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण व अनुकरण करतो. | • शिक्षकांनी दिलेल्या संकेतांनुसार वर्गातील नियम पाळतो. | • वर्गातील नियम पाळतो व इतरांना पाळण्यास मदत करतो.<br>• वर्गातील कामांच्या जबाबदाऱ्यांचे तक्ते/ पोस्टर्स शिक्षकांच्या मदतीने तयार करतो. | • वर्गातील नियमांबाबतच्या चर्चेमध्ये सहभागी होतो व त्याप्रमाणे वागतो.<br>• वर्गातील कामांच्या जबाबदाऱ्यांचे तक्ते/ पोस्टर्स स्वत: तयार करतो आणि त्याचे अनुकरण करतो. | • वर्गातील नियम तयार करण्याच्या चर्चेमध्ये सहभाग घेतो.<br>• वर्गातील स्वत: करण्याच्या कामाचे तक्ते/पोस्टर्स तयार करतो, स्पष्ट करून सांगतो व जबाबदारीने पाळतो. |

*उदाहरण स्वरूप अध्ययन निष्पत्तींचा अधिक विस्तृत संच राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ : परिशिष्ट १ मध्ये आहे.*

*विभाग २.२ मधील या प्रकरणाच्या सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे, शेवटी वापरल्या जाणाऱ्या अध्ययन निष्पत्तींचा परिणाम संबंधित अभ्यासक्रम विकासक आणि संस्थांनी काळजीपूर्वक विकसित केले पाहिजे.*

**(राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर – २०२४ (SCF-FS) मधील परिशिष्ट १ येथे पाहू शकता.)**

# संदर्भग्रंथ सूची


**मराठी :**

१) आकार – राज्य बालशिक्षणक्रम. (मार्च २०१४). प्रथम आवृत्ती, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

२) मनीषा अष्टपुत्रे, मुक्ता चिपळूणकर, दिपाली सोमण. (२०१६). उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, चाईल्ड ओल्ड एज अँड हेल्थ केअर सर्व्हिसेस – बालसंगोपन केंद्र व बालशिक्षण व्यवस्थापन (सैद्धांतिक) इ. ११ वी. व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१ (पृष्ठ क्रमांक ९१ ते २०५)

३) राज्य अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तर. (२०२४). राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

४) शिक्षक मार्गदर्शिका (२०२४). महाराष्ट्राचा जादुई पिटारा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

**इंग्रजी :**

1) DIKSHA App : https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app&hl=en&gl=US

2) Jaadui Pitara User Manual - Learning Teaching Material for the Foundational Stage (July 2023). National Council of Educational Research and Training, New Delhi.

3) National Curriculum Framework for Foundational Stage (2022). National Council of Educational Research and Training, New Delhi.

4) Toy based pedagogy - A Handbook, Learning for Fun, Joy and Holistic Development (2022). National Council of Educational Research and Training, New Delhi.

**डिजिटल संदर्भ :**

१) NCERT मार्फत विकसित ई–जादुई पिटारा : मोबाइल ॲप.

२) SCERT, Maharashtra, Pune You-tube channel.

# निर्मिती व लेखन

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १) | डॉ. माधुरी सावरकर | उपसंचालक | सेवापूर्व शिक्षण, बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २) | डॉ. गितांजली बोरुडे | उपविभागप्रमुख | बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३) | श्रीम. सुषमा कोंडूसकर | अधिव्याख्याता | बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४) | डॉ. विशाल तायडे | वरिष्ठ अधिव्याख्याता | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर. |
| ५) | श्री. कैलास सदगीर | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर, जि. अहिल्यानगर |
| ६) | श्रीम. स्नेहल पेडणेकर | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग. |
| ७) | श्रीम. रेणुका जाधव | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सांगली. |
| ८) | श्रीम. नम्रता शेजाळ | अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी. |
| ९) | श्री. विद्याधर शुक्ल | सेवानिवृत्त उपसंचालक | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १०) | श्रीम. मनीषा अष्टपुत्रे | निवृत्त, व्याख्याता | एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, पुणे. |
| ११) | प्रा. कावेरी शेंडे | साहाय्यक प्राध्यापक | सिंहगड टेक्निकल एज्यु. सोसायटीचे श्रीम. काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्यु. अँड ट्रेनिंग, कुसगाव बु., लोणावळा. |
| १२) | श्रीम. माधुरी आहेर | बालशिक्षण, संगोपन अध्यापक व सुलभक | मुक्तांगण एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई. |
| १३) | श्रीम. योगिता भामरे | पर्यवेक्षिका | एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प – वेल्हे, जि. पुणे. |
| १४) | श्रीम. कुसुम कच्छवे | विषयतज्ज्ञ | गटसाधन केंद्र, मानवत, परभणी |
| १५) | श्रीम. किर्ती देशपांडे | मुख्याध्यापक व प्रोजेक्ट डायरेक्टर | बालशिक्षण विभाग, ओंकार बालवाडी, छत्रपती संभाजीनगर. |
| १६) | श्रीम. सुनिता लहाने | सहायक शिक्षक | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अचलपूर, जि. अमरावती. |

# श्रेयनामावली

| अ.क्र. | व्यक्तीचे/संस्थेचे नाव | साहित्याचा प्रकार |
|---|---|---|
| १) | मुक्तांगण एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई. | व्हिडिओ |
| २) | स्नेह बालसंगोपन केंद्र, आयडियल कॉलनी, कोथरूड, पुणे. | व्हिडिओ |
| ३) | श्रीम. स्पृहा इंदू - यूट्यूब चॅनेल | व्हिडिओ |
| ४) | न्यूरॉन ॲक्टिव्हिटी सेंटर व लिटिल एंजल डे केअर सेंटर, नवसह्याद्री, कर्वेनगर, पुणे. | व्हिडिओ |
| ५) | आरंभ प्री स्कूल, विडणी, ता. फलटण, जि. सातारा. | व्हिडिओ |
| ६) | BRC Manvat Youtube channel | व्हिडिओ |





प्रिय ताई, आपण आपल्या अंगणवाडीतील बालकांना पुढील बाबी समजून सांगूया...

प्रिय बाल मित्र–मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. असे झाल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई–बॉक्सद्वारे हक्क संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतात, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असाहाय्य वाटू शकते, पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचं काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल आणि तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल किंवा तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल,**

**तर १०९८ ला संपर्क करा. कारण काही अंक चांगले असतात!**
**ते एखाद्याचे जीवन बदलू शकतात!!!**

CHILD LINE
1098
NIGHT & DAY

**चाईल्ड लाईन १०९८ : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोनसेवा आहे. महिला आणि बालविकास आपत्कालीन मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबविला जाणारा, चाईल्ड लाईन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn





5
R